

◀◀ शिंदे गावात बारदान गोडावूनला भीषण आग ◀◀ नाशिक आज


उत्तर महाराष्ट्रातील अग्रगण्य दैनिक

# गांवकरी




◀◀ खबरदार! इमर्जन्सी बटण दाबाल तर... ◀◀ नाशिक आज


■ gavakari.in ■ gavkarinews.com ■ वर्ष ८६ ■ अंक : २०० ■ नाशिक, मंगळवार, दि. १५ एप्रिल २०२५ ■ किंमत रु. ५.०० ■ पाने = १२ ■ नाशिक ■ शहर-जिल्हा


## महत्त्वाचे

### भिवंडीत बागेश्वर बालाजीचे मंदिर

**मुंबई :** महाराष्ट्रातील भिवंडी येथे छतपूरच्या गडाच्या बागेश्वर बालाजीच्या मंदिराची स्थापना करण्यात आली. सोमवारी सकाळी ८ ते ९ या मुहूर्तादरम्यान, विद्वानांनी बागेश्वर बालाजी, भगवान गणेश, श्री सीताराम दरबार आणि भगवान शिव यांच्या मूर्तींची मंत्रोच्चार करून प्राणप्रतिष्ठा केली. बागेश्वर बालाजी सनातन मठ प्राणप्रतिष्ठा सोहळ्याला बद्रिनाथ वझे महाराज, मुख्य संयोजक रुद्र प्रताप त्रिपाठी, गोविंद नामदेव हे त्यांच्या कुटुंबीयांसह उपस्थित होते. प्राणप्रतिष्ठेनंतर हनुमान यज्ञ झाला.

### नीमचमध्ये जैन मुनींवर हल्ला

**जावेद :** मध्य प्रदेशच्या नीमच जिल्ह्यातील सिंगोली पोलीस स्टेशन परिसरात सहा गुंडांनी तीन जैन मुनींवर हल्ला केला. काल रात्री जैन मुनी सिंगोली रोडवरील हनुमान मंदिरात विश्रांतीसाठी थांबले. रात्रीच्या सुमारास आरोपींनी दरोड्याच्या उद्देशाने काठ्या आणि धारदार शस्त्रांनी हल्ला केला. घटनेनंतर लोकांनी घटनास्थळी दोन गुन्हेगारांना पकडले. हल्ल्यात जखमी झालेल्या मुनींना रुग्णालयात जाण्यास नकार दिला. त्यानंतर त्या सर्वांना जैनस्थानक भवनात ठेवण्यात आले आहे.

### गुजरातमध्ये ३०० किलो ड्रग्ज जप्त

**मुंबई :** गुजरातमध्ये, भारतीय तटरक्षक दलाने ३०० किलो ड्रग्ज जप्त केले आहेत, ज्याची किंमत सुमारे १,८०० कोटी रुपये असल्याचे सांगितले जाते. जप्त केलेले ड्रग्ज मेथाम्फेटामाइन असू शकतात. गुजरात दहशतवाद विरोधी पथक (एटीएस) आणि तटरक्षक दलाने संयुक्त कारवाईत पोरबंदरपासून १९० किमी अंतरावर समुद्रातून ड्रग्जचा एक साठा जप्त केला.

### उपमुख्यमंत्र्यांच्या पत्नीने केले मुंडण

**नवी दिल्ली :** आंध्र प्रदेशचे उपमुख्यमंत्री कल्याण पवन यांची पत्नी अन्ना कोनिडेला यांनी तिरुमला मंदिरात जाऊन मुंडण केले आहे. मुंडण करत असलेले त्यांचे फोटो पवन कल्याण यांच्या जनसेना पक्षाच्या सोशल मीडिया अकाउंटवरून शेअरदेखील करण्यात आले आहे. अन्ना यांनी आपले केस दान का केले? याचे कारण देखील जनसेना पक्षाकडून सांगण्यात आले आहे. मागील आठवड्यात पवन कल्याण आणि अन्ना यांचा मुलगा मार्क शंकर मोठ्या दुर्घटनेमधे वाचला. त्याचे हात भाजले होते.

### दिल्लीत ५५ लाख वाहनांची नोंदणी रद्द

**नवी दिल्ली :** दिल्लीतील तब्बल ५५ लाख वाहनांची नोंदणी रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यामुळे वाहनधारकांना मोठा धक्का बसला आहे. दहा वर्षांपेक्षा जुनी असलेली डिझेल आणि १५ वर्षांपेक्षा जुनी असलेली पेट्रोल व सीएनजीवरील वाहनांचा यामध्ये समावेश आहे. ही वाहने रस्त्यावर दिसल्यास थेट जप्त केली जाणार असल्याचे दिल्लीतील परिवहन विभागाने स्पष्ट केले आहे. वाहनांची नोंदणी रद्द करण्याचा हा निर्णय केवळ दिल्ली सरकारचा आहे. मात्र, महाराष्ट्रासह इतर राज्यांमध्येही याबाबतचा आदेश निघू शकतो. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी जुन्या वाहनांची नोंदणी रद्द करण्याबाबत यापूर्वीच संकेत दिले होते.

# काँग्रेसने मुस्लिम अध्यक्ष का केला नाही?

## पंतप्रधान मोदींचे टीकास्त्र; हिसारमध्ये विमानतळाचे उद्घाटन

**हिसार :** काँग्रेस पक्षाला मनापासून मुस्लिमांबद्दल थोडीशीही सहानुभूती असेल तर त्यांनी एका मुस्लिमाला त्यांच्या पक्षाचा अध्यक्ष बनवावे, परंतु त्यांचे नेते असे काहीही करणार नाहीत. त्यांना फक्त देशातील नागरिकांचे हक्क हिरावून घ्यायचे आहेत, असा आरोप पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केला.

नरेंद्र मोदी काल (१४ एप्रिल) हरियाणा दौऱ्यावर होते. त्यांच्या हस्ते हिसारमधील विमानतळाचे उद्घाटन केले. हिसार-अयोध्या विमान उड्डाणाला त्यांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवण्यात आला. यानंतर त्यांनी विमानतळावरच जाहीर सभेला संबोधित केले.




देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर वक्फ कायदा २०१३ पर्यंत लागू होता. २०१३ मध्ये काँग्रेसने निवडणुकीत मतदान करता यावे म्हणून कायद्यात सुधारणा केली. हा कायदा अशा प्रकारे बनवण्यात आला की, बाबासाहेबांचे संविधान उद्ध्वस्त झाले. जर त्याचा योग्य वापर केला असता तर मुस्लिमांना पंक्चर झालेल्या सायकली दुरुस्त करण्याची गरज पडली नसती, अशी टीका पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केली. पंतप्रधान पुढे म्हणाले की, काँग्रेस म्हणते की, हे मुस्लिमांच्या हितासाठी केले गेले. जर त्यांना मुस्लिम समाजाबद्दल एवढी सहानुभूती आहे तर आजपर्यंत एकही मुस्लिम अध्यक्ष का बनविला नाही, याचे उत्तर काँग्रेसने द्यावे, असे ते म्हणाले. /-...४

### समान नागरी कायद्याला काँग्रेसचा विरोध

काँग्रेसने आपल्या पवित्र संविधानाला सत्ता मिळवण्यासाठी एक शस्त्र बनवले आहे. जेव्हा जेव्हा काँग्रेसवर सत्तेचे संकट आले तेव्हा त्यांनी संविधान चिरडले. काँग्रेसने संविधानाची भावना चिरडली. संविधानाचा आत्मा असा आहे की, प्रत्येकासाठी समान नागरी संहिता असावी, ज्याला मी समान नागरी संहिता म्हणतो, परंतु काँग्रेसने तो लागू केला नाही. उत्तराखंडमध्ये भाजप सरकार सत्तेत आल्यानंतर युसीसी मोठ्या धामधुमीत लागू करण्यात आला. संविधान खिशात घेऊन बसलेले काँग्रेसचे लोक त्याचा विरोध करत आहेत.



नाशिक : भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त शहरात काढण्यात आलेली मिरवणूक. ( छाया : रविकांत ताम्हणकर)

# तेलंगणात एससी आरक्षणाचे तीन गटांत विभाजन

## आर्थिक, शैक्षणिक, सामाजिक स्थितीनुसार विभागणी

**हैद्राबाद :** तेलंगणा सरकारने सोमवारी अनुसूचित जाती आरक्षणात बदल करणारा आदेश जारी केला. या क्रमाने अनुसूचित जाती समुदायाचे तीन भाग करण्यात आले आहेत. असे करणारे तेलंगणा हे देशातील पहिले राज्य बनले आहे.

या आदेशाची माहिती जलसंपदामंत्री एन. उत्तम कुमार रेड्डी यांनी पत्रकार परिषदेत दिली. ते म्हणाले- 'तेलंगणा सरकारने ऑक्टोबर २०२४ मध्ये उच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायाधीश शमीम अख्तर यांच्या अध्यक्षतेखाली एक आयोग स्थापन केला होता.'

आयोगाने अनुसूचित जातींच्या ५९ जातींना सरकारी नोकऱ्या आणि शिक्षणात एकूण १५ टक्के आरक्षण देण्यासाठी तीन श्रेणींमध्ये (वर्ग १, वर्ग २ आणि वर्ग ३) विभागण्याची शिफारस केली. हा कायदा लागू करण्यापूर्वी, रविवारी सचिवालयात अंतिम मंत्रिमंडळ बैठक झाली. या शिफारशीला ८ एप्रिल रोजी तेलंगणाच्या राज्यपालांची मान्यता मिळाली. त्यानंतर १४ एप्रिल रोजी ते लागू करण्यात आले. अनुसूचित जाती प्रवर्गाला पूर्वीप्रमाणेच १५% आरक्षण मिळेल, परंतु आता ते वेगवेगळ्या गटांमध्ये विभागले गेले आहे.

उत्तम कुमार रेड्डी म्हणाले, 'जर २०२६ च्या जनगणनेत अनुसूचित जातींची लोकसंख्या वाढली तर आरक्षण देखील वाढेल.' सर्वोच्च न्यायालयाने १ ऑगस्ट २०२४ रोजी राज्यांना अशा वर्गीकरणासाठी मान्यता दिली होती.

न्यायमूर्ती शमीम अख्तर यांच्या अध्यक्षतेखालील आयोगाने विविध अनुसूचित जातींच्या उपजातींच्या आर्थिक, शैक्षणिक, सामाजिक स्थितीचा अभ्यास केला. सर्वंकषणादरम्यान आयोगाने लोकांकडून सूचनाही मागवल्या. ८६०० हून अधिक लोकांकडून सूचना आणि अभिप्राय प्राप्त झाले. लोकसंख्येचे वितरण, साक्षरता दर, उच्च शिक्षणातील सहभाग, रोजगार, सरकारी योजनांमधून मिळणारे फायदे आणि राजकीय सहभाग अशा अनेक मुद्द्यांवर समुदायाचे मोजमाप केले गेले. सर्व समुदायांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर आयोगाने आपला अहवाल सादर केला.

न्यायमूर्ती बी. आर. गवई यांच्यासह सहा न्यायाधीशांनी उपवर्गीकरणाचे समर्थन केले होते. त्यांनी म्हटले होते - 'एससी/एसटी हा एकसमान वर्ग नाही आणि काही समुदाय इतरांपेक्षा जास्त मागासलेले असू शकतात.' त्याच वेळी न्यायमूर्ती विक्रम नाथ यांनी उपवर्गीकरणाबाबत असहमती व्यक्त केली होती./-...४

### गेल्या वर्षी मंजुरी

सर्वोच्च न्यायालयाने १ ऑगस्ट २०२४ रोजी एससी-एसटी अंतर्गत उपवर्गीकरणाला मान्यता दिली होती. सात न्यायाधीशांच्या खंडपीठाने ६:१ च्या बहुमताने हा निर्णय दिला होता. सर्वोच्च न्यायालयाने म्हटले होते- डेटा आधारे एससी-एसटी अंतर्गत आरक्षणाचे वर्गीकरण करण्याचा अधिकार राज्यांना आहे. जर एखाद्या राज्यात अनुसूचित जातींसाठी १५% आरक्षण असेल तर ते हे १५% आरक्षण वेगवेगळ्या अनुसूचित जाती समुदायांमध्ये त्यांच्या मागासलेपणाच्या आधारावर विभागू शकते.

### रामपाल यांना पंतप्रधानांनी घातले बूट



विमानतळ उद्घाटन कार्यक्रमात पंतप्रधान मोदी आणि एका व्यक्तीच्या भेटीची जोरदार चर्चा रंगली. या व्यक्तीच्या पायात पंतप्रधान मोदी यांनी स्वतःहून बूट घातले. त्यामुळे ही व्यक्ती नेमकी कोण, याबाबत अनेकांना प्रश्न पडू लागले आहेत. पंतप्रधान मोदींनी त्या व्यक्तीला दरवाबूट बूट घालायला लावल्याचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी हरियाणा दौऱ्यात कैथलच्या रामपाल कश्यप यांची भेट घेतली. जेव्हा रामपाल कश्यप समोर आले तेव्हा पंतप्रधान मोदी यांनी तुम्ही असे का केले, स्वतःला त्रास करून का घेतायं, असा सवाल केला. त्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रामपाल कश्यप यांना बूट घालायला दिले. पंतप्रधान मोदी यांनीही रामपाल यांना बूट घालण्यास मदत केली. त्यामुळे पंतप्रधान मोदींच्या कृतीचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# मेहुल चोक्सीला बेल्जियममध्ये अटक

**नवी दिल्ली :** पंजाब नॅशनल बँक (पीएनबी) घोटाळ्यातील मुख्य आरोपी आणि फरार हिरे व्यापारी मेहुल चोक्सीला बेल्जियममध्ये अटक करण्यात आली. मेहुल चोक्सी हा उपचारासाठी बेल्जियमला गेला होता. बेल्जियम पोलिसांनी चोक्सीला अटक केली होती. अंमलबजावणी संचालनालय (ईडी) आणि केंद्रीय अन्वेषण विभाग (सीबीआय) यांच्या विनंतीवरून ही अटक करण्यात आली.



पंजाब नॅशनल बँकेचा घोटाळा करणारा मेहुल चोक्सी हा हिरे व्यापारी होता. जवळपास १३ हजार ५०० कोटींचा घोटाळा केल्याचा आरोप मेहुल चोक्सी आणि त्याचा भाचा नीरव मोदीवर आहे. ईडी आणि सीबीआयने त्याला वॉंटेड जाहीर केले होते. मेहुल चोक्सी आजारी असल्याची माहिती काही दिवसांपूर्वी समोर आली होती.

**कुटुंबासह फरार**

पंजाब नॅशनल बँकेला अनेक कोटी रुपयांचा गंडा घालून मेहुल चोक्सी आणि घोटाळ्यातील मुख्य आरोपी असलेला त्याचा भाचा नीरव मोदी कुटुंबासह देशातून पसार झाले होते. आता मेहुल चोक्सीला अटक करताना बेल्जियम पोलिसांनी मुंबई न्यायालयाने त्याच्याविरुद्ध जारी केलेल्या दोन अटक वॉरंटचा हवाला दिला असल्याची माहिती पुढे आली. /-...४

# वाल्मीक कराडच्या एन्काऊंटरची ऑफर

## निलंबित पोलिस अधिकारी कासलेंचा दावा

**बीड :** मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्याप्रकरणातील मुख्य संशयित आरोपी वाल्मीक कराड सध्या बीड जिल्हा कारागृहात न्यायालयीन कोठडीत आहे. या प्रकरणात आता एक नवा आणि धक्कादायक खुलासा समोर आला आहे. निलंबित पोलिस उपनिरीक्षक रणजित कासले यांनी माध्यमांसमोर दावा केला आहे की, त्यांना वाल्मीक कराडच्या 'एन्काऊंटर'ची ऑफर देण्यात आली होती. या दाव्यामुळे या प्रकरणाला नवीन वळण मिळण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

रणजित कसले यांच्यावर यापूर्वी आर्थिक तडजोडीच्या आरोपाखाली निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे. मात्र, कासले यांनी केलेल्या नव्या दाव्यांमुळे पोलिस यंत्रणेतील अंतर्गत हालचाली आणि हत्याप्रकरणाशी संबंधित तपासाची दिशा बदलू शकते, /-...४



सामाजिक समतेचा संदेश देणारे भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त दादर येथील चैत्यभूमीवर राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पुष्पहार अर्पण करून बाबासाहेबांना कृतज्ञतापूर्वक अभिवादन केले.

# सलमान खानला जीवे मारण्याची पुन्हा धमकी

**मुंबई :** बॉलिवूडचा दबंग भाईजान सलमान खानला पुन्हा एकदा बॉम्बने गाडी उडवून देण्याची धमकी आली आहे. मुंबईच्या वरळी येथील वाहतूक विभागाच्या व्हॉट्सअॅप नंबरवर सलमानसंदर्भातला धमकीचा मेसेज आला. तसेच, याच मेसेजमध्ये सलमान खानला घरात घुसून मारण्याचीही धमकी देण्यात आली आहे. दरम्यान, सलमान खान धमकी प्रकरणी अज्ञात व्यक्तीविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.




बॉलिवूड अभिनेता सलमान खानला येणाऱ्या धमक्यांचं सत्र काही थांबण्याचं नाव घेत नाही. काळवीट शिकार प्रकरणी सलमान खान गेल्या कित्येक वर्षांपासून बिष्णोई गँगच्या निशाण्यावर आहे. /-...४

# मोदींवर टीका होताच संपत्ती जप्त होते

## खा. राऊतांची टीका : ठाकरे सेनेचे उद्या निर्धार शिबिर

**नाशिक : प्रतिनिधी**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर राहुल गांधी यांनी टीका केल्यानंतर नॅशनल हेरॉल्डची संपत्ती जप्त केली जाते. टीका झाल्यानंतर लगेच अशा कारवाया होतात. मात्र, दाऊद इब्राहिमच्या संपत्तीला क्लीन चिट देतात. दाऊदच्या संबंधित प्रफुल्ल पटेल यांची संपत्ती जप्त केली होती. ते भाजप सोबत जाताच क्लीन चिट देण्यात आली. अजितदादा यांच्या जप्त केलेल्या संपत्तीलाही क्लीन चिट देण्यात आली आहे. त्यामुळे एकीकडे दाऊदची संपत्ती मुक्त करतात आणि दुसरीकडे नेहरू यांच्या संपत्तीवर टाच आणली जात असल्याची घणाघाती टीका खा.



संजय राऊत यांनी भाजपवर केली.

नाशिकच्या गोविंदनगर येथील मनोहर गार्डन लॉन्स येथे बुधवारी (दि.१६) शिवसेना ठाकरे गटाचे एकदिवसीय निर्धार शिबिर पार पडणार आहे. ठाकरे गटाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे हे शिबिरात मार्गदर्शन करणार असून, युवासेनेचे प्रमुख आदित्य ठाकरे यांच्या हस्ते शिबिराचे उद्घाटन होणार आहे. या पार्श्वभूमीवर खा. राऊत नाशिकमध्ये आले असता त्यांनी पत्रकारांशी संवाद साधताना भाजपवर टीका केली. यावेळी उपनेते सुधाकर बडगुजर, जिल्हाप्रमुख डी. जी. सूर्यवंशी, महानगरप्रमुख विलास शिंदे, माजी महापौर विनायक पांडे, केशव पोरजे, भारती ताजनपुरे, जयंत दिंडे आदींसह पदाधिकारी उपस्थित होते. पुढे संजय राऊत म्हणाले, बुधवारी मनोहर गार्डन लॉन्स येथे शिवसेना शिबिर होणार आहे. दिवसभर हे शिबिर होणार असून, शिबिरासाठी सर्व विभागांतील पदाधिकारी, कार्यकर्ते एकत्र येतात. अनेक विषयांवर /-...४

### कॅबिनेट बैठकीत हाणामाऱ्या होतील

राज्यात महायुतीचे सरकार आहे, मात्र यांच्यात कॅबिनेट बैठकीत हाणामाऱ्या होतील. एकनाथ शिंदे यांना अबोला धरण्याचा छंद आहे. सध्या तीनही पक्षांत अबोला असल्याचा दावा खा. राऊत यांनी केला.

### न ऐकलेले बाळासाहेब ऐकायला मिळणार

दरम्यान, शिबिरात ठाकरे सेनेकडून शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचं न ऐकलेले भाषण दाखविण्यात येणार आहे. एआयकारे बाळासाहेब यांची शिबिराला उपस्थिती असेल. या भाषणाची शिवसैनिकांना आतापासूनच आतुरता लागली आहे.

### चंद्रकांत पाटलांनी त्यांच्याकडे लक्ष द्यावे

लाडक्या बहिणींमुळे आरोग्य कर्मचाऱ्यांना वेतन मिळत नसल्याचे चित्र आहे. तब्बल आठ हजार कोटी शासनाने वळवल्याचा आरोप खा. संजय राऊत यांनी केला. त्यामुळे चंद्रकांत पाटील यांनी याकडे लक्ष द्यावे, असे सांगत टीका केली.

# पंचवटीत युवकाचा डीजेच्या आवाजामुळे मृत्यू

**सिडको/ पंचवटी : विशेष प्रतिनिधी**

डीजेचा आवाज सहन न झाल्याने पंचवटीतील फुलेनगर येथे एका २३ वर्षीय युवकाचा मृत्यू झाला. दरम्यान, संबंधित युवक बऱ्याच वर्षांपासून आजारी होता. त्यामुळे मृत्यू नेमका कशामुळे झाला, याबाबत संभ्रम आहे.

आंबेडकर जयंतीच्या आदल्या दिवशी म्हणजे १३ तारखेला रात्री शहरातील आंबेडकर पुतळ्याजवळ वाद्य वाजवून रात्री बारा वाजेच्या सुमारास अभिवादन केले जाते. पंचवटी परिसरात असलेल्या फुलेनगर या ठिकाणी डीजे वाजवून उत्सव साजरा केला जात होता. उत्सवाचा आनंद घेण्यासाठी याच परिसरात राहणारा रणजित नरसिंगे हा २३ वर्षीय युवक आलेला होता. अचानक त्याच्या नाकातून रक्त येऊ लागले. ही घटना आजूबाजूला असलेल्या नागरिकांच्या लक्षात येताच त्यांनी धावपळ करून त्याला बाजूला नेले आणि काही नागरिकांनी डीजे बंद केला. त्याला याबाबत उपचार करण्यासाठी घेऊन जात असतानाच रणजित नरसिंगे याचा मृत्यू झाला. पोलिसांनी अकस्मात मृत्यूची नोंद करून तपास सुरू केला आहे.

रणशिंगे हे कुटुंबासह जवळपास आठ ते नऊ वर्षांपासून पेठ रोडवरील फुलेनगर येथे वास्तव्यास आहे. मोलमजुरी करून आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह चालवत होते.

## महत्त्वाचे



### मनसे राजगड कार्यालय

**नाशिक :** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंतीनिमित्त मनसेतर्फे त्यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले. प्रदेश सरचिटणीस दिनकर पाटील यांनी पूजन केले. याप्रसंगी जिल्हाध्यक्ष अंकुश पवार, शहराध्यक्ष सुदाम कोंबडे, उपजिल्हाध्यक्ष नामदेवराव पाटील, मनोज घोडके,नवनाथ कोठुळे,विभाग अध्यक्ष सत्यम खंडाळे,सचिन सिन्हा,योगेश दाभाडे,नितीन माळी,उपशहर अध्यक्ष विजय अहिरे,मिलिंद कांबळे,विशाल भावले,ज्ञानेश्वर बगडे,राकेश परदेशी,अतुल पाटील,नवनाथ जाधव,किशोर वडजे,महिला सेना जिल्हाध्यक्ष ज्योतीताई शिंदे, विभाग अध्यक्ष कविता कुलकर्णी, विद्यार्थी सेना शहराध्यक्ष ललित वाघ, विभाग अध्यक्ष मेघराज नवले, वैभव खाडे, अमोल गोजरे, पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### जी. डी. सावंत महाविद्यालय



**नाशिक :** जी. डी. सावंत महाविद्यालयात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३४ वी जयंती साजरी करण्यात आली. डॉ. आंबेडकर यांच्या जीवनकार्यावर आधारित प्रबोधनपर व्याख्याने, निबंध स्पर्धा, चित्रप्रदर्शने, पोस्टर मेकिंग आणि सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात आले. व्याख्याते प्रा. दर्शन पाटील यांनी आपल्या प्रभावी भाषणातून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा जीवनपट उलगडला. अध्यक्षस्थानी संस्थेचे सचिव अशोकराव सावंत होते. यावेळी फार्मसी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. कमलेश दंडगव्हाळ, वरिष्ठ महाविद्यालयाच्या प्रा. कल्पना भोसले, उपप्राचार्य डॉ. यू.बी. पवार आणि कनिष्ठ महाविद्यालयाच्या प्रमुख प्रा. स्वप्नाली शिंदे, प्रा. विपुल सोनगिरे, प्रा. नीलम गांगुर्डे, प्रा. रोशनी कापडणीस, प्रा. अमृता पंडित, प्रा. एच. पी. देवरे, प्रा. तुषार पवार, विविध विभागांचे प्राध्यापक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रा. सुलोचना देशमुख यांनी सूत्रसंचालन केले.

### वंचित बहुजन आघाडीतर्फे महानगरात लाडू वाटप



**नाशिक :** नाशिक वंचित बहुजन आघाडीतर्फे बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती महानगरप्रमुख अविनाश शिंदे यांच्या नेतृत्वाखाली विविध उपक्रमांनी उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी कार्यकर्ते व पदाधिकारी यांनी ठिकठिकाणी जाऊन लाडू वाटप केले. प्रारंभी मध्यरात्री बारा वाजता शिवाजी चौकातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास अभिवादन करण्यात आले. यावेळी आघाडीचे कार्यकर्ते आणि पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. विविध कार्यक्रमही सादर झाले.

### डॉ. ना. का. गायकवाड विद्यालय, उसवाड



**मंगरुळ :** मराठा विद्या प्रसारक समाज संचलित डॉ. ना. का. गायकवाड विद्यालयात महामानव, बोधिसत्व भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करण्यात आले. अध्यक्षस्थानी विद्यालयाचे मुख्याध्यापक प्रकाश आहिरे उपस्थित होते. कार्यक्रमासाठी प्रमुख अतिथी म्हणून मविप्रचे ज्येष्ठ सभासद अशोक गायकवाड, भाऊसाहेब गायकवाड उपस्थित होते. व्यासपीठावर विद्यालयाचे पर्यवेक्षक अरुण व्हडगर, ज्येष्ठ शिक्षक अर्जुन आहेर, राहुल देवरे आदी मान्यवर उपस्थित होते. विद्यालयातील ज्ञानेश्वरी पवार, शुभम जगदाळे, साक्षी पवार, यश पवार, मृण्मयी कासव या विद्यार्थ्यांनी मनोगतातून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनकार्याविषयी माहिती करून दिली. उपशिक्षिका शीतल गायकवाड यांनी आंबेडकर यांचा जीवनप्रवास व त्यासाठी त्यांनी केलेली मेहनत याविषयी माहिती दिली. कलाशिक्षक संजय गांगुर्डे यांनी उत्कृष्ट फलक लेखन केले. मनीषा गायकवाड यांनी सूत्रसंचालन केले. उपशिक्षक राहुल देवरे यांनी आभार मानले.

### प्रबुद्धनगर मनपा शाळेत आंबेडकर जयंती



**नाशिक :** विश्वरत्न डॉ. बी. आर. आंबेडकर विद्यामंदिर मनपा शाळा क्रमांक २९ प्रबुद्धनगर शाळेत भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती साजरी करण्यात आली. मुख्याध्यापक संजीवकुमार पाटील, सोहम साबळे, आयुष जाधव,प्रणय भरीत, जानवी अहिरे,नंदिनी भालेराव, इच्छा बोराडे यांनी डॉ. बाबासाहेबांच्या प्रतिमेचे व संविधान ग्रंथाचे पुष्पहार घालून पूजन केले. संविधान उद्देशिकेचे सामूहिक वाचन केले. नंदिनी भालेराव या विद्यार्थीच्या टीमने विशेष असे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनावरील गीतावर नृत्य केले. विद्यार्थी रमाई व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या वेशभूषेत आली होती. कार्यक्रमास पालक राधाबाई आहिरे, काशीनाथ जय, राहुल पाईकराव, कलाताई गांगुर्डे,राहुल पाईकराव तसेच राजू थवील,रमेश बागुल,दीपा टोंगारे, वनिता पंडित, पोपट चव्हाण, प्रफुल पाटील उपस्थित होती. राजू थविल यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

# पळसेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्साहात

**नाशिकरोड : प्रतिनिधी**

राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३४ वी जयंती नाशिकरोड पूर्व भागातील गावांमध्ये मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. तर पळसे गावातील बौद्ध स्मारक याठिकाणी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त छत्रपती शिवाजी महाराज व डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्यास सरपंच ताराबाई गायधनी व माजी सरपंच अजित गायधनी यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करत मेणबत्ती लावून पूजन करण्यात आले.

तुम्हाला तुमचे हक्क मिळवायचे असतील तर संघर्ष करायला शिका. त्यानंतरच तुम्हाला तुमचे हक्क मिळतील, असं डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणत. शिवाय ते म्हणायचे शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे, जो प्राशन करेल तो गुरगुरल्याशिवाय राहणार नाही, असे बाबासाहेब आंबेडकर नेहमी सांगायचे, असे प्रतिपादन माजी सरपंच अजित गायधनी यांनी सांगितले.



**पळसे :** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त पुतळा पूजनप्रसंगी माजी सरपंच अजित गायधनी, उत्सव समिती अध्यक्ष गौतम चंद्रमोरे, राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हा कार्याध्यक्ष गणेश गायधनी, संदीप गायधनी, दशरथ चंद्रमोरे, पोलीसपाटील सुनील गायधनी आदींसह पदाधिकारी. **(छाया : सुनील पवार)**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती विविध संस्था, सार्वजनिक शिवजन्मोत्सव समिती,जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, पळसे ग्रामपालिका आदी ठिकाणी डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

यावेळी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष गौतम चंद्रमोरे,उपाध्यक्ष मनोज भवार,ओम पवार,कार्याध्यक्ष राहुल चंद्रमोरे, खजिनदार विशाल चंद्रमोरे, सन्नी वाडेकर, सिध्दार्थ साळवे, सुरेश मोहिते, साहिल चंद्रमोरे, रुद्राक्ष चारस्कर, आदित्य गोरे आदी पदाधिकाऱ्यांसह उबाठाचे तालुकाप्रमुख दीपक गायधनी, उपजिल्हाप्रमुख सुनील गायधनी, माजी सरपंच नवनाथ गायधनी, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे जिल्हाकार्याध्यक्ष गणेश गायधनी, उत्तम चंद्रमोरे, समाधान गायधनी, संदिप गायधनी, पोलीस पाटील सुनील गायधनी, नितीन चंद्रमोरे, आकाश चंद्रमोरे दशरथ चंद्रमोरे,किरण नरवडे, विलास चौधरी, नितीन ढेरिंगे, ईश्वर गायखे, पांडुरंग ढेरिंगे, राजू नरवडे, शांताराम जाधव, गणेश आगळे आदीसह भीमसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## भाजपा नाशिकरोड मंडलतर्फे जयंती साजरी

**नाशिकरोड : प्रतिनिधी**

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, बहुजन नायक, महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती दिनी त्यांना पुष्पांजली अर्पण करून जयंती साजरी केली.

यावेळी नाशिक शहर भाजपा अध्यक्ष प्रशांत जाधव, प्रदेश प्रवक्ते लक्ष्मण सावजी, गणेश कांबळे, नंदकुमार देसाई, नाशिकरोड मंडल अध्यक्ष शांताराम घंटे, ज्येष्ठ नेते सुनील आडके, माजी नगरसेवक संभाजी मोरूस्कर, अंबादास पगारे, शरद मोरे, कोमल मेहरोलिया, राम डोबे, निवृत्ती भोर, किरण पगारे, किसन सोनवणे, संतोष क्षीरसागर, राजेंद्र मोरे, माधुरी पालवे, सुरेखा निकम, राजनंदनी आहिरे, हेमंत नारद, विकास पगारे, रामदास गांगुर्डे, तुषार वाघमारे, बापू सातपुते, ऋषिकेश नारद, विजय उदावंत, महेंद्र अहिरे, दीपक जाधव, संदीप शिरोळे, प्रदीप जाचक, श्रीवास्तव, विजय घुले, संजय घुले, किरण देशमुख, भूषण शहाणे आदी कार्यकर्ते व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## राष्ट्रवादी काँग्रेसतर्फे डॉ. आंबेडकरांना अभिवादन

**नाशिकरोड : वार्ताहर**

राष्ट्रवादी काँग्रेस व नवनाथ ग्रुप यांच्या संयुक्त विद्यमाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंतीनिमित्त त्यांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.


राष्ट्रवादीचे ज्येष्ठ नेते निवृत्ती अरिंगळे म्हणाले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर थोर विचारवंत होते. त्यांनी समाजासाठी खूप काही केले. त्यातून त्यांची विचारधारा अंगीकारलेले समाजात मोठे झाले. त्यांचा आदर्श सर्वांना पथदायक आहे, असेही ते म्हणाले. नाशिकरोड विभागीय अध्यक्ष मनोहर कोरडे, विनोद देशमुख, दिलीप भोसले, भालेराव, अरुण सुजगुरे, अरविंद भालेराव, भाईजान बाटलीवाला, राजू घोलप, बाळासाहेब शिंदे, दत्तात्रय ढिकले, रामदास सदाफुले, अय्यास शेख, तुषार फडोळ, दत्तू वाजे, राजू सोनवणे, राजेंद्र लहामगे, जया शिंदे आदी अनेक मान्यवरांनीही डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अभिवादन केले.

## शिवजन्मोत्सव समितीच्या वतीने डॉ. आंबेडकरांना अभिवादन

**नाशिकरोड : वार्ताहर**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या समाजाला शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा, असा संदेश दिला. त्याचे पालन आंबेडकरी समाज करत आहे. त्यातूनच देशाच्या सर्वोच्च न्यायालयाच्या सरन्यायाधीशपदी भूषण गवई विराजमान झाले. याचा आदर्श शिवप्रेमींनी घेऊन शिवरायांच्या विचाराने प्रेरित होऊन सर्वच क्षेत्रांत समाजाची प्रगती करावी, असे मनोगत शिवजन्मोत्सव समितीचे अध्यक्ष योगेश गाडेकर यांनी व्यक्त केले. छ. शिवाजी महाराज चौकात डॉ. आंबेडकरांच्या प्रतिमेचे पूजन करून त्यांना शिवजन्मोत्सव समितीच्या वतीने अभिवादन करण्यात आले.

छत्रपतींच्या स्वराज्यात सर्व जातीधर्मांची रयत गुण्यागोविंदाने एकत्र नांदत होती आणि स्वराज्यासाठी लढत होती, असेही ते म्हणाले. यावेळी शिवजन्मोत्सव समितीचे कार्याध्यक्ष सुनील सोनवणे, विकास भागवत, शिवाजी हांडोरे, विजय जाधव, संतोष क्षीरसागर, सागर भोर, नितीन खर्जूल, लकी ढोकने, रामभाऊ पठारे, राजेंद्र मोरे, राहुल वाजे, संतोष वाघचौरे, नितीन चिडे, गणेश डावरे, राहुल चाटोलिया, दत्तू कोठुळे आदींनीही डॉ. आंबेडकरांना अभिवादन केले.





## महापालिकेत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अभिवादन

**नाशिक : प्रतिनिधी**

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, थोर समाजसुधारक डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४व्या जयंतीनिमित्त नाशिक महानगरपालिकेच्या वतीने विविध ठिकाणी अभिवादन कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.

शिवाजी रोड येथील मुख्य पुतळ्यास महापालिका आयुक्त तथा प्रशासक मनीषा खत्री यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. तसेच, राजीव गांधी मुख्यालय येथे झालेल्या कार्यक्रमात प्रशासन उपायुक्त लक्ष्मीकांत सातारकर यांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण केला. कार्यक्रमास अधीक्षक अभियंता रवींद्र धारणकर, कार्यकारी अभियंते जितेंद्र पाटोळे व राजेंद्र शिंदे, सहाय्यक आयुक्त रमेश बहिरम, जनसंपर्क अधिकारी योगेश कमोद यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

उपस्थित मान्यवरांनी बाबासाहेबांच्या सामाजिक समतेच्या, शिक्षणाच्या आणि न्यायाच्या विचारांची आठवण करून देत त्यांच्या कार्याला आदरांजली अर्पण केली. महापालिकेच्या वतीने झालेल्या या कार्यक्रमातून डॉ. आंबेडकरांच्या विचारांचा प्रसार व नव्या पिढीला प्रेरणा देण्याचा प्रयत्न करण्यात आला. यावेळी देवांश तायडे या विद्यार्थ्याने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनातील महत्त्वाच्या घटना घडामोडी इंग्रजी भाषेतून सविस्तरपणे मांडून उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले. उपायुक्त सताळकर यांच्या हस्ते देवांश तायडे यांचा सत्कार करण्यात आला.

## डॉ. आंबेडकरांच्या दुर्मिळ वस्तूंचे प्रेसमध्ये प्रदर्शन

**नाशिकरोड : वार्ताहर**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार कृतीत आणण्याचा प्रयत्न येथील इंडिया सिक्युरिटी व करन्सी नोटप्रेसमधील एस.सी./एस.टी./ओ.बी.सी. अँड मायनॉरिटीज असोसिएशन करत आहे.

बाबासाहेबांच्या १३४ व्या जयंतीचे औचित्य साधून प्रेस जिमखान्यावर त्यांनी लिहिलेली पत्रे, दैनंदिन जीवनात वापरलेल्या वस्तूंचे प्रदर्शन भरविण्यात आले होते. त्याचे उद्घाटन व दिव्यांग विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप आयएसपीचे मुख्य महाव्यवस्थापक राजेश बन्सल यांच्या हस्ते करण्यात आले. केंद्रीय



औद्योगिक सुरक्षा दलाचे कमांडंट अमोल चंदनशिवे, उपमहाप्रबंधक अर्पित धवन, हरजीत सिंग व प्रेस मजदूर संघाचे सरचिटणीस जगदीश गोडसे, कार्याध्यक्ष ज्ञानेश्वर जुंद्रे, असो. सरचिटणीस विकास बर्वे, कार्याध्यक्ष नितीन तेजाळे, स्टाफ युनियनचे सरचिटणीस राहुल रामराजे, कार्याध्यक्ष रवी गोजरे, ई.पी.एफ. ट्रस्टी राजेश टाकेकर, मजदूर संघ उपाध्यक्ष प्रवीण बनसोडे, रामभाऊ जगताप, कार्तिक डांगे, अविनाश देवरुखकर, मनोज सोनवणे, राजेश चव्हाण, समाधान भालेराव, सुधीर पगारे आदी आवर्जून उपस्थित होते. बन्सल यांनी यावेळी बाबासाहेबांनी केलेल्या अद्वितीय कार्याचा उल्लेख करून त्यांचे विचार दैनंदिन जीवनात आचरणात आणावे हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल. तर मजदूर संघाचे सरचिटणीस जगदीश गोडसे म्हणाले, बाबासाहेबांनी वापरलेल्या वस्तू हा अनमोल ठेवा आहे. त्यातून प्रेरणा व उत्तेजन मिळेल. त्यांच्या कार्यकर्तृत्वाच्या विचारांचा ठेवा अंगीकारावा, असेही गोडसे म्हणाले.

मजदूर संघाचे कार्याध्यक्ष ज्ञानेश्वर जुंद्रे यांनी असोसिएशनने दिव्यांग विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप करून बाबासाहेबांनी शिक्षणाला दिलेले महत्त्व हा वारसा येथे जोपासला गेला आहे. त्याबद्दल असोसिएशनचे कौतुकही केले. असोसिएशनचे सरचिटणीस विकास बर्वे यांनी सर्व मान्यवरांचे स्वागत केले तर कार्याध्यक्ष नितीन तेजाळे यांनी शेवटी आभार मानले. यावेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे रांगोळीने काढलेले आकर्षक चित्र सर्वांचे लक्ष वेधणारे ठरले. त्याचे सर्वांनी कौतुकही केले. कार्यक्रमाच्या यशस्वीततेसाठी दीपक नाईकवाडे, रोहित कानडे, मोहन रावळे, महेंद्र चव्हाण, सुधीर गायकवाड, संजय जाधव, देविदास साळवे, सचिन कांबळे, संदीप मोरे, धनंजय काळे, सुनील रायकर, संतोष गांगुर्डे, शरद धांडे, जितेंद्र पगारे, सुनील शेजवळ, विजय भालेराव, प्रवीण जाधव, लक्ष्मीकांत लोहारकर, प्रभाकर साळवे, शैलेश उदावंत, कल्पना ओढाने यांनी परिश्रम घेतले.



### गुरुकुल अकॅडमीत आंबेडकर जयंती

**नाशिक :** गुरुकुल अकॅडमी इंग्लिश मीडियम स्कूल ओमकारनगर, नाशिक येथे आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त कार्यक्रम आयोजित करण्यात आला. मुख्याध्यापिका श्रीमती पूनम शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. वैशाली भावड, यमुना भोये यांनी आंबेडकर यांच्या जीवनकार्याविषयी माहिती दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती स्वप्नाली मोगल यांनी केले. श्रीमती योगिता पाठक यांनी आभार मानले.

# नाशिकरोडला डॉ. आंबेडकर यांची जयंती उत्साहात

**नाशिकरोड : वार्ताहर**

भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३४ वी जयंती अमाप उत्साहाने नाशिकरोड परिसरात साजरी करण्यात आली. नाशिकरोड बसस्थानकासमोरील पूर्णाकृती पुतळ्याजवळ जयंतीच्या पूर्वसंध्येला आंबेडकरी जनता परिसरातील विविध भागातून एकत्र आलेली होती. रात्री बारा वाजता सार्वजनिक उत्सव समितीचे अध्यक्ष अनिकेत गांगुर्डे, मुकेश वीर यांनी डॉ. आंबेडकरांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

भारतीय बौद्ध महासभेतर्फे भीमवंदना घेतली. उपस्थितांनी त्रिशरण, पंचस्तुती, भीमस्तुती



आणि भीम स्मरणाचे सामुदायिक पठण केले. अनेकांनी डॉ. आंबेडकरांना पुष्पांजली अर्पण केली. विविध पक्षांचे पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यासमोरही सुनील कांबळे, अतुल भावसार, बाळासाहेब गांगुर्डे, आप्पा भालेराव, अक्षय बर्वे यांनी बाबासाहेबांच्या विचारांना उजाळा दिला. पुतळ्यास खा. राजाभाऊ वाजे, पोलीस आयुक्त संदिप कर्णिक, उपआयुक्त मोनिका राऊत, सहाय्यक पोलीस आयुक्त डॉ.सचिन बारी, नाशिकरोड व उपनगर पोलीस ठाण्याचे वपोनि अशोक गिरी, जितेंद्र सपकाळे, मनपा विभागीय अधिकारी यांनीही पुतळ्याचे पूजन केले. सोमवारी सायंकाळी जेलरोड, उपनगर, सामनगाव रोड, चेहडी एकलहरारोड, देवळालीगाव विहितगाव, जय भवानी रोड, रोकडोबावाडी भागातून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जीवनावरील आकर्षक चित्ररथ काढण्यात आले होते.

बिटको चौक ते आंबेडकर पुतळापर्यंत विविध मंडळांनी राजकीय पक्षांच्या नेत्यांनी या चित्ररथाचे स्वागत केले. यावेळी मोठ्या प्रमाणात आंबेडकरी जनता उपस्थित होती. दोन ठिकाणी पूजन झाल्याने हा जनसागर विभागला होता. त्यामुळे पोलिसांवरील ताणही कमी झाला होता.

यावेळी मनोहर जाधव, सुचित्रा गांगुर्डे, राहुल पगारे, विजय पवार, संयोजक समितीचे संजय भालेराव, भारत निकम, समीर शेख, हरीश भडांगे, अमोल पगारे, शेखर भालेराव, सनी वाघ, आकाश भालेराव, संतोष पाटील, रामबाबा पठारे, नयना वाघ, संतोष कांबळे, किशोर खडताळे, बाळासाहेब सोनवणे, राजाभाऊ वानखेडे, चंद्रकांत भालेराव, संजय भालेराव, रोहित निरभवणे, विशाल घेगडमल, आकाश घुसळे, राजू पगारे, महेंद्र तायडे, महेंद्र साळवे, कैलास वानखेडे, बाळासाहेब जाधव, बौद्धाचार्य प्रवीण बागुल ,चावदास भालेराव, प्रभाकर कांबळे, पी.के. गांगुर्डे, बाळासाहेब भालेराव, सचिन भालेराव, भीमचंद चंद्रमोरे, महिला आघाडीच्या माधुरी भोळे, शांताबाई पगारे, सत्याबाई गाडे, विमलबाई तडवी, विमलबाई जाधव, रमेश वाघ, गणेश जाधव, दशरथ मोकळ, शरद कांबळे, देविदास वाघ, बाळकृष्ण शिंदे, मनोज खैरनार, गौतम गवारे, कृणाल कांबळे आदींनी उत्तम नियोजन केले होते.

## महत्त्वाचे



### मोबाइल चोरणारी महिला पोलिसांच्या ताब्यात

**शहापूर :** येथील रुकसाना साजिद शेख हे आपल्या पतीसोबत मुंबई येथे कामानिमित्त गेले होते सकाळी साबू सिद्दिक मुसाफिर खाना येथे नमाज पडण्यासाठी गेले असता, त्यांच्याकडे असलेला पर्स त्यांनी बाजूला ठेवली होती. वॉशरूमसाठी गेले असता एका महिलेने त्वरित पर्स घेऊन पोबारा केला होता. रुकसाना शेख तेथे आले असता त्यांना त्यांची पर्स आढळून आली नाही. त्यात त्यांचा मोबाइल होता. त्यांनी त्यांच्या पतीला साजिद शेख यांना सांगितली. त्यांनी त्वरित साबू सिद्दीक मुसाफिर खाना येथील कर्मचाऱ्यांना ही गोष्ट जाऊन सांगितली.त्यांनी सीसीटीव्ही फुटेज चेक केले असता दोन महिला त्या ठिकाणाहून पळून जाताना दिसल्या. त्यांनी नंतर फाईंड माय डिवाइस ॲपमध्ये जाऊन लोकेशन ट्रॅक केले असता जवळपास मीटरच्या अंतरावर तो मोबाईल असल्याचे त्यांना समजले त्यानंतर त्यांनी माता रमाबाई आंबेडकरनगर पोलीस स्टेशन मुंबई हे गाठले. तेथे कार्यरत असलेले पीएसआय अनिल राठोड, पीएसआय अमोल चोरे, पीएसआय मीना भुजबळ यांनी मोबाईल वर असलेले लोकेशन तपासले असता त्वरित सूत्रे हलवली. पीएसआय अनिल राठोड व पीएसआय अमोल चोरे यांनी अवघ्या तीन मिनिटातच मोबाईल चोरणाऱ्या महिलेला अटक करून पोलीस स्टेशन येथे आणले. कुठल्याही प्रकारची तक्रार दाखल न करता कुठलीही दिरंगाई न करता माता रमाबाई आंबेडकरनगर पोलीस स्टेशन येथील पोलिसांनी पर्स व मोबाईल चोरून येणाऱ्या महिलेला पकडून आणले त्यानंतर शहानिशा करून पोलिसांनी पर्स व मोबाईल रुकसाना शेख यांना सुपूर्द केला. सर्व नागरिक पोलिसांच्या बाबतीत नेहमी तक्रार करत असतात, मात्र या घटनेने मुंबई पोलीस जगात सर्वांत कामगिरी करण्यामध्ये प्रसिद्ध आहे. शेख दांपत्याने पोलिसांचे मनापासून आभार मानले.

### मखमलाबाद विद्यालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती साजरी




**पंचवटी : वार्ताहर** मखमलाबाद श्री छत्रपती शिवाजी महाराज माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. प्राचार्य संजय डेर्ले, उपप्राचार्या विमल रायते, पर्यवेक्षक सुनील पाटील यांच्या हस्ते प्रतिमापूजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आला.कु. सर्वेश नरोटे व कु. हर्षल अहिरे (इ.५वी ड) यांनी मनोगत व्यक्त केले. शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे ते पिल्यास गुरगुरल्याशिवाय राहणार नाही. शिक्षित व्हा, संघटित व्हा व संघर्ष करा, असा बाबासाहेबांचा संदेश त्यांनी आपल्या भाषणातून दिला. तसेच ज्येष्ठ शिक्षक प्रताप काळे यांनी ही आपल्या भाषणातून बाबासाहेब हे सर्वांचेच होते. ते दीनदलितांचे, शेतकऱ्यांचे कैवारी होते. प्रत्येक भारतीय नागरिकाला समान अधिकार प्राप्त करून दिला, ते एका विशिष्ट जातीचे किंवा समाजाचे नसून, सर्वांचेच होते. बाबासाहेबांनी भारतातील सर्वांत श्रेष्ठ व्यक्ती कोण आहे? तर तो मतदार आहे, असा राज्यघटनेत उल्लेख केला. म्हणून मतदान करणाऱ्याला "मतदार राजा" असे संबोधले जाऊ लागले. अशा अनेक अप्रचलित राज्यघटनेतील कलमांबद्दल माहिती देत डॉ. बाबासाहेब आंबेडकर किती महान होते हे स्पष्ट केले. सूत्रसंचालन सविता आहेर तर ज्येष्ठ शिक्षक अनिल पगार यांनी आभार मानले. कार्यक्रमास सर्व शिक्षकवृंद व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

### अभिनव शाळेत डॉ. आंबेडकर जयंती



**पंचवटी : वार्ताहर** मराठा विद्या प्रसारक समाजाचे अभिनव बाल विकास मंदिर, मखमलाबाद येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी करण्यात आली. कार्यक्रमाचे अध्यक्ष शाळेचे मुख्याध्यापक प्रमोद ठाकरे यांच्या हस्ते प्रतिमापूजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आले. संजीवनी कोल्हे यांनी महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनकार्याविषयी माहिती सांगितली की स्वतंत्र भारताचे पहिले कायदामंत्री, पहिले न्यायमंत्री,भारतीय संविधानाचे शिल्पकार तसेच प्रख्यात कायदेपंडित डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे अस्पृश्य समाजाची अस्मिता जागवणारे पहिले महामानव होते. पददलितांना प्रकाशाचा मार्ग दाखवणारे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय जातिव्यवस्थेतील हरिजन समाजाच्या सुधारणेसाठी भरीव काम केले. अस्पृश्यतेची प्रथा संपविण्यामध्ये त्यांचा सिंहाचा वाटा होता. डॉ. बाबासाहेबांनी बौद्ध धर्माचा अभ्यास करून, भगवान गौतम बुद्धांची शिकवण तळागाळातील सर्व लोकांपर्यंत पोहोचवली. तसेच इयत्ता ३ रीच्या आदेश अहिरे व पायल खोटरे या विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले. सुत्रसंचालन शितल पाटील यांनी केले. कार्यक्रमास सर्व शिक्षकवृंद,शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

### सटाणा पालिकेतर्फे डॉ. आंबेडकर जयंती



**सटाणा : प्रतिनिधी** सटाणा नगर परिषदेच्या वतीने भारतीय घटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती उत्साहात साजरी. डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास तहसीलदार कैलास चावडे व सटाणा नगर परिषदेच्या प्रशासकीय अधिकारी संजना अहिरे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला. नगर परिषदेच्या महात्मा गांधी वाचनालय डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस संगणक अभियंता तुषार बागुल यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी नगर परिषदेचे अभियंता शुभम खेडकर, स्वच्छता निरीक्षक मनोहर बोरसे, दिनेश कचवे, कर निरीक्षक विनायक खैरनार, ग्रंथपाल ज्ञानेश्वर खैरनार, तलाठी जयप्रकाश सोनवणे, धनंजय भदाने, मोहन सोनवणे,प्रशांत सोनवणे, जितेंद्र पवार,उषा बच्छाव, सुनंदा सोनवणे,अनिल सोनवणे, प्रभाकर सोनवणे, पोपट देशमुख, विशाल वाघ, विनायक पाकळे, निलेश माळी, सागर मोरे, धनंजय सोनवणे, कृष्णा कासार, विवेक देसले, स्वप्निल सकट, रोशनी देवरे आदींसह नागरिक उपस्थित होते.

# १,३८७ ग्रामपंचायतींच्या सरपंचपदासाठी सोडत कार्यक्रम

## महिला आरक्षणही होणार जाहीर : २१, २३ आणि २४ रोजी तालुकानिहाय कार्यक्रम

**नाशिक : प्रतिनिधी**

नाशिक जिल्ह्यातील बिगर अनुसूचित क्षेत्रातील ८१० आणि अनुसूचित क्षेत्रातील ५७७ अशा एकूण १,३८७ ग्रामपंचायत सरपंचपदाच्या सोडतीचा कार्यक्रम जाहीर झाला असून, त्यातच महिला सरपंचपदाचेही आरक्षण काढले जाणार आहे. प्रथम एकत्रित आरक्षण २१ एप्रिल रोजी काढल्यानंतर २३ आणि २४ रोजी तालुकानिहाय महिला आरक्षण जाहीर करण्यात येणार आहे.

एकूण २०२ बिगर अनुसूचित क्षेत्रातील ग्रामपंचायतीकरिता सन २०२५ ते २०३० या कालावधीसाठी प्रवर्गनिहाय सरपंचपदाचे आरक्षण निश्चित करण्यात आले आहे. त्यामुळे त्या जागा सोडून जिल्ह्यातील इतर जागांसाठी आरक्षण सोडत काढण्यात येणार आहे. अशा सुमारे १,३८७ जागा असून, त्यांची सोडत २१ एप्रिल रोजी काढण्यात येईल. त्यानंतर महिला आरक्षण सोडत २३ व २४ एप्रिल रोजी काढली जाईल. त्यामध्ये ७०४ जागा महिला सरपंचपदासाठी राखीव आहे.

जिल्ह्यातील बिगर अनुसूचित क्षेत्रातील ८१० ग्रामपंचायती आहेत. त्यापैकी ४१४ महिलांसाठी राखीव आहेत. अनुसूचित क्षेत्रातील ग्रामपंचायतींची संख्या ५७७ असून, त्यापैकी २९० जागा महिलांसाठी राखीव आहेत.

सोमवार दि. २१ एप्रिल रोजी दुपारी १२ वाजता प्रत्येक तालुक्यात आरक्षण सोडत सभा तहसील कार्यालयात होणार आहे. तहसीलदारांच्या उपस्थितीत इगतपुरी, त्र्यंबकेश्वर, कळवण, चांदवड, दिंडोरी, नाशिक, निफाड, बागलाण, मालेगाव, येवला या तालुक्यांत महिला आरक्षण सोडत सभा २३ एप्रिल रोजी १२ वाजता होणार असून, इगतपुरी, त्र्यंबकेश्वर, कळवण, चांदवड, निफाड, येवला येथे दि. २४ रोजी महिला आरक्षण सोडत होणार आहे.

**बिगर अनुसूचित क्षेत्राबाहेरील जागा**

| | | |
|---|---|---|
| अनुसूचित जाती | : | ५४ |
| अनुसूचित जमाती | : | १०७ |
| नागरिकांचा मागास प्रवर्ग | : | २१८ |
| सर्वसाधारण प्रवर्ग | : | ४३१ |
| एकूण जागा | : | ८१० |
| अनुसूचित जमाती आरक्षण | | |
| एकूण जागा | : | ५७७ |
| महिला आरक्षण | : | २९० |

# 'कुसुमाग्रज'मध्ये रंगलेल्या संगीत मैफलीत दंग झाले श्रोते

**नाशिक :**




फार्मा मित्रमंडळाच्या वतीने आयोजित हिंदी चित्रपटातील गीतांची मैफल रविवारी (दि. १३) सायंकाळी ६ वाजात कुसुमाग्रज प्रतिष्ठानातील विशाखा सभागृहात पार पडली. मैफलीत सादर झालेल्या जुन्या-नव्या हिंदी चित्रपटातील गीतांनी श्रोते दंग झाले होते.

सर्वांसाठी प्रवेश नि:शुल्क असलेल्या या कार्यक्रमात गायक अजय पाटील, राज अक्कर, संतोष देहूकर, किशोर शिरूडे, जयदीप जाधव, दिनेश गोविल, मयुरी मुरडेश्वर, स्मिता पांडे, भाग्यश्री गायधनी, वैष्णवी पगारे, सारिका शिरूडे, सुरेश कापरे यांनी हिंदी चित्रपटांतील विविध गीते सादर करून रसिक श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले.

कार्यक्रमात 'एक लडकी को देखा, काटे नही कटते, कभी तू छलिया, माना हो तूम, शोखियो मे घोला, हद करदी आपने, चांद सिफारिश, बिन तेरे सनम, तुमसा कोई प्यारा, खिलते है गुल यहा, नाम गुम जायेंगा, सुरज हुवा मध्यम, लेकर हम दिवाना दिल' अशी वीस विविध गीते कलाकारांनी सादर केली.

# चेन स्नॅचिंग करणाऱ्या गुन्हेगारांना अटक

## १० गुन्ह्यांचा पर्दाफाश, ११.२३ लाखांचा मुद्देमाल जप्त; गंगापूर गुन्हे शोध पथकाची कामगिरी

**सिडको : विशेष प्रतिनिधी:-**

शहर पोलीस आयुक्त हद्दीतील गंगापूर, इंदिरानगर, सरकारवाडा, भद्रकाली, म्हसरूळ,पुणे शहर चंदननगर, दौंड, पिंपरी चिंचवड ) या पोलिस ठाण्यांच्या हद्दीसह पुणे शहर आणि पिंपरी चिंचवड पोलिस ठाण्यांच्या हद्दीत सोनसाखळी चोरीच्या छडा लावण्यात गंगापूर पोलिसाच्या गुन्हे शोध पथकाला यश आले आहे. नाशिक शहरातील विविध पोलीस ठाण्यांमध्ये दाखल असलेल्या चेन स्नॅचिंग व मोटारसायकल चोरीच्या एकूण १० गुन्ह्यांचा यशस्वी तपास करून ११,२३,६८८/- रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला आहे. या कारवाईत चार आरोपी आणि तीन विधी संघर्षित बालकांना अटक करण्यात आली आहे.



दि. २९ मार्च २०२५ रोजी गंगापूर रोडवरील शांतिनिकेतन चौकाजवळ एका महिलेची सोन्याची चेन चोरुन नेल्याची घटना घडली होती. या प्रकरणी गंगापूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. या गुन्ह्याच्या तपासात पोलिस हवालदार रवींद्र मोहिते यांना मिळालेल्या गुप्त माहितीनुसार, पोलिस उपनिरीक्षक मोतीलाल पाटील यांच्या नेतृत्वाखाली सापळा रचून अक्षय सुनील बोरकर (१९), राज सखाहरी गायकवाड (१९),परवेझ उर्फ सोनू जावेद मनियार (२४),विलास प्रमोद विसपुते (३९) यांच्यासह तीन विधी संघर्षित बालकांना अटक करण्यात आली. नाशिक शहर पोलीस आयुक्त संदीप कर्णिक, पोलीस उपायुक्त (परिमंडळ १) किरणकुमार चव्हाण आणि सहायक पोलीस आयुक्त नितीन जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली. ही यशस्वी मोहीम गंगापूर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक जग्वेंद्रसिंग राजपूत, पोउनि मोतीलाल पाटील आणि त्यांचे गुन्हे शोध पथक यांनी अमलात आणली.तपास अजूनही सुरू आहे.

**जप्त मुद्देमाल**

८ सोन्याच्या साखळ्या
एकूण वजन सुमारे ९५ ग्रॅम,
किंमत ७,८८,८८८/, २ मोटारसायकली (बजाज पल्सर व रायडर) अंदाजे किंमत २,२०,०००/-हस्तगत होणाऱ्या सोन्याचे मूल्य: २,१४,८००/-
एकूण हस्तगत मुद्देमाल ११,२३,६८८/-



# एस. जी. माध्यमिकमध्ये मनोरंजक अन् ज्ञानवर्धक उन्हाळी शिबिर

**सिन्नर : प्रतिनिधी**

एस. जी. पब्लिक स्कूलच्या इंग्रजी विभागात अध्यक्ष अण्णासाहेब गडाख, उपाध्यक्ष दौलतराव मोगल यांच्या प्रेरणेतून व संस्थेचे सीईओ, अभिषेक गडाख यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांसाठी ९ एप्रिल ते २४ एप्रिल या कालावधीत एका खास उन्हाळी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिराची सुरुवात नुकतीच, ९ एप्रिल रोजी झाली असून, विद्यार्थ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे.

शिबिरामध्ये ३ ते ५ वयोगटातील चिमुकल्यांसाठी खेळ आणि म नोरंजनाच्या माध्यमातून शिक्षणाची अनोखी योजना आखण्यात आली आहे. लहान मुले या शिबिराचा पुरेपूर आनंद घेत आहेत. तर ८ ते १४ वयोगटातील विद्यार्थ्यांसाठी मूल्यशिक्षणावर विशेष लक्ष केंद्रित केले जात आहे. त्यांच्यात चांगले संस्कार रुजावेत यासाठी विविध उपक्रम घेतले जात आहेत. यासोबतच, विद्यार्थ्यांचे भाषिक कौशल्य वाढावे यासाठी मराठी, हिंदी आणि इंग्रजी या तिन्ही भाषांच्या व्याकरणाचे शिक्षण दिले जात आहे. याव्यतिरिक्त, विद्यार्थ्यांना जीवनातील अनमोल मूल्यांची शिकवणही दिली जात आहे.

गणित हा विषय अनेक विद्यार्थ्यांसाठी कठीण असतो, परंतु या शिबिरात त्याला मनोरंजक बनवण्यात आले आहे. वैदिक गणिताच्या सोप्या ट्रिक्सच्या मदतीने विद्यार्थ्यांमध्ये गणिताची आवड निर्माण करण्याचा प्रयत्न केला जात आहे. ज्यामुळे त्यांचे मनोरंजनही होते आणि ज्ञानातही भर पडते. शिबिराची सुरुवात योगा सूर्यनम स्कार अशा आनंददायी उपक्रमाने होते यामध्ये विद्यार्थ्यांना कराटे याचबरोबर विविध खेळ घेतले जातात.या उन्हाळी शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी विद्यालयाचे प्राचार्य आणि सर्व शिक्षकवृंद परिश्रम घेत आहेत.




# डॉ. आंबेडकरांचे विचार मनामनांत पोहोचवा : देशमुख

**नाशिक : प्रतिनिधी**

विद्यार्थ्यांनी शाहू, फुले, अहिल्याबाई होळकर, राजे शिवाजी महाराज या महान विभूतींच्या विचारांचा आदर घेऊन व बाबासाहेब आंबेडकरांसारखे उच्चशिक्षित होऊन आपल्या जीवनात आपण खूप मोठे होऊन समाजाचे देणे लागू हा विचार सतत आपल्या मनात तेवत ठेवा, असे बालविज्ञान विकास शिक्षण प्रसारक संस्थेचे सेक्रेटरी व मुख्याध्यापक एस.बी.देशमुख यांनी केले. पाताळेश्वर माध्यमिक विद्यालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्ताने अयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. याप्रसंगी कविता रेवगडे स्मृतिप्रीत्यर्थ संविधान प्रती भेट देण्यात आल्या. यावेळी चंद्रभान रेवगडे, प्रमुख अतिथी भाग्यश्री पाटोळे (पोलिस पाटील, आशापुर), गणेश रेवगडे (पोलिस पाटील, पाडळी),मुळक सर, दशरथ पाटोळे, रामहरी रेवगडे, गणेश शिंदे, धनंजय रेवगडे, करण रेवगडे, केशव रेवगडे,भास्कर बोगीर, यांनी आदरांजली वाहिली. उपशिक्षक आर.व्ही.निकम यांनी बाबासाहेबांच्या जीवनचरित्राचे पैलू उलगडताना साधी राहणी व उच्च विचार अंगी बाळगा. संविधानातील हक्क समजून घ्या व त्यांचे अनुकरण करा असे सांगितले. याप्रसंगी विद्यालयातील विद्यार्थ्यांनी भारतीय संविधानाचे वाचन केले.

याप्रसंगी बालविज्ञान विकास शिक्षण प्रसारक संस्थेचे कोषाध्यक्ष व विद्यालयातील उपशिक्षक टी.के. रेवगडे,बी.आर. चव्हाण, एस.एम. कोटकर, एम.एम. शेख, सी.बी.शिंदे, के.डी.गांगुर्डे,एस. डी.पाटोळे, आर. एस.ढोली, ए.बी.थोरे हे उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सविता देशमुख यांनी केले व गिरी आर. टी. यांनी आभार मानले.

### साखर उत्पादन गेल्या वर्षीच्या तुलनेत कमी

**पुणे : प्रतिनिधी**

राज्यातील उसाचा गाळप हंगाम जवळपास संपत आला असून साखर उत्पादन गेल्या वर्षीच्या तुलनेत कमी झाले आहे.म्हणजे ८० लाख टन झाले असून अजून तीन कारखाने सुरू असल्याची माहिती सांगण्यात आली.देशातील साखर उत्पादनाचा विचार करता २४७ लाख टन साखर तयार झाली आहे गेल्या वर्षीच्या तुलनेत कमी झाले आहे .गेल्या वर्षात देशात ३१९ लाख टन साखर उत्पादन झाले होते. तसेच महाराष्ट्रात ११० लाख टन आणि उत्तर प्रदेशात १०४ लाख टन साखरेचे उत्पादन झाले होते असे असले तरी गेले काही वर्ष साखर उत्पादनात महाराष्ट्र आघाडीवर होता. देशाचा विचार करता उत्तर प्रदेश महाराष्ट्र,कर्नाटक,गुजरात,मध्य प्रदेश आणि तामिळनाडू या राज्यात उसाचा हंगाम घेण्यात येतो त्यात महाराष्ट्र आणि उत्तर प्रदेश या राज्यात उसाचे प्रमाण अधिक आहे राज्यात १०० ते १५० दिवस हंगाम सुरू राहतो.

# एकत्र चाललो तर अधिक चांगले चालतो!

## पार्किन्सनच्या रुग्णांसाठी पीडीएमडीएसची मोफत सेवा

**नाशिक : प्रतिनिधी**

एप्रिल महिना हा पार्किन्सन म्हणून ओळखला जातो. पार्किन्सन आजाराची सुरुवात हळू गतीने आणि सूक्ष्म लक्षणांसह होत असल्यामुळे या रोगाचे निदान उशिरा होते. वयाच्या तिशीपासून ऐंशीपर्यंत पार्किन्सन आजाराचे रुग्ण आढळतात. नाशिकमध्ये असलेली पीडीएमडीएस ही संस्था नाशिक येथे रुग्णांसह त्यांच्या नातेवाइकांनाही प्रशिक्षित केले जात आहे. रुग्णांना नित्याची कामे करता येणे सोपे जावे यासाठी फिजिओथेरपीसह ऑक्युपेशनल थेरपी, स्पीच थेरपी, आहार व पोषण यावरील मार्गदर्शन, समुपदेशन, स्मरण व विचारक्षमता सुधारण्यासाठी हस्तक्षेप, तसेच कला, संगीत आणि नृत्य अशा सृजनात्मक थेरपीज यांचा समावेश करीत मोफत सेवा देत आहेत. या संस्थेत रुग्णांना एकमेकांकडून भावनिक आणि व्यावहारिक आधार देखील मिळतो.

**पीडीएमडीएस संस्थेविषयी**

पीडीएमडीएस ही एक संपूर्ण भारतात कार्यरत असलेली सेवाभावी संस्था आहे. जी प्रख्यात न्यूरोलॉजिस्ट पद्मश्री डॉ. बी. एस. सिंगल यांनी २००१ मध्ये स्थापन केली. या संस्थेचा उद्देश म्हणजे भारतातील पार्किन्सनग्रस्त व्यक्ती आणि त्यांच्या कुटुंबीयांचे जीवनमान उंचावणे व त्यांच्या जीवनात सकारात्मक बदल घडवून आणणे. अधिक माहितीसाठी +९१ ९९८७२१६०५७ संपर्क करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. वेबसाइटलाही भेट देता येईल.
**www.parkinsonssocietyindia.com**


**जगभरात एक कोटी रुग्ण**

पार्किन्सन रोग हा आयुष्यभर चालणारा, हळूहळू वाढत जाणारा मेंदूशी संबंधित विकार आहे. जो शरीराच्या हालचालींवर परिणाम करतो.

या रोगाचे नेमके कारण अजून स्पष्ट झालेले नाही, परंतु याचे प्रमुख कारण मेंदूमध्ये डोपामिन नावाचे रसायन तयार करणाऱ्या पेशींचा नाश होणे असे मानले जाते. जगभरात १ कोटीहून अधिक लोक पार्किन्सन रोगाशी झुंज देत आहेत, ज्यामध्ये भारतातील संख्याही लक्षणीय आहे.

**ही आहेत लक्षणे**

अंगातील थरथर, स्नायूंमध्ये ताठरता, हालचालींचा मंदपणा, शारीरिक संतुलनाचा अभाव आणि समन्वय साधण्यात अडचणी. या हालचालींशी संबंधित लक्षणांमध्ये कालांतराने वाढ होत जाते, ज्यामुळे चालण्यात अडचण, चेहऱ्यावर भाव न दिसणे आणि बारीक हालचाली करणे लेखन यामध्ये अडथळे येऊ लागतात. रोग जसजसा प्रगत होतो, तसतसे स्मृती व विचारशक्तीतील बदल, नैराश्य आणि अन्य लक्षणे दिसून येतात जे व्यक्तीच्या जीवनमानावर गंभीर परिणाम करू शकतात. ग्रस्त रुग्ण आणि त्यांचे सेवा करणारे नातेवाईक यांच्यासाठी पीडीएमडीएस संस्था दिलासा देणारी ठरणार आहे.



एप्रिल महिना हा पार्किन्सन जनजागृती महिना म्हणून साजरा केला जातो. पर्किसन्स् आजाराबद्दल जनजागृती करण्यात येत असून, पीडीएमडीएस संस्थेद्वारे नाशिकमध्ये मोफत सेवा दिली जात आहे. रुग्ण किंवा नातेवाइकांनी संपर्क केल्यास मदत मिळू शकते.

**-वर्ना क्वार्डोस**
**पार्किसन्स् सोयायटी**

MAHAGENCO
Maharashtra State Power Generation Co. Ltd.

**E-Tender Notice**

Chandrapur Super Thermal Power Station MAHAGENCO, invites bid offers from reputed and experienced Companies to Participate in the Competitive bidding Process to following O&M Tenders.

| S. N. | Tender NO (Rfx No) / Descricption / Estimated Cost in Rs. |
|---|---|
| 1 | Test-II / Rfx No. 3000056535 / Work of servicing of actuator limit switch assemblies of Motorised Valves, Gates and Dampers during overhaul of Unit - 5 at CSTPS , Chandrapur / Rs.579280/- |
| 2 | BM-I / Rfx No. 3000056522 / Supply & Erection of Metallic Expansion joints for coal mill hot air duct, cold air duct, secondary air duct, hot air common duct, APH outlet P.A. duct of U # 4 COH at CSTPS, Chandrapur / Rs.2480100/- |
| 3 | EM-I / Rfx No. 3000056521 / Work of Overhauling/ Maintenance/ Servicing of LT Boards during Unit-4 Annual Overhaul at CSTPS, Chandrapur / Rs.741010.14/- |
| 4 | EM-I / Rfx No. 3000056518 / Work of ESP's Electrical maintenance during AOH of Unit-4 210MW at Stg-II, CSTPS, Chandrapur / Rs.717611/- |
| 5 | BMI / Rfx No. 3000056491 / Work of providing work assistance for bunker choke up removal by hammering and allied works in Unit-3 & 4 as and when required at CSTPS, Chandrapur / Rs.2764520/- |
| 6 | Technical / Rfx No. 3000056501 / Work of cleaning of Administrative Building , ORC, WRC, Dispensary, Security Office (Including Security Chouki) at CSTPS, Chandrapur for the period of two years / Rs.14636743.52/- |
| 7 | CHP-B-EM / Rfx No. 3000056572 / Supply, Installation and Commissioning of Microprocessor based Belt Weighers at BC-L2 & L3 LT Ropeway Durgapur, CHP-A, CSTPS, Chandrapur / Rs.1207565/- |
| 8 | CHP-D / Rfx No. 3000056571 / Work of development of detailed dimensional drawings of mechanical components of CHP Unit-8&9 CSTPS, Chandrapur / Rs.675000/- |
| 9 | CHP-D / Rfx No. 3000056570 / Work of replacement of Hydraulic luffing cylinder for Stacker Reclaimer in CHP -D CSTPS, Chandrapur / Rs.1732500/- |
| 10 | BM-I / Rfx No. 3000056550 / Design, manufacturing, supply, replacement & fitment of seals for SADC damper and servicing of SADC dampers for U-4 Boiler during AOH at CSTPS, Chandrapur / Rs.3764400/- |
| 11 | TM-I / Rfx No. 3000056557 / Work of strengthening/ cleaning of various tank and strainers during annual overhaul of Unit-4, CSTPS, Chandrapur / Rs.428366.42/- |

Above floated tender published in MAHAGENCO online Portal. For the detailed Tender document, interested bidders should visit SRM Website **https://eprocurement.mahagenco.in for (Sr. No. 01 to 11)** For any query Contact No. 8554991818.

**Sd/-**
**CHIEF ENGINEER (O&M)**
**CSTPS, CHANDRAPUR**

# डॉ. आंबेडकरांच्या जीवनावर आधारित विविध घटनांचे उपनगरला प्रदर्शन

**उपनगर वार्ताहर:**

उपनगर-गांधीनगर संयुक्त जयंती समितीतर्फे यावर्षी डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती आगळ्यावेगळ्या प्रबोधनात्मक पद्धतीने साजरी करण्यात आली. समितीतर्फे यंदा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्पर्शाने पावन झालेल्या कोट, शूज, काठी, हॅट आदी वस्तूंचा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनात घडलेल्या विविध घटनांचे चित्ररूपी प्रदर्शन तीन दिवस उपनगरच्या सुभेदार रामजी सभागृहात पार पडले.

संयुक्त जयंती समिती अध्यक्ष मनिष वडनेरे यांच्या आवाहनाला प्रतिसाद देऊन नागरिकांनी प्रदर्शन बघण्यास एकच गर्दी केली होती. प्रदर्शनाच्या यशस्वीतेसाठी



मार्गदर्शक प्रशांत दिवे, राहुल दिवे यांच्या मार्गदर्शनाखाली समितीचे मोहन पवार, अनिल जोंधळे, प्रवीण नवले, शिवम पाटील, कार्याध्यक्ष श्रीकांत काठे, उपाध्यक्ष मिलिंद पाटील, अनिल देठे, विल्यम कॉक्स, संजय लोखंडे, नीलेश सहाने, राहुल देवरे, सचिन पगारे ,चेतन राजपूत, जयंत देशमुख, सोनू चव्हाण, जयंत म्हैसधुणे आदी प्रदर्शन यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले.

### दुर्मिळ छायाचित्रे बघण्याचा योग

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३४ वी जयंती साजरी होत असताना उपनगर गांधीनगर संयुक्त जयंती उत्सव समितीतर्फे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची अतिशय दुर्मिळ छायाचित्रे पाहण्याचा योग या प्रदर्शनामुळे आला आणि एक ऐतिहासिकदृष्ट्या अतिशय महत्त्वपूर्ण दस्तऐवज पाहयला मिळाला. तसेच डॉ. बाबासाहेबांनी वापरलेले कपडे व त्यांची हॅट पाहून कृतकृत्य झालो, अशी प्रतिक्रिया नाशिकचे खासदार वाजे यांनी व्यक्त केली.



# दापूर प्राथमिक शाळेत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अभिवादन

**सिन्नर : प्रतिनिधी**

तालुक्यातील दापूर येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत महामानव विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३४ वी जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. शालेय व्यवस्थापन समितीचे उपाध्यक्ष अमोल आव्हाड व मुख्याध्यापक विश्वनाथ जाधव यांच्या हस्ते प्रतिमापूजन करण्यात आले.

यावेळी शाळेतील विद्यार्थ्यांनी डॉ. आंबेडकर यांच्या जीवनावर भाषणे केली. शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष ज्ञानेश्वर साबळे पाटील, उपाध्यक्ष भगवान आव्हाड, माजी सरपंच सोमनाथ आव्हाड, डॉ. विशाल नाईकनवरे, शिवाजी आव्हाड, भगवान आव्हाड, शिवाजी साबळे, मयूर पवार, सदस्या श्रीमती वैशाली काकड, मुख्याध्यापक विश्वनाथ जाधव, कृष्णकांत कदम, शांताराम सांगळे, श्रीमती गायत्री राजपूत, सुनंदा कोकाटे, मनीषा गोराडे, वैशाली जाधव, स्वाती झनकर, नीता वायळ आदी शिक्षक कर्मचारी, ग्रामस्थ व विद्यार्थी उपस्थित होते. सूत्रसंचालन कु. ईश्वरी पवार हिने केले. श्रीमती गायत्री राजपूत यांनी आभार मानले.

# नाशिककरांनी घेतला बंगाली संस्कृतीचा अनुभव

## बंगाली अड्डाचा समारोप

**नाशिक : प्रतिनिधी**

बंगाली बांधव हे महाराष्ट्राच्या मातीत दुधात साखर मिसळावी तसे मिसळून गेले आहेत, असे गौरवोद्गार सहायक आयुक्त क्राइम ब्रँच, नाशिक संदीप मिटके यांनी काढले. निमित्त होते ते शहरातील गोल्फ क्लब मैदानावर बंगाली अड्डा या दोन दिवसीय बंगाली खाद्य, कला व सांस्कृतिक महोत्सवाच्या उद्घाटनाचे. याप्रसंगी नाशिक महानगरपालिका उपायुक्त मयूर पाटील व मुंबई नाका पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक संतोष नरुटे, महोत्सवाच्या संयोजन समितीचे संयोजन समितीचे डॉ. संदीप रॉय, मिलन कान्यीदास, डॉ.प्रियनाथ घोष,बिधान हाजरा, अमिताभ चक्रवर्ती, संतशील बसू, सुरजित सेनगुप्ता,मृणाल हाजरा, सुमन घोष, समित्र मुखर्जी, डॉ.ए. के. शाह, सम्राट ग्रुपचे सुजॉय गुप्ता, उपस्थित होते. नाशिक शहरामध्ये अशा प्रकारच्या महोत्सवाचे पहिल्यांदाच आयोजन करण्यात आले होते. नाशिककरांना बंगाली संस्कृती, विविध शाकाहारी व मांसाहारी खाद्यपदार्थ तसेच कला, संस्कृती, क्रीडा, मनोरंजन व स्वातंत्र्यलढ्यातील बंगाली भाषिकांचा सहभाग कळावा हा या महोत्सवाचा हेतू आहे.

दुर्गादेवीची नृत्य व गायनाद्वारे प्रार्थना करून या महोत्सवाची सुरुवात करण्यात आली. महान बंगाली कवी, कादंबरीकार, नाटककार रवींद्रनाथ टागोर यांच्या गीतांवर नृत्ये तसेच बंगाली लोकसंस्कृती, आदिवासी संस्कृती तसेच बंगाली रॉक (युरोपियन शैली) इत्यादि विविध शैलीतील नृत्य व गायन, काव्य यांचा देखील उद्घाटनाच्या कार्यक्रमात समावेश होता. दिनांक १३ या महोत्सवाचा समारोप करण्यात आला.

## पुण्यात सोसायटीत शस्त्र घेऊन घुसले

**पुणे :** पुण्यातील धानोरी भागात असलेल्या सिद्रा गार्डन सहकारी गृहनिर्माण सोसायटीमध्ये ८ एप्रिलच्या पहाटे तीन सशस्त्र आणि मुखवटे घातलेल्या व्यक्तींनी घुसखोरी करून रहिवाशांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण केले.

या व्यक्तींनी काळ्या कपड्यांमध्ये, कोयत्यासारखी शस्त्रे हातात घेऊन, सोसायटीच्या आवारात संशयास्पद हालचाली केल्या. सीसीटीव्ही फुटेजमध्ये त्यांची ही हालचाल स्पष्टपणे दिसून आली आहे.या घटनेनंतर, रहिवाशांचे व सोसायटीचे वतीने यांनी विश्रांतवाडी पोलीस ठाण्यात आणि पुणे पोलीस आयुक्तांकडे तक्रार दाखल केली आहे.

# डुबेरे विद्यालयात डॉ. आंबेडकरांना अभिवादन




**सिन्नर : प्रतिनिधी**

तालुक्यातील डुबेरे येथील जनता माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात भारतीय घटनेचे शिल्पकार, महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना जयंतीनिमित्त अभिवादन करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे मुख्याध्यापक रंगनाथ उगले होते. व्यासपीठावर पर्यवेक्षक उल्हास पवार, ज्येष्ठ शिक्षक सोमनाथ पगार, विद्या ठाकरे, कचेश्वर शिंदे, सोमनाथ गिरी, सुनील ससाणे, वरिष्ठ लिपिक राणी शिंदे, रोहिणी भगत आदी उपस्थित होते.

उपस्थितींच्या हस्ते डॉ. आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. मुख्याध्यापक रंगनाथ उगले, उपशिक्षिका जयश्री गोहाड यांनी डॉ. आंबेडकर यांच्या जीवन व कार्याचा परिचय करून दिला. सूत्रसंचालन पी.आर.करपे यांनी केले. आभार रामदास वारुंगसे यांनी मानले. यावेळी डी. ए. रबडे, सीमा गोसावी, सोमनाथ बोडके, शिवाजी गुरुळे, उत्तम कामडी, रेवणनाथ कांगणे, रवि गोजरे, किशोर शिंदे, ज्ञानेश्वर कडभाने आदींसह शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

पान १ वरून

## काँग्रेसने मुस्लिम अध्यक्ष का केला नाही ?

पंतप्रधान मोदी म्हणाले, आता हरियाणातील श्रीकृष्णजींची पवित्र भूमी श्री रामजींच्या भूमीशी म्हणजे थेट अयोध्याशी जोडली गेली आहे. लवकरच हिसारहून इतर शहरांसाठीही विमानसेवा सुरू होईल. माझे वचन आहे की चप्पल घालणारेही विमानातून प्रवास करतील. गेल्या १० वर्षांत, कोट्यवधी भारतीयांनी आयुष्यात पहिल्यांदाच विमानाने प्रवास केला आहे. ज्या ठिकाणी चांगले रेल्वे स्थानके नव्हती तिथेही आम्ही नवीन विमानतळ बांधले आहेत. २०१४ पूर्वी देशात ७४ विमानतळ होते. आज देशातील विमानतळांची संख्या १५० च्या पुढे गेली आहे.

**काँग्रेसने धर्माच्या आधारावर आरक्षण दिले**

पंतप्रधान म्हणाले, काँग्रेसने बाबासाहेबांचे काय केले हे आपण कधीही विसरू नये. काँग्रेसने त्यांना दोनदा निवडणुकीत पराभूत करून त्यांचा अपमान केला. काँग्रेस संविधानाचा नाश करणारी बनली आहे. कर्नाटकच्या काँग्रेस सरकारने एससी, एसटी, ओबीसींचे पेन्शनमधील अधिकार हिसकावून घेतले आणि धर्माच्या आधारावर आरक्षण दिले.

## तेलंगणात एससी आरक्षणाचे तीन गटांत विभाजन

तेलंगणाचे मुख्यमंत्री रेवंत रेड्डी यांनी १७ मार्च रोजी राज्यातील ओबीसी (इतर मागासवर्गीय) आरक्षण मर्यादा २३% वरून ४२% करण्याची घोषणा केली. जर ते लागू झाले तर राज्यात आरक्षणाची मर्यादा ६२% पर्यंत वाढेल. हे सर्वोच्च न्यायालयाने ठरवलेल्या ५०% आरक्षण मर्यादेचे उल्लंघन करेल. तेलंगणाच्या मुख्यमंत्र्यांनी विधानसभेत म्हटले होते- 'काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी आश्वासन दिले होते की जर काँग्रेस सत्तेत आली तर ओबीसी आरक्षण ४२ टक्के केले जाईल. सत्ता हाती घेतल्यानंतर लगेचच आमच्या सरकारने जातीय जनगणना सुरू केली. ते म्हणाले- काँग्रेस सरकारने ओबीसी आरक्षण ३७ टक्के करण्यासाठी राज्यपालांना प्रस्ताव पाठवला होता. हे सरकार पूर्वीचा प्रस्ताव मागे घेत आहे आणि आता ४२ टक्के आरक्षणाचा नवीन प्रस्ताव पाठवत आहे. ओबीसी आरक्षण ४२ टक्क्यांपर्यंत वाढवण्यासाठी आम्ही आवश्यक कायदेशीर मदत घेऊ. मागासवर्गीयांना ४२ टक्के आरक्षण मिळेपर्यंत आम्ही शांत बसणार नाही.

## मेहुल चोक्सीला बेल्जियममध्ये अटक

चोक्सीनं त्याची कंपनी गीतांजली जेम्स आणि इतर काही बँक अधिकाऱ्यांच्या संगनमतानं पंजाब नॅशनल बँकेची फसवणूक केली. फसव्या पद्धतीनं एलओयू (लेटर्स ऑफ अंडरटेकिंग) जारी करण्यात आले आणि विहित प्रक्रियेचे पालन न करता एफएलसी (फॉरेन लेटर्स ऑफ क्रेडिट) वाढवण्यात आले आणि बँकेचे चुकीच्या पद्धतीनं नुकसान झालं, असा आरोप ईडीने केला.

**१३,८५० कोटींच्या फसवणुकीचा आरोप**

पीएनबीला १३,८५० कोटी रुपयांचा घोटाळा केल्याच्या आरोपाखाली सीबीआय आणि ईडीने मेहुल चोक्सीवर खटला चालवत आहेत. चोक्सीचा पुतण्या नीरव मोदी हा देखील या प्रकरणात आरोपी आहे, जो लंडनमध्ये लपून बसला आहे. त्याच्या प्रत्यार्पणाचीही प्रतीक्षा आहे. दरम्यान, बँकांना लुटून मेहुल चोक्सीने परदेशात पळ देखील काढला होता. त्यानंतर चोक्सीशी संबंधित असणाऱ्या २५६५ कोटी रुपयांच्या मालमत्तेवर ईडीकडून कारवाई करण्यात येत होती. मेहुल चोक्सीची ज्या बँकांची फसवणूक केली त्या बँकांना मालमत्ता परत करण्याची प्रक्रिया लवकरच सुरु करण्यात येणार आहे.

## सलमानला मारण्याची पुन्हा धमकी

यातच काही महिन्यांपूर्वी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (अजित पवार गट) माजी आमदार बाबा सिद्दीकी यांची भर रस्त्यात गोळ्या झाडून हत्या करण्यात आली. बाबा सिद्दीकी आणि बॉलिवूड यांचे घनिष्ठ संबंध होते. सिद्दीकींच्या हत्येची जबाबदारी बिष्णोई गँगनं स्विकारली, त्यानंतर अख्खं बॉलिवूड हादरलं होतं. .

## मोदींवर टीका होताच संपत्ती जप्त होते

चर्चा, मंथन, चिंतन होणार आहे. सकाळी ९.३० वाजता आदित्य ठाकरे यांच्या हस्ते शिबिराचे उद्घाटन होणार आहे. सायंकाळी ६.३० वाजता उद्धव ठाकरे या शिबिरासाठी उपस्थित राहतील. उद्धव ठाकरे हे शिबिरासाठी मार्गदर्शन करतील. अंबादास दानवे, चंद्रकात खैरे, असीम सरोदे हे देखील पदाधिकारी आणि कार्कार्त्यांना मार्गदर्शन करणार आहे.

## वाल्मीक कराडच्या एन्काऊंटरची ऑफर

असे संकेत मिळत आहेत. या प्रकरणात आता आणखी मोठे खुलासे होण्याची शक्यता आहे. संबंधित अधिकाऱ्यांकडून या दाव्याची सत्यता तपासली जाणार आहे. दरम्यान, वाल्मिक कराडविरोधातील गुन्हा आणि सध्या सुरू असलेल्या न्यायालयीन प्रक्रियेकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे. कासले म्हणाले, मी सायबर गुन्हे शाखेत होतो. माझा आणि या प्रकरणाचा काही संबंधही नव्हता. पण तरीही मला ऑफर दिली गेली. पण मी एन्काऊंटर करण्यास नकार दिला.

# पावणेसात लाखांच्या दागिन्यांची हरवलेली बॅग परत मिळाली

**पिंपरी :**

प्रवासी महिला रिक्षातून प्रवास करताना पावणे सात लाख रुपयांचे दागिने असलेली बॅग रिक्षामध्ये विसरली. मात्र प्रामाणिक रिक्षा चालकाने ती बॅग पोलिसांमार्फत संबंधित प्रवासी महिलेला परत केली. ही घटना नेवाळेवस्ती चिखली येथे ११ एप्रिल रोजी घडली.नेवाळेवस्ती येथील प्रतिभा काळे यांनी ११ एप्रिल रोजी नेवाळेवस्ती येथून चिखली गाव येथे रिक्षाने प्रवास केला. चिखली गाव येथे उतरल्यानंतर रिक्षामध्ये त्यांची सोने असलेली पर्स विसरली असल्याचे निदर्शनास आले. त्यांनी तात्काळ चिखली



पोलिसांकडे धाव घेतली. प्रतिभा काळे यांना संबंधित रिक्षाचा क्रमांक माहिती नसल्याने रिक्षा चालकाचा शोध घेणे पोलिसांसमोरील आव्हान होते. पोलिसांनी नेवाळे वस्ती येथील रिक्षा स्टॉप वरून चिखली गाव दरम्यानच्या मार्गावरील २० सीसीटीव्ही कॅमेऱ्यांच्या फुटेजची पाहणी केली. त्यामधून प्रतिभा काळे यांनी प्रवास केलेल्या रिक्षाचा नंबर पोलिसांनी मिळवला. त्यानंतर संबंधित रिक्षा चालक बाळू जाधव (रा. चिखली) यांची पोलिसांनी भेट घेतली. त्यांची विचारपूस केली असता त्यांनी संबंधित बॅग सुरक्षित ठेवली असल्याचे सांगितले. तसेच दागिने असलेली बॅग रिक्षाचालक बाळू जाधव यांनी पोलिसांना परत केली. पोलिसांनी प्रामाणिक रिक्षाचालक बाळू जाधव यांचा सत्कार केला.परिमंडळ तीनचे पोलिस उपायुक्त डॉ. शवाजी पवार, सहायक आयुक्त अनिल कोळी, चिखलीचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक विठ्ठल साळुंखे, पोलिस निरीक्षक अमोल फडतरे यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक निरीक्षक राम गोमारे, पोलिस अंमलदार विनोद व्होनमाने, अमर कांबळे, कबीर पिंजारी, संतोष भोर, नारायण सोमवंशी यांच्या पथकाने ही कामगिरी केली



# सिन्नर फाटा भागात हनुमानाची काढली भव्य शोभायात्रा

**नाशिकरोड : वार्ताहर**

नाशिकरोड पूर्व भागातील विष्णूनगरमध्ये हनुमान जयंतीनिमित्त गत ६९ वर्षांपासून तरुण महाराष्ट्र मित्र मंडळ अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करत आले आहे. या वर्षीही येथे ह.भ.प. भागवत महाराज गतिर, बालकीर्तनकार आदिनाथ गुट्टे, मनोहर महाराज घोडे,रामदास महाराज सहाणे, गजेंद्र महाराज राजपूत, नंदकिशोर महाराज पवार, देवीदास महाराज वारूंगसे आणि कालिकानंद महाराज या हरिभक्त परायण कीर्तनकारांनी आपली कीर्तन सेवा येथे रुजू केली. हनुमान जन्मोत्सवानिमित्त सकाळी भव्य मिरवणूक काढून काल्याचे कीर्तनाने या हरी नामसप्ताहाचा समारोप केला. हनुमान जन्मोत्सव निमित्त काढण्यात आलेल्या भव्य शोभा यात्रेत श्रीराम व हनुमान यांची वेशभूषा केलेली बालक चित्ररथात होती. सियावर रामचंद्र की जय....., पवनपुत्र हनुमान की जय.....,अशा घोषणांनी परीसर दुमदुमून गेला होता. हनुमान मूर्तीवर प्रातःकाळी अभिषेक, पूजा हनुमान चालीसा पठण व महाआरती करण्यात आली. कार्यक्रमाचे संयोजन किशोर चव्हाण, सुरेश वाजे, राजेंद्र पवार, संजय घुले, प्रशांत बारगळ, संदीप गायकवाड, अनिल देसाई, प्रकाश पिंगळे, गणेश गायकवाड, शरद चव्हाण, अर्जुन गवते, तुषार डोके, संदीप गायकवाड, सागर बारगळ आदींनी केले होते.

# ग्लोबल इंटरनॅशनल स्कूल व ज्युनिअर कॉलेज येथे हनुमान जन्मोत्सव साजरा

**नाशिक : प्रतिनिधी**

ग्लोबल इंटरनॅशनल स्कूल व ज्युनिअर कॉलेज, नाशिक येथे हनुमान जन्मोत्सव १२ एप्रिल २०२५ रोजी भक्तिभावाने आणि उत्साहात साजरी करण्यात आली. आदरणीय चेअरमन श्री. केन केंद्रे सर यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी व शिक्षकांनी हनुमान चालीसा पठण, भजन आणि प्रभू हनुमान यांच्या गुणांवर भाषणे सादर केली.

श्री. केन केंद्रे सरांनी विद्यार्थ्यांना शक्ती, नम्रता आणि भक्ती या हनुमानजींच्या गुणांचा आदर्श घेण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाची सांगता प्रसाद वितरण व सर्वांच्या कल्याणासाठी सामूहिक प्रार्थनेने करण्यात आली.




**गांवकरी Classified** जाहिरातीसाठी संपर्क 9404434628

**पाहिजेत**

राणेनगर येथील टू व्हीलर व फोर व्हीलर शोरूमसाठी CRM/ DBM रिसेप्शनिस्ट, मेकॅनिक, सर्विस ॲडव्हायझर, स्पेअर पार्ट मॅनेजर, टेलीकॉलर, हाऊस कीपिंग, ऑफिस बॉय, वॉशिंग बॉय, अकाउंटंट त्वरित पाहिजेत. **संपर्क :** ९२७२०९१४२५

---

दुकान कामासाठी मुले व मुली पाहिजे.श्री गिफ्ट ॲण्ड टॉईज, कानडे मारुती लेन, नाशिक. **संपर्क-** ९८९००१३१३६

---

गंगापूररोड, पाईपलाईनरोडयेथील कन्स्ट्रक्शन कंपनीला कार्यालयीन कामकाजाकरिता १० वी-१२ वी पास-नापास ऑफिसबॉय पाहिजे. ८२३७३११२११

---

नामांकित बँकेच्या वसुलीसाठी डीआरए परीक्षा पास झालेले महिला व पुरुष उमेदवार पाहिजेत: संपर्क ९९६०३५०००५

---

स्विगी फूड कंपनीसाठी संपूर्ण नाशिक शहराकरिता डिलिव्हरी बॉय पाहिजे. कॉल करा **-अतिक सर** ९८३४१०९३३७

---

कोहिनूर ज्वेलर्स, पखाल रोड, अशोका मार्ग, १२ वी पास मुलगी पाहिजे. **संपर्क-**९८६०१३६५३६

**Name changed**

My Old Name TABASSUM BANO AHMED SAHEB KOKNI has been changed to My New Name **TABASSUM AHMED SAHAB KOKNI** as per Aadhar Card.

---

My Old Name AHMED RAZA KOKNI has been changed to My New Name **AHMED RAZA ABDUL KADIR KOKNI** as per Aadhar Card.

**जमीन विकणे आहे**

मंजूर तालुका कोपरगाव, जिल्हा अहिल्यानगर येथे जमीन विक्री करणे आहे, शिर्डी-लासलगाव हायवेजवळ/गोदावरी गंगा नदीचे पासून १.५ किलो मीटर अंतरावर ८ एकर विहीर बागायती जमीन विक्री करणे आहे. गट नंबर २८४/२,३,४,५ शिर्डीपासून २८ किलोमीटर मागे. **संपर्क-**८७८८०९२४१५

**विकणे आहे**

पाथर्डी फाटा, ज्ञानेश्वरनगर, साईसंकल्प बिल्डींग फ्लॅट विकणे आहे. पहिला मजला **संपर्क:** ९९७००३९०४६

**हरवले आहे**

प्रतिनिधीचे नाव कार्तिक कांबळे कर्मचारी आयडी - २४११३६००३२०१४२३ एजन्सीचे नाव - ashpa global services pvt. एचडीएफसी बँकेचे ओळखपत्र हरविले आहे तरी सदरील आयकार्ड कुणाला आढळून आल्यास कृपया **अभिजीत खरात ९७३०२१७९०७** या क्रमांकावर संपर्क साधावा

**Lost & Found**

Representative Name Karthik Kamble Employee ID - 241136003201423 Agency Name - ashpa global services pvt. HDFC Bank Identity Card is lost but if anyone finds the said I Card please contact Abhijit Kharat on 9730217907

**जाहिरात छोटी; किमया मोठी !**


## बाळाची हत्या

**अहमदाबाद :**

एका महिलेने आपल्या ३ महिन्यांच्या बाळाची हत्या केली. या २२ वर्षीय महिलेने आपल्या मुलाला भूमिगत पाण्याच्या टाकीत फेकून त्याची हत्या केली. या महिलेला पोलिसांनी अटक केली. पोलिसांनी या महिलेची चौकशी केली तेव्हा हत्येमागील कारण एकून पोलिसही चक्रावले. बाळ सतत रडतं या छोट्याशा कारणावरून या महिलेने ३ महिन्यांच्या मुलाला मारून टाकलं. करिश्मा बघेल असं बाळाची हत्या करणाऱ्या महिलेचे नाव आहे. या महिलेने बाळाची हत्या केली पण तिने आपले बाळ बेपत्ता असल्याचा दावा केला होता. बाळ कुठेच सापडत नसल्यामुळे महिलेच्या पतीने पोलिस ठाण्यात धाव घेत तक्रार दाखल केली होती. यानंतर पोलिसांनी या प्रकरणाचा तपास सुरू केला. पोलिसांनी ही महिला राहत असलेल्या अंबिकानगर परिसरातील तिच्या घरातील पाण्याच्या टाकीची झडती घेतली त्याठिकाणी त्यांना बाळाचा मृतदेह आढळून आला.

माहितीनुसार, करिश्मा बघेल असं बाळाची हत्या करणाऱ्या महिलेचे नाव आहे. बाळ कुठेच सापडत नसल्यामुळे महिलेच्या पतीने पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली होती. पोलिसांनी ही महिला राहत असलेल्या घरातील पाण्याच्या टाकीची झडती घेतली असत मृतदेह आढळून आला.


**ग्रामपंचात सावरगाव, ता.निफाड, जि. नाशिक**

**जाहीर ई- निविदा सूचना क्र. ०६/२०२४-२५ (प्रथम प्रसारण)**

ग्रामपंचायत सावरगाव ता.निफाड, जि. नाशिक येथे १५ वित्त आयोग योजने सावरगाव येथे बाकडे खरेदी करणे करीता ई-निविदा दिनांक १२/०४/२०२५ पासून शासनाच्या **www.mahatender.gov.in** प्रसारित करण्यात येत आहे. अधिक माहितीसाठी वरील वेबसाईटवर उपलब्ध असून ठेकेदारांनी ई- निविदा भरण्याबाबतची कार्यवाही करावी. निविदा स्वीकारणे अथवा नाकारणे याबाबतचे अंतिम अधिकार ग्रामपंचायत सावरगाव, ता.निफाड, जि. नाशिक यांच्याकडे राखून ठेवण्यात आले आहे.

**सही /-ग्रामसेवक** **सही/-सरपंच**

**ग्रामपंचायत सावरगाव, ता.निफाड, जि. नाशिक**



**जाहीर नोटीस (फारकत)**

तमाम लोकांस विशेषतः **समाधान वामन गांगुर्डे** रा. शिंगवे, ता. निफाड जि.नाशिक यांस आमचे पक्षकार **सौ. योगिता समाधान गांगुर्डे** द्वारा **महेंद्र युवराज सोनवणे** रा. सायखेडा ता. निफाड जि. नाशिक यांचेकडून जाहीर फारकत नोटीसद्वारे कळविण्यात येते की, आमचे पक्षकार व तुमचा विवाह साधारणतः **१२** वर्षापूर्वी भिल्ल आदिवासी समाजाचे चालीरितीनुसार संपन्न झालेला आहे. लग्नसबंधातून दोन अपत्य नामे **तेजस** व **समिर** ही झालेली आहे. विवाहानंतर तुमचा व आमचे पक्षकाराचा कसाबसा **७ वर्ष** संसार चालला. त्यानंतर तुम्ही आमचे पक्षकाराचे चारित्र्यावर संशय घेऊ लागले. तसेच आमचे पक्षकार हे देखील तुमचेवर चारित्र्यावर संशय होता. त्यामुळे दोघांमध्ये भयंकर असे मतभेद झाले व साधारणतः गेल्या दीड वर्षापासून आमचे पक्षकार ही तिचे काकाकडे राहात आहे. परंतु दरम्यानचे काळात दोघा आपसामध्ये परस्पर समंतीने घटस्फोट घेण्याचे व देण्याचे ठरले व दोन्ही मुले ही तुम्ही तुमचेकडे ठेवुन घ्यायचे परंतु त्यानंतर तुमचे व आमचे पक्षकाराचे दरम्यान आपसात संपर्क झाला नाही वरील कारणामुळे तुमचेकडे राहाणे असहय झालेले आहे. सबब नोटीस प्रसिध्दीपासून **पाच** दिवसांचे आत लेखी हमी देवुन नांदणेस घेऊन जाणे अन्यथा हीच फारकत समजणेत येईल यापुढे उभयंताचे दरम्यान पतीपत्नीचे नाते राहणार नाही व आपण नविन घरोबा करण्यास मोकळे होऊ व तुमचा आमचे पक्षकारासोबत झालेला **१२ वर्षाचा** विवाह संपुष्टात येईल कळावे ही जाहीर फारकत असे.

**आमचे पक्षकाराची सही/-**
**सौ. योगिता समाधान गांगुर्डे**

**आमचे मार्फत प्रसिध्द**

**श्री. शशिकांत नरहरी खापरे**
**ॲडव्होकेट व नोटरी निफाड न्यायालय**
**चेंबर नं. ४०५/१ ता.निफाड जि.नाशिक मोबा नं. ९८२३१६०००३**

गांवकरी



## महत्त्वाचे



### प्रज्ञाशोध गुणवत्ता यादीत अभिनव शाळेचे २०५ विद्यार्थी

**नाशिक :** अभिनव बालविकास मंदिर ही शाळा नावाप्रमाणेच आपले अस्तित्व टिकवून आहे. विद्यार्थ्यांना दैनंदिन शिक्षणाबरोबरच विविध प्रकारचे संस्कार येथे मिळतात. व्यक्तिमत्त्व विकासाबरोबरच विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळण्याच्या दृष्टिकोनातून अनोखे उपक्रम, विविध स्पर्धांचे आयोजन केले जाते, असे प्रतिपादन मविप्रचे सरचिटणीस ॲड. नितीन ठाकरे यांनी केले. गंगापूर रोडवरील अभिनव बाल विकास मंदिर शाळेत मविप्र प्रज्ञाशोध परीक्षेच्या बक्षीस वितरण सोहळ्याप्रसंगी अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते. याप्रसंगी मविप्र समाज संस्थेचे संचालक ॲड. लक्ष्मण लांडगे, शिक्षणशास्त्र महाविद्यालयाच्या प्राचार्या लता मोगल, शालेय समिती सदस्य हिरामण शिंदे उपस्थित होते. मुख्याध्यापिका मीनाक्षी गायधनी, ज्येष्ठ शिक्षिका रंजना पाटील, अर्चना ठाकरे, मंगला दवंगे, विलास जाधव व सर्व मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन व प्रतिमापूजन करण्यात आले. मुख्याध्यापिका मीनाक्षी गायधनी यांनी आपल्या प्रस्ताविकात इयत्ता तिसरी व चौथीच्या प्रज्ञाशोध परीक्षेस बसलेल्या व गुणवत्ता यादीत आलेल्या विद्यार्थ्यांचे, मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षकांचे,पालकांचे कौतुक केले. प्राचार्या लता मोगल यांनी शाळेचे व मुख्याध्यापिका मीनाक्षी गायधनी यांचे कौतुक केले. आलेल्या मान्यवरांच्या हस्ते गुणवत्ता यादीत आलेल्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र, मेडल, तसेच बक्षीस देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षकांचाही मेडल व पुस्तक देऊन सत्कार करण्यात आला. वंदना शिरसाठ यांनी सूत्रसंचालन केले. आभार अर्चना ठाकरे यांनी मानले.



### कळवणचा विठ्ठल मंदिर सभामंडप पूर्णत्वाकडे

**कळवण :** प्रति पंढरपूर अशी ओळख असलेल्या कळवणच्या गांधी चौकातील श्री विठ्ठल मंदिरातील सभामंडपाच्या बांधकामासाठी आमदार नितीन पवार यांनी ५० लाख रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला आहे. आजमितीस सभामंडपाचे काम ७५ टक्के पूर्ण झाले आहे. लवकरच त्याचे उद्घाटन व लोकार्पण होणार आहे. या सभामंडप बांधकामाची पाहणी आमदार नितीन पवार, नगराध्यक्ष कौतिक पगार, कळवण बाजार समितीचे सभापती धनंजय पवार यांनी पाहणी केली. यावेळी आमदार पवार यांनी सभामंडपातील कामकाजाबद्दल समाधान व्यक्त करीत उर्वरित काही कामे करण्याच्या सूचना केल्या. निधीची आवश्यकता असल्यास उपलब्ध करून देण्याची ग्वाही यावेळी आमदार पवार यांनी दिली. सार्वजनिक व धार्मिक कार्यक्रमांसाठी जागा कमी पडत असल्यामुळे मंदिरासमोरील जागेत सभामंडप बांधण्याची मागणी आमदार नितीन पवार यांच्याकडे केली होती. यावेळी आमदार पवार यांनी सभामंडप बांधकामासाठी ५० लाख रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला आहे. यावेळी गजेंद्र पवार, दादाजी पगार, संजय पगार, योगेश पगार, नाना पवार, ज्येष्ठ पत्रकार मनोज देवरे उपस्थित होते.

### नाशिक-पेठ महामार्गावर मोटारसायकलस्वार जखमी

**उमराळे बुद्रुक :** गुजरात राज्याला जोडणाऱ्या नाशिक पेठ राष्ट्रीय महामार्ग वरील चाचडगाव पासून पुढे अपघाताची मालिका सतत सुरू असून तीन दुचाकीस्वार जखमी झाले. दोन मोटर सायकलस्वार नाशिककडून गुजरात दमणकडे जात असताना चाचडगाव टोलनाक्यावरील गतिरोधकावर मोटारसायकल क्रमांक डीडी ० ४८२३ मोटारसायकल घसरल्याने तर दुसरा मोटारसायकलस्वार हे घसरून पडल्याने दोघेही गंभीर जखमी झाले. त्यांना उमराळे बुद्रुक येथील प्राथमिक आरोग्य केंद्र येथे रुग्णवाहिका चालक बापू खिरकाडे यांनी त्वरित दाखल केले. निफाड तालुक्यातील देवगाव येथील चंद्रकांत दत्तात्रय निफाडे,आवजीनाथ सुखदेव खेडकर करोडी तालुका पाथर्डी, उत्तम तारू व लक्ष्मी प्रज्ञावान तारू हे गंभीर जखमी झाले. गुजरात राज्याला जोडणाऱ्या नाशिक-पेठ राष्ट्रीय महामार्गावर मोठमोठे खड्डे पडले असून मोटरसायकल चालवताना मोठी कसरत करावी लागत आहे.

### श्रद्धा ज्येष्ठ नागरिक मंडळाची निवडणूक बिनविरोध



पाराजी आभाळे

**म्हसरुळ :** येथील श्रद्धा ज्येष्ठ नागरिक मंडळाची २०२५- २०२८ त्रैवार्षिक निवडणूक बिनविरोध झाली. विद्यमान सहा सदस्य पाराजी आभाळे, पुंडलिक रानोळे, दत्तात्रय कुलकर्णी, अरविंद बोरसे, अशोक जोशी, रामकिसन अग्रवाल यांची पुन्हा बिनविरोध निवड झाली. तसेच रेवाजी बोंडे, इंदू चौधरी, कुंदा गडकरी, रमेश दीक्षित, शिवाजी भदाणे यांची नवनियुक्त सदस्यपदी निवड झाली. मंडळाच्या अध्यक्षपदी पाराजी आभाळे, उपाध्यक्षपदी पुंडलिक रानोळे, सचिवपदी शिवाजी भदाणे, कोषाध्यक्षपदी दत्तात्रय कुलकर्णी, सहसचिव अरविंद बोरसे, सहकोषाध्यक्ष रमेश दीक्षित, यांची नूतन कार्यकारिणीत निवड करण्यात आली. वसंतराव कुलकर्णी यांनी निवडणूक अधिकारी म्हणून काम पाहिले. निवडणूक बिनविरोध व्हावी यासाठी अध्यक्ष पुरुषोत्तम पांडे, सचिव देवकिसन व्यास यांनी परिश्रम घेतले.



### मनपा उर्दू शाळेत डॉ. आंबेडकर जयंती

**जुने नाशिक :** शिक्षा ही सवालों को जन्म देती है म्हणूनच भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी शिका, संघटित व्हा व संघर्ष करा, असे म्हटले असल्याची माहिती डॉ. आंबेडकर जयंतीनिमित्त विविध मनपा उर्दू प्राथमिक शाळात काल (दि.१४) आयोजित कार्यक्रमात काही विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त करताना दिली आहे. दरम्यान कथडा येथील मनपाच्या डॉ. सुमंत नाईक उर्दू शाळा क्रमांक ४१ मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती साजरी करण्यात आली. यावेळी मनपा उर्दू विभागाच्या केंद्रप्रमुख हमीदा अन्सारी, नजमा शेख, फरजाना शेख व शाळेतील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येत उपस्थित होते. दरम्यान बडी दर्गाह येथील पिंजार घाट मनपा उर्दू हायस्कूल येथेही जयंतीनिमित्त कार्यक्रम घेण्यात आला.

# दोघा संशयितांकडून चार कोयते जप्त

## गुंडाविरोधी पथक, एटीएसची कारवाई

**सिडको : विशेष प्रतिनिधी**

**शहरात गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी गुंडाविरोधी पथक व दहशतवादविरोधी पथक (एटीएस) यांनी संयुक्तरीत्या शहरात मोठी कारवाई करत दोन संशयित आरोपींना ताब्यात घेतले आहेत. त्यांच्याकडून चार लोखंडी कोयते जप्त करण्यात आले आहेत.**



गुंडाविरोधी पथकाचे प्रभारी अधिकारी सहाय्यक पोलिस निरीक्षक ज्ञानेश्वर मोहिते यांना मिळालेल्या गोपनीय माहितीवरून ही कारवाई राबवण्यात आली. माहितीनुसार, शादीक शब्बीर शेख (२१, रा. काबंळेवाडी, सातपूर) याने प्रणव उर्फ अमीन तुकाराम बोरसे (३४, रा. वावरेनगर, अंबड) याला कोयते पुरवले होते. या माहितीच्या आधारे दोघांनाही ताब्यात घेऊन चौकशी केली असता, त्यांच्या ताब्यातून चार कोयते जप्त करण्यात आले. या दोघांवर भारतीय हत्यार कायदा व पोलीस आयुक्तांचे विनापरवाना कोयते बाळगण्याच्या मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याप्रकरणी अंबड पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

ही कारवाई पोलीस आयुक्त संदीप कर्णीक यांच्या आदेशानुसार व पोलीस उप आयुक्त (गुन्हे) प्रशांत बच्छाव आणि सहायक पोलीस आयुक्त (गुन्हे) संदीप मिटके यांच्या मार्गदर्शनाखाली तर गुंडा विरोधी पथकाचे अधिकारी ज्ञानेश्वर मोहिते, विजय सूर्यवंशी, प्रदीप ठाकरे, गणेश भागवत, अक्षय गांगुर्डे, राजेश राठोड, कल्पेश जाधव तसेच एटीएसचे पोलीस निरीक्षक शेंडे व इतर अधिकाऱ्यांनी संयुक्तपणे कारवाई केली.

# आत्याच्या मुलाकडून बदनामी

## आडगाव पोलिस ठाण्यात गुन्हा

**पंचवटी : वार्ताहर**

आत्याच्या मुलाने मोबाइलवर कॉल करून रस्त्यात अडवून हात धरत लग्नाची मागणी करत लैंगिक संबंधाची मागणी केली. तसेच शिवीगाळ करून जमलेले लग्न मोडून बदनामी केल्याप्रकरणी आडगाव पोलिस ठाण्यात तिघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ऑक्टोबर २०२३ पासून ते दि.१२ एप्रिल २०२५ पर्यंत फिर्यादी मुलीच्या आत्याचा खेरवाडी येथील मुलगा याने आत्याच्या मुलीशी वेळोवेळी मोबाइलवर कॉल करून तसेच रस्त्यात अडवून लग्नाची व लैंगिक संबंधाची मागणी केली. तिला अडवून अमोलसोबत लग्न नाही केले तर उचलून घेऊन जाईल अशी धमकी दिली आहे. मुलीबाबत खोटी माहिती तिचे जमलेले लग्न मोडून बदनामी केली. तसेच अमोलचे काका बाळासाहेब उत्तम जाधव रा. खेरवाडी यांनी घरी जाऊन अमोल सोबत लग्न जमविण्यास नकार दिल्याने वडील व काका यांच्यासोबत भांडण करून शिवीगाळ करून वडीलांना मुलीचे लग्न कसे होते तेच बघतो, अशी धमकी दिली. याबाबत संशयित अमोल जाधव, ललित संगमनेरे, बाळासाहेब उत्तम जाधव सर्व राहणार रा. खेरवाडी ता. निफाड जि. नाशिक यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास वरिष्ठ पोलिस निरीक्षक सचिन खैरनार यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उपनिरीक्षक मयूर निकम करत आहेत.

# दोन वर्षांसाठी तडीपार आरोपी जेरबंद

## नाशिक गुन्हे शाखेची यशस्वी कारवाई

**सिडको : विशेष प्रतिनिधी**

नाशिक शहर गुन्हे शाखा युनिट क्र. १ च्या पथकाने एक मोठी कारवाई करत दोन वर्षांसाठी नाशिक शहरातून तडीपार करण्यात आलेल्या अल्ताफ अलिम सय्यद (वय २६, रा. पाटीलनगर, सिडको, नाशिक) या आरोपीला अटक केली आहे.

हवालदार महेश साळुंके यांना गुप्त बातमीदारामार्फत मिळालेल्या माहितीच्या आधारे हे यश मिळाले. माहिती मिळताच वरिष्ठ पोलीस निरीक्षक मधुकर कड यांनी तत्काळ कारवाईचे आदेश दिले. पोलीस उपनिरीक्षक चेतन श्रीवंत, सुदाम सांगळे व त्यांच्या सहकाऱ्यांच्या पथकाने सेवन स्टार बेकरी, बडदेनगर, सिडको येथे सापळा रचून आरोपीचा शोध घेतला.

पोलिसांचा सापळा लक्षात येताच आरोपीने बेकरीच्या मागील पत्र्याच्या शेडमध्ये लपण्याचा प्रयत्न केला, मात्र पोलिसांनी शिताफीने त्याला पकडत अंबड पोलीस ठाण्यात दाखल केले. त्याच्यावर महाराष्ट्र पोलीस कायदा कलम १४२ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ही कामगिरी पोलीस आयुक्त संदीप कर्णिक, पोलीस उपआयुक्त प्रशांत बच्छाव व सहाय्यक पोलीस आयुक्त संदीप मिटके यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. यामध्ये वरिष्ठ पोलीस निरीक्षक मधुकर कड, सपोनि हिरामण भोये, पोउनि चेतन श्रीवंत, सुदाम सांगळे आणि त्यांच्या पथकाने महत्त्वाची कामगिरी केली आहे.

# मुलीस पैसे का दाखवतो? विचारणा केल्याने विळा, कोयत्याने मारहाण

**लासलगाव : वार्ताहर**

मुलीस पैसे का दाखवतो, याची विचारणा केली म्हणून मुलीच्या आईस व मामास विळ्या, कोयत्याने मारहाण करून गंभीर जखमी केल्याचा प्रकार खडकमाळेगाव येथे घडला.

याबाबत काजल मधुकर शिंदे यांनी लासलगाव पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की, दि.१० एप्रिल रोजी सायं. ६ वाजता माझा भाऊ गोरख मधुकर शिंदे ह.मु. माळेवाडा, जि. अहिल्यानगर हा मला भेटण्यासाठी आला होता. मी पाणी घराच्या समोर फेकत असताना शेजारी राहणारा नातेवाईक गौरव संजय गुंजाळ हा मला व माझ्या मुलीला पैसे दाखवत होता. याबाबत जाब विचारल्याने संजय बाबुराव गुंजाळ, शुभम दिलीप गुंजाळ, दिलीप बाबुराव गुंजाळ यांना बोलावून मारहाण केली. शुभम दिलीप गुंजाळ याने गोरख याच्या डोक्यात मारून दुखापत केली तसेच गौरव संजय गुंजाळ याने त्याचे हातातील लोखंडी कोयत्याने पुन्हा भाऊ गोरख याचे डोक्यात मारून दुखापत केली. ओरडण्याचा आवाज ऐकून सागर प्रभाकर शिंदे, अलका प्रभाकर शिंदे, प्रभाकर मारुती शिंदे यांनी धावत येऊन सोडवणूक केली. फिर्यादीवरून सदर आरोपींच्या विरोधात लासलगाव पोलीस ठाण्यात विविध कलमान्वये गुन्हा दाखल झाला आहे. सहायक पोलिस निरीक्षक भास्करराव शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली पो.हवा. संदीप निचळ अधिक तपास करीत आहेत.

# सराईत गुन्हेगारांकडून पाच दुचाकींसह २ लाख ५० हजारांचा मुद्देमाल जप्त

## निफाड पोलिसांच्या कामगिरीचे नागरिकांकडून कौतुक

**निफाड : प्रतिनिधी/वि.प्र**

गाजरवाडी शिवारात वृद्ध दाम्पत्याच्या घरात प्रवेश करून जबरी चोरी करण्याच्या प्रयत्नात असणाऱ्या सराईत गुन्हेगारांना निफाड पोलिसांनी अवघ्या २४ तासांच्या आत जेरबंद करण्यात यश मिळविले. त्यांच्याकडून कोयता, ५ मोटारसायकलसह २ लाख ५० हजारांचा मुद्देमाल जप्त केला आहे. अत्यंत तत्पर केलेल्या या कारवाईचे निफाड तालुक्यातील नागरिकांकडून पोलिस निरीक्षक गणेश गुरव व त्यांचे सहकाऱ्यांचे कौतुक होत आहे.

दिनांक २० मार्च २०२५ रोजी रात्री १०.३० वाजेच्या सुमारास गाजरवाडी शिवारात राहणारे वृद्ध दाम्पत्याच्या घरात अनोळखी चार इसमांनी प्रवेश करीत यातील दोघांनी फिर्यादीस दाबून धरले तर अन्य दोन अनोळखी इसमांनी फिर्यादीस दाबून धरून आरडाओरड केला तर तिघांना पण कोयत्याने मारून टाकू, असा दम देऊन फिर्यादीचे तोंडाला चिकट पट्टी लावण्याचा प्रयत्न करीत फिर्यादीशी झटापट करीत असताना यात आरोपींच्या हातातील लोखंडी कोयत्याने फिर्यादीच्या हातावर मारून व दुखापत करून धाक दाखवत लूटमार करण्याचा प्रयत्न केला. तसेच पत्नी इंदुबाई व नातू आयुष यास मारून टाकण्याची धमकी देत त्यांच्याही हातावर वार करीत त्यांना जखमी केले म्हणून निफाड पोलिस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल झाला होता. नाशिक ग्रामीण जिल्हा पोलीस अधीक्षक विक्रम देशमाने, अप्पर पोलीस अधीक्षक मिरखेलकर, उपविभागीय पोलीस अधिकारी निलेश पालवे यांनी सदर घटनेतील अज्ञात आरोपींचा शोध घेत गुन्हा उघडकीस आणण्यासाठी निफाड पोलीस ठाणे यांनी सूचना दिल्या होत्या. त्यानुसार निफाडचे पोलीस निरीक्षक गणेश गुरव, सहाय्यक पोलीस निरीक्षक पाटील, तपासी अंमलदार पोलीस उपनिरीक्षक निकम व तपास पथकातील पोलीस अंमलदार यांनी पुण्यातील फिर्यादी यांच्याकडे चौकशी करून यातील अज्ञात आरोपींचा परिसरात शोध घेतला असता व घटनास्थळाचे बारकाईने निरीक्षण केले असता काही संशयित हालचालीवरून सदर आरोपी हे आसपासचे असल्याचा तर्क लावून तपास सुरू केला. तपास पथकातील पोलीस हवालदार अनिल शेरेकर व पोलीस शिपाई विनोद जाधव यांनी एका आरोपीस चाकण पुणे येथून शोध घेऊन दुसरा आरोपीस विंचूर येथून आणून त्यानुसार तपास सुरू केला. आरोपींची चौकशी करून गुन्हा ओके चालला. सदर गुन्ह्यातील आरोपी हे सर्व गुन्हेगार असल्याने त्यांचेवर त्र्यंबकेश्वर, हरसूल, निफाड व लासलगाव पोलीस ठाण्यात वेगवेगळ्या कलमाखाली गुन्हे दाखल असून, त्यांनी या सर्व गुन्ह्यांची कबुली दिली आहे.



या आरोपींकडून विंचूर, निफाड येथील चोरीच्या पाच मोटारसायकली जप्त केल्या. आरोपी व इतर सदस्यांची नावे निष्पन्न झाली असून, त्यांचा शोध घेणे चालू आहे. जिल्हा परिषद नाशिक ग्रामीण जिल्हा पोलीस अधीक्षक विक्रम देशमाने, अपर पोलीस अधीक्षक आदित्य मिरखेलकर, उपविभागीय पोलीस अधिकारी नीलेश पालवे, निफाडचे पोलीस निरीक्षक गणेश गुरव, तपासी अंमलदार ईश्वर पाटील, पोलीस उपनिरीक्षक विश्वनाथ निकम, पोलीस हवालदार किरण ढेकळे, कपालेश्वर ढिकले, अनिल शेरेकर, संजय वाघ, प्रवीण बारहाते, नितीन सांगळे, सारिका जाधव, मनीषा गायकवाड, पूनम शिंदे, पोलीस शिपाई विनोद जाधव, राजेंद्र दरोडे, धनंजय जाधव, स्वप्निल शिरसाट, योगेश आव्हाड,. विक्रम लहाने तसेच नाशिक ग्रामीण स्थानिक गुन्हा शाखेचे तांत्रिक विश्लेषण कर्मचारी प्रदीप बहिरम, हेमंत गिलबिले यांचे पथकाने वरील गुन्ह्यातील संशयित आरोपी अजय प्रसाद, गणेश भुसले दोघेही राहणार नाशिकरोड यांच्यासह कोयता व पाच मोटारसायकली असा एकूण दोन लाख पन्नास हजार रुपयांचा मुद्देमाल २४ तासांच्या आत हस्तगत केला. या गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक विश्वनाथ निकम यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस करीत आहेत.

## गुरू गोबिंद सिंग अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या मेकॅनिकल शाखेला एनबीएचे पुनर्मानांकन

**सिडको : विशेष प्रतिनिधी**

व्यावसायिक शिक्षणाच्या गुणवत्तेची हमी देऊन उच्च दर्जाची विश्वासार्हता सुनिश्चित करून शैक्षणिक संस्था विद्यार्थी आणि त्यांचे पालक यांच्या अपेक्षा कशापद्धतीने पूर्ण करतात याचे मूल्यांकन राष्ट्रीय मान्यता मंडळातर्फे केले जाते. हे मूल्यांकन प्राप्त झाल्यानंतर विशिष्ट काळाने त्याचे पुनर्परीक्षण होत असते. त्यामुळे उच्च शिक्षण व्यवस्थेमध्ये अध्यापनाची गुणवत्ता, स्वयं-मूल्यांकन आणि उत्तरदायित्व वाढते जेणेकरून संस्थांना त्यांचे शैक्षणिक उद्दिष्टे साध्य करण्यास आणि जागतिक दर्जाचे उच्च-गुणवत्तेचे व्यावसायिक तयार करण्यास मदत मिळते.

राष्ट्रीय मान्यता मंडळाच्या अर्थात एनबीए तज्ज्ञ समितीच्या निरीक्षणे - सूचनांच्या अनुषंगाने गुरु गोबिंद सिंग संस्थेच्या गुरु गोबिंद सिंग अभियांत्रिकी महाविद्यालय आणि संशोधन केंद्राचे झालेले पुनर्परीक्षण आणि सादर करण्यात आलेल्या अहवालाचा स्वीकार करीत एनबीएने महाविद्यालयाच्या मेकॅनिकल शाखेला २०२८ सालापर्यंत एनबीए मानांकन दिले आहे. एनबीएच्या अधिकृत वेबसाइटवर हा निकाल नुकताच घोषित करण्यात आला आहे. याआधी २०२२ ते २०२५ पर्यंतचे मानांकन मिळाले होते. राष्ट्रीय मान्यता मंडळाच्या तज्ज्ञ समितीने महाविद्यालयाच्या मेकॅनिकल शाखेला नुकतीच भेट दिली आणि गुणवत्तापूर्ण शिक्षण पद्धती, संशोधन पद्धती, आधुनिक शैक्षणिक सुविधा, विद्यार्थ्यांसाठी नामांकित कंपन्यांचे प्लेसमेंट ड्राइव्ह तसेच संस्थेच्या पायाभूत सुविधा, आर्थिक क्षमता व व्यवहार्यताबाबत गुणवत्ता सातत्याची पडताळणी करून हे मानांकन निश्चित करण्यात आले आहे.



## हनुमान जयंती मिरवणुकीने वेधले लक्ष

**सिडको : विशेष प्रतिनिधी**

डीजीपीनगर नं.२ येथील वज्रकाय हनुमान मित्र मंडळाच्या वतीने काढण्यात आलेल्या मिरवणुकीने भाविकांचे लक्ष वेधून घेतले.

तीन दिवसांचा हनुमान जन्मोत्सव मोठ्या उत्साहात विविध धार्मिक कार्यक्रमांनी पार पडला. वज्रकाय हनुमान मित्रमंडळ, एएसएमएम ग्रुप, सुरया उद्योग समूह, मराठा फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने हे आयोजन करण्यात आले. यावेळी मंदिराला आकर्षक विद्युत रोषणाई आणि सजावट करण्यात आली होती. यावेळी सुमारे दहा हजार भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला. या हनुमान जन्मोत्सव निमित्ताने डिजीपी नं.२ परिसरातून बजरंग बलींचे मुकुट व पादुकांची महामिरवणूक काढण्यात आली. प्रख्यात असे श्री देवमामलेदार यांच्या ब्रास बॅण्डच्या तालावर, फटाक्यांच्या आतषबाजीत मिरवणुकीला सुरुवात झाली. परिसरातील शेकडो भाविकांनी मिरवणुकीत सहभागी होत दर्शनाचा लाभ घेतला. या मिरवणुकीमध्ये महिलांनी व बालकांनी मोठ्या प्रमाणात सहभाग घेतला होता. शुक्रवारी (दि.११) कालीपुत्र कालिचरण महाराज यांचे प्रवचन झाले. शनिवारी (दि.१२) सकाळी महाआरती, दिवसभर धार्मिक कार्यक्रम पार पडले. सकाळपासून सायंकाळपर्यंत दर्शनासाठी आलोट गर्दी दिसून आली. यानिमित्ताने समता ब्लड सेंटर यांच्या सहकार्याने रक्तदान शिबिर घेण्यात आले. यामध्ये साधारणत: ५० भाविकांनी रक्तदान केले. सायंकाळी महाप्रसादाचे वाटप करण्यात आले.

सुमारे १० हजार भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतल्याचा दावा आयोजकांनी केला. कार्यक्रम यशस्वीतेसाठी अध्यक्ष भावेश (करण) शिंदे, उपाध्यक्ष कृष्ण (ओम) डोन्नर, सचिव अंकूर पाटील, खजिनदार अमित घरटे, संतोष आडके, प्रशांत जाधव, मयूर भावसार, प्रशांत जाधव, निरज नाटकर, पाटील, आदित्य शिंदे, दीपक मराठे, महेश आगळे, केदार दीक्षित, मयुर दिक्षित, अभिषेक माहंत, सुरेश गुप्ता, केशव जारे, संदीप जाधव, श्रीकृष्ण महाजन, श्रीकांत लहामगे, प्रभाकर बच्छाव, आप्पाजी देसले, विशाल देशमुख, अमोल भांबर, चेतन घरटे, ऋषीकेश डोन्नर, सचिन निकम, युवराज पाटील, विकी नंदन, सोमवंशी काका, उमेश बच्छाव, भुषण बच्छाव, महाजन काका, खरोटे काका आदींनी परिश्रम घेतले.

# नर्गिस दत्त विद्यालयातील २० मुलींना नवीन सायकल भेट



**नाशिक : प्रतिनिधी** भारतीय वंशाच्या अमेरिकेत वास्तव्य असलेल्या दातृत्वाने नर्गिस दत्त विद्यालयातील २० मुलींना नवीन सायकल भेट दिल्या.

पेडल टु सक्सेस या संस्थेने शाळेतील विद्यार्थिनींसाठी अत्यंत उपयुक्त अशा २० सायकली भेट स्वरूपात दिल्या. त्यांच्या या उपक्रमामुळे विद्यार्थिनींचा शालेय प्रवास अधिक सोयीस्कर, झाला आहे. ही सायकल म्हणजे केवळ एक साधन नसून, त्यांच्या शिक्षणाच्या वाटचालीतील एक महत्त्वाची गती आहे. मुलींच्या शिक्षणात येणारे अडथळे दूर करत, त्यांना आत्मविश्वास व स्वावलंबन मिळवून देणाऱ्या संस्थेच्या या सामाजिक जाणिवेचे मन:पूर्वक कौतुक विद्यालयाच्या मुख्याध्यापिका नंदिनी आडके यांनी आपल्या प्रास्ताविकातून केले.

या संस्थेचे हे कार्य खऱ्या अर्थाने प्रेरणादायी व अनुकरणीय आहे, असे ऋणनिर्देश समारंभाचे अध्यक्ष तथा महात्मा गांधी विद्यामंदिर संस्थेचे उपाध्यक्ष माजी प्राचार्य हरीश आडके यांनी केले.

अमेरिकास्थित भारतीय व या अनोख्या कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी बिपिन साळुंखे,अश्विनी साळुंखे व त्यांची मुलगी अवनी साळुंखे यांनी समाजात सकारात्मक बदल घडवण्यासाठी अशा उपक्रमांची नितांत गरज आहे,हे लक्षात घेऊन पेडल टू सक्सेस म्हणजे चेतन काळभोर व सोनाली काळभोर यांनी गरजेतून उभारलेली चळवळ. या समूहाद्वारे सामाजिक जबाबदारीची जाणीव आणि कृती यांचा सुंदर संगम घडवत, मुलींच्या पंखांना गती देणारे हे योगदान दिले जाते असे वर्णन केले.

सायकल मिळालेल्या विद्यार्थिनींपैकी खुशी मोरे व वैशाली खडांगळे यांनी आपले ऋणनिर्देशपर मनोगत व्यक्त केले. त्या म्हणाल्या, ही सायकल म्हणजे केवळ एक साधन नसून, त्यांच्या शिक्षणातील वाटचालीसाठी एक महत्त्वाची गती आहे. या अनोख्या कार्यक्रमास प्रमुख अतिथी आदिवासी सेवा समितीचे सहसमन्वयक श्रीराम शिरसाठ, नर्गिस ऋणनिर्देश समितीचे अध्यक्ष समाधान पगार, निवृत्त सहाय्यक पोलीस आयुक्त अशोक पाटील, संध्या पाटील, प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक रवींद्र ठाकरे, वस्तीगृह अधीक्षक मनीषा सोनवणे, सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

यावेळी सर्व विद्यार्थ्यांना पेढे वाटण्यात आले. भविष्यातही असेच सहकार्य लाभावे, ही अपेक्षा आपल्या संचलनातून पर्यवेक्षक शशिकांत देसले यांनी व्यक्त केली.

शाळेच्या समग्र विकासासाठी अमेरिकेच्या संस्थेने दिलेल्या या मौल्यवान सहकार्याबद्दल मनीषा पाटील यांनी ऋण व्यक्त केले. या कार्यक्रमाला शिक्षक, शिक्षकेतर उपस्थित होते.

## महत्वाचे



### हनुमान जयंतीनिमित्त लासलगाव येथे कावड मिरवणूक उत्साहात

**लासलगाव :** लासलगाव शहरात श्री हनुमान जयंतीनिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. होळीपासून हनुमान जयंतीपर्यंतच्या काळात शहरात विविध ठिकाणी हनुमान चालिसा पठणाचा उपक्रम राबविण्यात आला. हनुमान जन्मोत्सवानिमित्त येथील पुरातन श्रीराम मंदिरातील प्रमुख हनुमान मंदिरात विशेष पूजा, अभिषेक, आरती आणि प्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी शेकडो वर्षांची परंपरा कायम ठेवत पारंपरिक वाद्य संबळ वाजवत कावड मिवणूक संपन्न झाली. श्री हनुमान मूर्तीच्या अभिषेकासाठी नांदूरमध्यमेश्वर येथून हनुमान भक्तांनी पायी चालत कावडीने गंगाजल आणले होते. पुरातन श्रीराम मंदिर, इच्छापूर्ती श्रीगणेश मंदिर, अहिल्यादेवी किल्ला परिसर, पाटील गल्ली, गोपालकृष्ण मंदिर, संत नामदेव महाराज मंदिर, छत्रपती शिवाजी महाराज चौक, महादेव मंदिर आदी परिसरातून कावड मिरवणूक काढण्यात आली.मिरवणूक मार्गामध्ये महिलांनी सुबक रांगोळी काढलेली होती तसेच यावेळी कावडी आणि पालखीची विधिवत पूजन करण्यात आले. यावेळी श्री हनुमान भक्तांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला. या कावड मिरवणुकीत श्रीराम मंदिर ट्रस्टचे पदाधिकारी, स्थानिक स्वयंसेवी संस्थेचे पदाधिकारी, पत्रकार बांधव यांच्यासह युवक मंडळाचे कार्यकर्ते, महिला मंडळ व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. हनुमान जन्मोत्सव यशस्वी होण्यासाठी श्रीराम मंदिर ट्रस्ट व हनुमान भक्तांनी विशेष परिश्रम घेतले.

### कांदा झाला स्वस्त; गृहिणींना दिलासा

**लासलगाव :** घाऊक बाजारात कांद्याच्या दरात सातत्याने घसरण होत असल्याने त्याचा परिणाम किरकोळ बाजारातदेखील झाला आहे. लासलगाव येथील रविवारच्या आठवडे बाजारात कांदा १५ ते २० रुपये प्रति किलोप्रमाणे विक्री झाल्याचे दिसून आले. दोन महिन्यांपूर्वी हाच कांदा किरकोळ बाजारात ४० ते ५० रुपये प्रति किलोप्रमाणे विक्री करण्यात येत होता, मात्र आता घाऊक बाजारात कांद्याच्या दरात सातत्याने घसरण होत असल्याने किरकोळ बाजारात देखील कांद्याचे दर उतरल्याने गृहिणींना दिलासा मिळाला आहे. गेल्या दोन महिन्यांपूर्वी कांद्याचे दर वाढल्याने गृहिणींना खूप त्रास सहन करावा लागला होता. कांदा हा स्वयंपाकघरातील महत्त्वाचा घटक असल्याने कांद्याच्या दरात वाढ झाल्याने गृहिणींच्या किचन बजेटवर परिणाम झाला होता. मात्र, आता कांद्याचे दर कमी झाल्याने त्यांना दिलासा मिळत आहे. येत्या काही दिवसांत कांद्याची आवक वाढणार असून, किरकोळ बाजारात दर आणखी कमी होण्याची शक्यता आहे. महाराष्ट्रासह गुजरात, मध्य प्रदेश, राजस्थान या राज्यांतून बाजापेठांमध्ये नवीन उन्हाळी कांद्याची आवक मोठ्या प्रमाणात सुरू झाली आहे. त्यामुळे सर्वत्र कांद्याची उपलब्धता वाढली आहे, मात्र देशांतर्गत व परदेशात पाहिजे त्या प्रमाणात मागणी कमी झाली आहे. त्यामुळे घाऊक बाजारात कांदा १० ते १२ रुपये किलो दराने विकला जात आहे तर किरकोळ बाजारात १५ ते २० रुपये किलो दराने विकला जात आहे. यामुळे गृहिणींना कांद्याच्या दरात घसरण झाल्यामुळे मोठा दिलासा मिळाला आहे.

### नाईक कॉलेजमध्ये डॉ. आंबेडकरांना अभिवादन



**दिंडोरी :** क्रांतिवीर वसंतराव नारायणराव नाईक शिक्षण प्रसारक संस्थेचे कला व वाणिज्य महाविद्यालय दिंडोरी येथे राष्ट्रीय सेवा योजना व विद्यार्थी विकास मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजेंद्र सांगळे व उपप्राचार्य डॉ. सुनील उगले यांच्या मार्गदर्शनाखाली साजरी करण्यात आली. यावेळी विद्यार्थी विकास अधिकारी प्रा. प्रल्हाद दुधाने यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याचा आढावा घेऊन विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. त्यानंतर महाविद्यालयातून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त महाविद्यालय ते नगरपंचायत अशी पदयात्रा काढण्यात आली. दिंडोरी येथील नगरपंचायत येथे भारताचे संविधान उद्देशिकाचे डॉ. नाना चव्हाण यांनी वाचन केले. यावेळी दिंडोरी येथील डॉ. विलास देशमुख तसेच स्थानिक व्यवस्थापन समितीचे माजी सदस्य सुनील आव्हाड, मनोज पगारे,विलास पगारे, विकी मावळ,उमेश पगारे, अभिजीत कापसे, गणेश खांडे इत्यादी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कार्यक्रम करण्यात अधिकारी डॉ. नाना चव्हाण यांनी केले. आभार प्रा. तेजस्विता मुंडे यांनी केले. कार्यक्रमासाठी मोबिन सय्यद व महाविद्यालयातील विद्यार्थी उपस्थित होते.

### सुकेणे शाळेत डॉ. आंबेडकरांना अभिवादन

**कसबे सुकेणे:** मौजे सुकेणे (ता. निफाड) येथील कर्मवीर रावसाहेब थोरात माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्ताने त्यांना अभिवादन करण्यात आले. अध्यक्षस्थानी प्राचार्य रायभान दवंगे होते तर व्यासपीठावर प्रति डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या भूमिकेत कु. आदित्य मोरे, प्रसिद्ध विधिज्ञ ॲड. निर्मला अरिंगळे, अभिनवचे मुख्याध्यापक राहुल मोगल,कॉलेज विभागप्रमुख राजेंद्र धनवटे, दिनेश मोरे, सुमित शार्दुल, चेतन चव्हाण, पूनम वाघ, योगिता चव्हाण, श्रीमती जे. पी. सोनवणे आदी व्यासपीठावर उपस्थित होते. सुरुवातीला प्राचार्य दवंगे व उपस्थितांच्या हस्ते डॉ. आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. प्रास्ताविक श्रीमती ठाकरे यांनी केले. सूत्रसंचालन चौथीची विद्यार्थिनी जानवी अरिंगळे हिने केले तर आभार श्रद्धा तिडके हिने मानले. कार्यक्रमासाठी सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

## निधन वार्ता

### सोमनाथ तासकर



**निफाड :** रुई येथील प्रगतिशील शेतकरी व जलसंपदा विभागातील सेवानिवृत्त कर्मचारी सोमनाथ पंढरीनाथ तासकर (६३) यांचे हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, दोन मुली, सुना, नातवंडे असा परिवार आहे.

### शेवंताबाई सूर्यवंशी



**मंगरुळ :** विंचूर येथील गोरखराव गोविंद सूर्यवंशी व पोपट गोविंद सूर्यवंशी यांच्या मातोश्री शेवंताबाई गोविंद सूर्यवंशी (९२)यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुलं, सात मुली, सुना, नातवंडं असा परिवार आहे.

### नामदेव गामणे



**नाशिक :** नाशिक मोरवाडी येथील प्रगतशील शेतकरी नामदेव काळजी गामणे (७३) यांचे हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, मुली, नातवंडे, सुना असा परिवार आहे.

# एचएएल संघटना प्रचाराचा आजपासून धुरळा

## तीन दिवस होणार प्रचारसभा; १९ ला होणार मतदान

**ओझर : वार्ताहर**

येथील एचएएल कामगार संघटनेच्या ३१ जागांसाठी १९ एप्रिल रोजी होत असलेल्या निवडणुकीत ६२ उमेदवार श्री आपला जागृती पॅनल व श्री श्रमशक्ती पॅनलच्या माध्यमातून तर उपाध्यक्षपदासाठी १ अपक्ष उमेदवार निवडणूक रिंगणात असून, आज दिनांक १५ ते १७ एप्रिलपर्यंत दोन्ही पॅनलतर्फे प्रचाराचा धुरळा उडणार असल्याचे चित्र आहे.

दरम्यान, शनिवारी सत्ताधारी गटाच्या श्री आपला जागृती पॅनल व विरोधी गटाच्या श्री श्रमशक्ती पॅनलचा प्रचाराचा नारळ वाढविण्यात आला. तेव्हापासून सोशल मीडियाच्या माध्यमातून आरोप-प्रत्यारोप केले जात आहेत.

एक मात्र स्पष्ट चित्र आहे की, सताधारी गटाच्या श्री आपला जागृती पॅनल व विरोधी गटाच्या श्री श्रमशक्ती पॅनलमध्ये समोरासमोर पण तुल्यबल लढत होईल.

सत्ताधारी गटाचे नेते विद्यमान सरचिटणीस संजय कुटे व अध्यक्ष अनिल मंडलिक यांच्या नेतृत्वाखालील श्री आपला जागृती पॅनलमधून अध्यक्षपदासाठी अनिल मंडलिक, उपाध्यक्षपदासाठी राकेश गर्जे, आनंद गांगुर्डे , प्रकाश गभाले, प्रवीण गाढे, सरचिटणीसपदासाठी संजय कुटे, सहचिटणीसपदासाठी प्रतिप गोळेसर, जितेंद्र जाधव, रोशन कदम, जगन्नाथ खोले, खजिनदारपदासाठी प्रशांत आहेर, कार्यकारिणी सदस्यपदासाठी रवि गरुड, अश्पाक बागवान, आशिष भागवत, नरेंद्र खैरनार, प्रभाकर ढाकणे, त्र्यंबक बहिरम, खुशाल जाधव, हेमंत ठाकूर, मुकुंद क्षीरसागर, उमेश जाधव, ऋषिकेश जाधव, सचिन वारुळे, सौ. लिना सोनार, कमलाकर बनकर, सोमनाथ जाधव, हितेश गंगापूरकर, परिमल जोशी, प्रकाश पतके, विकास जाधव, श्रीकांत घुले हे उमेदवार निवडणूक रिंगणात आहेत.

विरोधी गटाचे नेते माजी सरचिटणीस सचिन ढोमसे व माजी सहचिटणीस गिरीश वलवे यांच्या नेतृत्वाखालील श्री श्रमशक्ती पॅनलमधून अध्यक्षपदासाठी गिरिजाकांत वलवे, उपाध्यक्षपदासाठी गणेश गवारे, चेतन घुले,दीपक कदम, डॉ. सुधीर राजगुरू, सरचिटणीसपदासाठी सचिन ढोमसे, सहचिटणीसपदासाठी नितीन पगारे, योगेश अहिरे, सुरेश पाटील, मन्सूर शेख, खजिनदारपदासाठी अमोल जोशी, कार्यकारिणी सदस्यपदासाठी सचिन धोंडगे, राजेंद्र मोरे, भूषण व्यास, दत्तू शिंदे, बाजीराव बेंडकुळे, कैलास सातभाई, संजय गाडेकर, कैलास बोराडे, सागर कदम, मुकेश राऊत, पदमेश भावसार, प्रवीण गोतरणे, संतोष आहेर, भूषण रौंदळ, नवनाथ मुसळे, भूषण चव्हाण, रणजीत पगारे, किरण डावरे, राहुल तेजाळे, दिनेश सोनवणे हे उमेदवार निवडणूक रिंगणात आहेत.

आजपासून दोन्ही पॅनलकडून प्रचारसभा, चौकसभा, मेळावे घेण्यात येणार असल्याचे दोन्ही पॅनलतर्फे सांगण्यात आले. एचएएल कामगार संघटना ही राजकीय पक्षविरहित संघटना असून, संघटनेच्या निवडणुकीत कुठल्याही राजकीय पक्षाचा किंवा नेत्याचा हस्तक्षेप नसतो. कोणीही राजकीय नेता कोणा एका पॅनलला निवडून देण्याचे आवाहन करीत नाही हे मात्र सत्य आहे. परंतु पॅनलमधील उमेदवार कुठल्या ही पक्षाशी संबंधित असले तरी राजकीय पक्षाचे जोडे बाहेर काढून सर्व जण कामगार संघटनेचे काम करतात ही विशेष बाब आहे.

श्री आपला जागृती पॅनलचे नेते विद्यमान सरचिटणीस संजय कुटे व अध्यक्ष अनिल मंडलिक हे आमदार दिलीप बनकर गटाचे व श्री श्रमशक्ती पॅनलचे नेते माजी सरचिटणीस सचिन ढोमसे हे शिवसेनेचे माजी आमदार अनिल कदम गटाचे व माजी सहचिटणीस गिरीश वलवे, भाजपाचे नेते यतिन कदम गटाचे समजले जातात.



# नांदगाव कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये स्वच्छता मोहीम

**नांदगाव : प्रतिनिधी**

महाराष्ट्र शासनाच्या शंभर दिवसांच्या कृती आराखडा कार्यक्रमांतर्गत पणन विभागामार्फत राज्यभर स्वच्छ बाजार समिती आवार अभियान राबविण्यात येत आहे.

या अभियानांतर्गत नांदगाव विधानसभा मतदारसंघाचे आमदार सुहास कांदे यांच्या मार्गदर्शनाखाली नांदगाव बाजार समितीत स्वच्छता अभियान राबविण्यात येत आहे. या अभियानाची सुरुवात करण्यात आली असून, या अभियानाचे उद्घाटन बाजार समितीचे सभापती दर्शन आहेर यांच्या हस्ते करण्यात आले.

नांदगाव बाजार समितीच्या आवारात मोठ्या प्रमाणात खरेदी-विक्रीचे व्यवहार होत असतात. त्यावेळी समिती आवारात पालापाचोळ्यासह विविध प्रकारचा घनकचरा संचित होत असतो. बाजार आवारात रोज शेकडो शेतकरी, व्यापारी, हमाल-मापारी व इतर घटकांची ये-जा असते. त्यामुळे बाजार समिती आवारात आरोग्याच्या दृष्टीने स्वच्छता अभियान राबविण्यात येणार आहे. या अभियानांतर्गत बाजार समितीच्या सर्व इमारती, प्रवेशद्वार, बाजार आवारावरील दगडधोंडे, झुडपे तसेच सार्वजनिक प्रसाधनगृह इ.ची साफसफाई करण्यात येणार असल्याची माहिती सभापती दर्शन आहेर यांनी दिली.

या मोहिमेच्या उद्घाटनप्रसंगी बाजार समिती उपसभापती अनिल सोनवणे, सहाय्यक निबंधक चंद्रकांत विघ्ने, एकनाथ सदगीर, साहेबराव पगार, समाधान पाटील, सतीश बोरसे, दीपक मोरे, अमोल नावंदर, यज्ञेश कलंत्री, अर्जुन पाटील, अनिल वाघ, जीवन गरुड, नीलेश इपर, पोपट सानप, अमित बोरसे आदी उपस्थित होते.



# शिवसेना ठाकरेंच्या संवाद दौऱ्यासंदर्भात दिंडोरीत बैठक

**दिंडोरी : प्रतिनिधी**

शिवसेना पक्षाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे हे दिनांक १६ एप्रिल रोजी पदाधिकारी व शिवसैनिक यांना मार्गदर्शन करण्यासाठी नाशिक येथे येत असून, 'संवाद दौरा' करणार आहेत. त्या संदर्भात दिंडोरीत बैठक संपन्न झाली.

या दौऱ्यात दिंडोरी येथून शिवसैनिक व पक्षपदाधिकारी यांनी उपस्थित राहून उद्धवजींचे विचार तथा वंदनीय हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारांचा वारसा पुढे चालवत नेण्यासाठी शिवसैनिकांनी सज्ज व्हावे, असे आवाहन शिवसेना जिल्हाप्रमुख डी. जी. सूर्यवंशी यांनी केले. यावेळी दत्ताजी गायकवाड यांनी आपल्या मनोगतात सांगितले, देशातील भाजपा सरकारने सामान्य माणसाला जगणे मुश्कील केले असून, महिला व मुली आणि शेतकरी हा असुरक्षित झाला आहे. आर्थिक, सामाजिक पिळवणूक व लुटालूट सुरू आहे. भांडवलदार व उद्योगपती धार्जिणे हे सरकार असून, आता आपणा सर्वांना या सरकारच्या धोरणांच्या विरोधात व सर्वसामान्य माणसाला न्याय हक्क प्रदान करण्यासाठी व वंदनीय हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारांचा वारसा जपण्यासाठी पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांना समर्थ साथ देण्यासाठी शिवसैनिकांनी नाशिक येथील संवाद दौऱ्यात सहभागी व्हावे, असे सांगितले. तालुकाप्रमुख पांडुरंग गणोरे यांनी सूत्रसंचालन केले व मानले.

# चेहडीत थ्रीडी अंगणवाडीचे मित्तल यांच्या हस्ते भूमिपूजन

**नाशिक : प्रतिनिधी**

निफाड तालुक्यातील चेहडी खुर्द येथे जिल्हा परिषद नाशिक मुख्य कार्यकारी अधिकारी आशिमा मित्तल यांच्या संकल्पनेतून मौजे चेहडी खुर्द येथे थ्रीडी अंगणवाडी काम मंजूर झाले असून, सदर कामाचे भूमिपूजन माननीय मुख्य कार्यकारी अधिकारी आशिमा मित्तल यांच्या हस्ते करण्यात आले.



यावेळी कार्यकारी अभियंता पंकज मेतकर, माननीय उपमुख्य कार्यकारी अधिकारी प्रताप पाटील, महिला व बालकल्याण विभाग माननीय शिक्षणाधिकारी ग्रामपंचायत जिल्हा परिषद नाशिक डॉ. नितीन बच्छाव, गटविकास अधिकारी तुकाराम जाधव, सहाय्यक गटविकास अधिकारी सुनील पाटील, पंचायत समिती माननीय उपअभियंता जिल्हा परिषद नाशिक आर. यु.पुरी, गटशिक्षणाधिकारी प्रशांत गायकवाड, निफाड पंचायत समिती शिक्षण विस्तार अधिकारी कैलास बोरसे, बीट सायखेडा केंद्रप्रमुख ठाकरे, ग्रामपंचायत अधिकारी राखी विलास बोंद्रे, जि. प. शाळा चेहडी संगीता रजपूत, चेहडी माजी सरपंच रवींद्र रुमणे, अध्यक्ष शालेय व्यवस्थापन समिती दशरथ रुमणे, गोविंद शिंदे, यादव रुमणे, किरण सानप, दामोधर रुमणे, नितीन रुमणे, जि. प. शिक्षकवृंद, अंगणवाडी सेविका, आशासेविका, बचत गटाच्या महिला सदस्य मान्यवर चेहडी ग्रामस्थ आदी उपस्थित होते.

नाशिक जिल्ह्यात एकूण दोन थ्रीडी अंगणवाडी असून, त्या एक चेहडी खुर्द येथे होत आहे. या प्रकल्पामुळे गावाला एक ओळख मिळणार असल्याने चेहडी गावकऱ्यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी जि. प. नाशिक यांचे आभार मानले.

# कुटुंबातील महिला निरोगी तर कुटुंब निरोगी : डॉ. तुसे

**नांदगाव : प्रतिनिधी**

ज्याप्रमाणे मराठीत म्हण आहे, मुलगी शिकली प्रगती झाली त्याप्रमाणे घरातील कुटुंबप्रमुख महिला निरोगी तर संपूर्ण कुटुंब निरोगी, ही म्हण प्रचलित करण्याची गरज आहे. विशेषतः घरकाम करता करता बाहेरील नोकरी-व्यवसाय करणाऱ्या महिलांनी विशेष काळजी घेणे गरजेचे आहे. त्यांनी स्वतः उत्तम आहार, व्यायाम आणि आराम करणे गरजेचे आहे. कारण कुटुंबातील महिला निरोगी असेल तर संपूर्ण कुटुंब निरोगी राहील, असे स्पष्ट मत डॉ. काजल तुसे यांनी व्यक्त केले.



आधारवड महिला बहुद्देशीय सेवाभावी संस्थेच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा जोतिबा फुले, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर व छत्रपती संभाजी महाराज यांच्या संयुक्त जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात त्या प्रमुख पाहुण्या म्हणून बोलत होत्या. यावेळी त्यांनी महिलांना मार्गदर्शन केले व महिलांनी विशेष काळजी घ्यावी. स्वतःसाठी जगावे, कारण घरातील महिला जशी असेल तसेच घरातील व्यक्ती व घरातील मुलांवर संस्कार असतात, असे मत व्यक्त केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेच्या अध्यक्ष संगिता सोनवणे या होत्या.

नांदगाव येथील क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले कन्या विद्यालयात आधारवड महिला बहुद्देशीय सेवाभावी संस्थेच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या संयुक्त जयंतीनिमित्त कार्यक्रमात प्रमुख पाहुण्या म्हणून डॉ. काजल तुसे बोलत होत्या. यावेळी संस्थेच्या सचिव आशाबाई काकळीज यांच्यातर्फे त्यांचा संविधान उद्देशिका देऊन सत्कार करण्यात आला तसेच डॉ. तुसे यांच्या हस्ते संविधान उद्देशिका देऊन महिलांचा सन्मान करण्यात आला. महिलांचे एवढे मोठे संघटन व कार्य बघून डॉ. तुसे यांनी कौतुक केले. संस्थेच्या अध्यक्ष संगीता सोनवणे यांनी संस्थेच्या कार्याबद्दल माहिती देताना सांगितले की, सध्या देशातील वातावरण बघून आम्ही सर्व महापुरुषांच्या जयंती साजरी करून त्यांचे विचार जास्तीत जास्त प्रसार करण्यासाठी प्रयत्न करत आहोत. तसेच महिलांना येणाऱ्या अडचणी सोडवण्यासाठी आम्ही प्रयत्न करत असल्याचे सांगितले. यावेळी महिलांनी देखील आपल्या अडचणी सांगून मत व्यक्त केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी आशा काकळीज, सरला मोढे. वंदना बहिकर,रत्ना सोनवणे, शोभा भोसले, तबसूम शेख,तारा निकम, जोती मोरे, संगीता मोकळ, अलका आयनोर यांच्यासह ग्रामीण भागातील महिलांनी परिश्रम घेतले.

# लासलगावला प्रधानमंत्री विश्वकर्मा योजनेचे लाभार्थी वंचित

**लासलगाव : वार्ताहर**

देशातील १४० हून अधिक जातींच्या लोकांना लाभ देण्यासाठी केंद्रातील मोदी सरकारने प्रधानमंत्री विश्वकर्मा योजना सुरू केली आहे. या योजनेद्वारे कारागिरांना कमी व्याजदरात ३ लाख रुपयांपर्यंतचे कर्ज दिले जाणार आहे. या योजनेत १७ हून अधिक कारागीर आणि पारंपरिक कामगारांचा सहभाग आहे.

कारागिरांना आर्थिक स्थैर्य आणि आत्मनिर्भरता प्राप्त करण्यासाठी मोदी सरकारकडून प्रधानमंत्री विश्वकर्मा योजना सुरू करण्यात आलेली आहे. या योजनेच्या लाभामुळे लाभार्थ्यांना त्यांचे आर्थिक कल्याण आणि जीवनमान सुधारण्याची संधी मिळणार आहे. या योजनेच्या माध्यमातून बेरोजगारी कमी करण्यात आणि रोजगाराच्या नवीन संधी निर्माण होण्यास मदत होणार आहे.असे असले तरी लासलगाव येथील सुमारे ४६५ लाभार्थी या योजनेच्या लाभापासून वंचित राहिले असल्याची माहिती जयदत्त होळकर यांनी दिली आहे.

सदरची योजना सुरू झाल्यापासून लासलगाव येथील या योजनेमध्ये अर्ज दाखल केलेले लाभार्थी वंचित राहिलेले आहे. पीएम विश्वकर्मा योजनेचे अर्ज ऑनलाइन वेबसाइटचा वापर करून करण्यात येत असतो.ऑनलाइन करण्यात आलेल्या अर्जाची पडताळणी करण्यासाठी सरपंच यांना आयडी पासवर्ड तयार करून वापरण्याबाबत सूचना करण्यात आलेल्या आहेत. परंतु लासलगाव येथील सरपंच कॅटेगिरीतील आयडी पासवर्डसाठी रजि. करताना प्राथमिक माहिती भरून प्रोसेस केल्यानंतर तांत्रिक एरर येत आहे.त्यामुळे लासलगाव येथील शेकडो लाभार्थी या योजनेच्या लाभापासून सुरुवातीपासून वंचित राहिलेले आहे. याबाबत जयदत्त होळकर यांनी दिनांक ११ ऑक्टोबर २०२४ रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी यांना लेखी पत्राद्वारे कळविलेले होते. परंतु अद्यापपर्यंत सदरबाबत कोणत्याही प्रकारची कार्यवाही करण्यात आलेली नाही.तांत्रिक एरर येत असल्यामुळे या योजनेचे अर्ज भरताना अनेक लाभार्थ्यांना अडचणींना तोंड द्यावे लागत आहे. त्यामुळे लाभार्थी वंचित राहण्याचा धोका आहे.

> पीएम विश्वकर्मा योजनेद्वारे १७ प्रकारांपेक्षा जास्त कॅटेगिरीतील कारागिरांना आपला व्यवसाय सुरू करण्यास आर्थिक सहाय्य मिळणार आहे. यामुळे या कारागिरांचे आर्थिक कल्याण आणि जीवनमान उंचावण्यासाठी मदत होणार आहे. तसेच गावागावांमध्ये निर्माण झालेली बेरोजगारी कमी होऊन रोजगाराच्या नवी संधी निर्माण होणार आहे. त्यामुळे आयडी पासवर्डबाबत निर्माण झालेली तांत्रिक अडचण तत्काळ दूर करून लाभार्थ्यांना न्याय द्यावा.
>
> – **जयदत्त होळकर,** संचालक, मुंबई कृ.उ.बा. समिती



# बाललैंगिक शोषण प्रतिबंधासाठी 'अर्पण'ची मोहीम

## नाशिक, सुरगाण्यातील १२२५ शिक्षकांचा सहभाग

**सुरगाणा : प्रतिनिधी**

नाशिक जिल्हा परिषद व मुंबई येथील अर्पण संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हा परिषद तसेच माध्यमिक शाळेतील शिक्षकांसाठी बाललैंगिक शोषणास प्रतिबंध करणाऱ्या वैयक्तिक सुरक्षा शिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. १२२५ कार्यरत शिक्षकांना प्रशिक्षित करण्यात आले.

पालक व प्रौढ भागधारकांना बाललैंगिक शोषण व वैयक्तिक सुरक्षा शिक्षण तर विद्यार्थ्यांना वैद्यकीय सुरक्षा शिक्षण या विषयावर मार्गदर्शन करण्यात येणार आहे. मुलांसाठी सुरक्षित वातावरण निर्माण होण्यासाठी या मोहिमेची मदत मिळेल. अर्पण ही संस्था, मुंबईसह जागतिक स्तरावर मान्यताप्राप्त, भारतातील बाललैंगिक शोषणाच्या निर्मूलनासाठी काम करणारी पुरस्कारप्राप्त अशासकीय संस्था आहे.

या प्रशिक्षणात बाललैंगिक शोषण या मुद्द्याची ओळख, बाललैंगिक शोषण म्हणजे काय? ऑनलाइन लैंगिक शोषण, बाललैंगिक शोषणाची लक्षणे, मूल आणि मुलांचे अधिकार, बालशोषण आणि बाललैंगिक शोषणाचे प्रकार, आकडेवारी, बाल लैंगिक शोषणाचा अल्पकालीन आणि दीर्घकालीन प्रभाव, पोक्सो कायदा आणि तरतुदी याबाबत चर्चा होणार आहे. लैंगिक शोषण टाळण्यासाठी शिक्षण ६ ते १६ वयोगटातील मुलांसाठी, गोष्टींवर आधारित वैयक्तिक सुरक्षा शिक्षण आणि ऑनलाइन ई-लर्न कोर्सचा परिचय व प्रतिबंधात्मक धडे देऊन तसेच जीवन कौशल्यावर आधारित माहिती देऊन मुलांचे सक्षमीकरण कसे करावे याबाबत प्रस्तुतीकरण करण्यात येईल.

> बाललैंगिक शोषण प्रतिबंध व उपाय या विषयावर यापूर्वी मन मोकळेपणाने विद्यार्थ्यांशी संभाषण, संवाद कसा साधावा? याबद्दल शिक्षकांच्या मनात संकोच निर्माण होत असतो. अर्पण या संस्थेने शिक्षकांना प्रशिक्षण दिल्यामुळे या विषयावर पालक, विद्यार्थी यांच्याशी संवाद साधता येईल.
>
> – **रेशमा गायकवाड,** प्रशिक्षणार्थी शिक्षिका



या प्रशिक्षणासाठी अर्पण संस्थेचे तज्ज्ञ प्रशिक्षक सायली जाधव, सुशील मोहिते, संकिता शिंदे, कोमल मधे, स्वप्निल गायकवाड, मनस्वी कुंडू, नितेश आग्रे,योगेश जावळे यांनी शिक्षकांना मार्गदर्शन केले. या प्रशिक्षणाची प्रत्यक्षपणे प्रभावी अंमलबजावणी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी अशिमा मित्तल, प्राथमिक शिक्षणाधिकारी नितीन बच्छाव, उपशिक्षणाधिकारी धनंजय कोळी, संशोधक सहाय्यक अनिता देशमुख, मिता चौधरी, गटशिक्षणाधिकारी अल्फा देशमुख, यशवंत रायसिंग, प्रमिला शेंडगे, केंद्रप्रमुख, विस्तार अधिकारी यांनी प्रशिक्षण यशस्वीतेसाठी प्रयत्न केले.

### वणी ग्रामपंचायतीकडून पाणपोईची व्यवस्था

**वणी :** येथील जगदंबा मातेच्या यात्रोत्सवासाठी येणाऱ्या भाविकांना पिण्याच्या पाण्यासाठी वणी ग्रामपंचायतीकडून पाणपोईची व्यवस्था करण्यात आल्याची माहिती सरपंच मधुकर भरसट व उपसरपंच विलास कड यांनी दिली. येथील जगदंबामातेचा चैत्र यात्रोत्सव पौर्णिमेपासून ते अमावास्येपर्यंत या पंधरा दिवसांच्या कालावधीत होत असतो. सप्तशृंगी मातेचे मूळ रूप म्हणून वणी येथील जगदंबा मातेची ख्याती आहे. त्याचप्रमाणे नवसपूर्तीसाठी अनेक भाविक येथे येत असतात. सप्तशृंगगडावर वणी गावातून चंडिकापूर मार्गे पायी जाण्यासाठी मार्ग आहे. त्यामुळे या ठिकाणी भगवती भक्तांची सतत वर्दळ असते.

महत्त्वाचे



## नाईक महाविद्यालयात आंबेडकरांना अभिवादन

**नाशिक :** येथील क्रां.व्ही.एन.नाईक शिक्षण संस्थेच्या कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालयात भारतीय घटनेचे शिल्पकार महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना १३४ व्या जयंतीनिमित्त अभिवादन करण्यात आले. प्राचार्य डॉ. संजय सानप यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रम झाला. कार्यक्रमाची सुरुवात महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे उपप्राचार्य डॉ. पौर्णिमा बोडके व कार्यालयीन अधीक्षक राजेंद्र तिवडे यांच्या हस्ते पूजन करून व पुष्पहार अर्पण करून झाली. याप्रसंगी विद्यार्थी विकास अधिकारी डॉ.शरद काकड,डॉ.विजय नौकुडकर,डॉ.संजय काळे,डॉ. धनराज गोस्वामी,डॉ.हेमेंद्र शिंदे,डॉ.नंदादेवी बोरसे,डॉ.मेघा भामरे,डॉ. स्मिता कडवे,डॉ.रेखा जाधव,प्रा.वैशाली राऊत,प्रा.प्रतिभा बोरसे,प्रा. धनश्री दराडे,प्रा.कविता सोनवणे,प्रा.सुभाष आव्हाड,किसन कातकडे यांच्यासह प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.प्रा.डॉ.शरद काकड यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

## माध्यमिक विद्यामंदिरात प्रतिमापूजन

**जुने नाशिक : वार्ताहर**

व्ही. एन. नाईक शिक्षण प्रसारक संस्था संचलित ढकांबे येथील माध्यमिक विद्यामंदिर विद्यालयात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे मुख्याध्यापक अनिल ताडगे होते. यावेळी सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून प्रतिमापूजन करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी काही विद्यार्थ्यांनी मनोगतातून डॉ. आंबेडकर यांच्या जीवनकार्याची माहिती दिली. तसेच सांगळे सरांनी डॉ. आंबेडकर यांच्या सर्वांगीण कार्याची सखोल माहिती विशद केली. कार्यक्रमास रघुनाथ उगले, बाळकृष्ण लांडगे, सुभाष सांगळे, अरुण मानकर, अशोक गिते व शाळेतील विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन ईश्वरी पानसरे व रूपाली धात्रक यांनी केले.

## गिरणारे विद्यालयात जयंती साजरी



**नाशिक :** गिरणारे येथील के.बी.एच. हायस्कूल येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी करण्यात आली.कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान मुख्याध्यापक अनिता पाटील यांनी भूषविले. याप्रसंगी व्यासपीठावर उपमुख्याध्यापक रामनाथ रायते, पर्यवेक्षक सुरेश भदाने, अभिनव बालविकास मंदिर शाळेच्या मुख्याध्यापिका मीनाक्षी खांडबहाले, ज्युनिअर कॉलेज विभागप्रमुख ज्ञानेश्वर बोरस्ते, तुषार बच्छाव, रामकृष्ण भामरे, संजय नागरे, विवेक सोनगडकर, प्रा. अरुण वाटपाडे,मुंकुद घोटेकर, क्रीडाशिक्षक बळवंत पाटील उपस्थीत होते. मान्यवरांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. आकाश गारे या विद्यार्थ्याने मनोगत व्यक्त केले. विद्यालयाच्या उपशिक्षिका श्रीमती वैशाली वडघुले यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केलेल्या अस्पृशता निवारण,समता,स्वातंत्र्य, विश्वबंधुता त्यांच्या विविध कार्याचा आढावा सादर केला. मुख्याध्यापक श्रीमती अनिता पाटील यांनीही मनोगत व्यक्त केले. श्रीमती संगीता गोरे यांनी सूत्रसंचालन केले. आभार श्रीमती योगिता कुयटे यांनी मानले. कार्यक्रमासाठी विद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

## रचना विद्यालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती उत्साहात साजरी



**नाशिक :** महाराष्ट्र समाजसेवा संघ संचालित रचना विद्यालयामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी रंजना तायडे, कार्यक्रमाच्या अध्यक्षा श्रीमती सुषमा जोशी, संस्थेचे सचिव शांताराम अहिरे, मुख्याध्यापिका निशा बर्वे, कार्यकारिणी सदस्य नीलेश ठाकूर, यशवंत ठोके, कीर्ती सावंत, पर्यवेक्षक शिवदास महाजन इत्यादी मान्यवरांनी प्रतिमेचे पूजन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्री यशवंत चौरे सर यांनी केले. इयत्ता दुसरीतील विद्यार्थ्यांनी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनावर आधारित नाट्यकरण प्रस्तुत केल. सौ. शैलेजा निकम यांनी बुद्धवंदना म्हटली. श्री अरविंद वाडेकर यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्यावर आधारित गीतगायन केले. श्रीमती स्नेहल देशपांडे मॅडम डॉ. आंबेडकर यांचा कार्याची माहिती दिली. प्रमुख अतिथी रंजना तायडे मॅडम यांनी आपल्या मनोगतुन भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याची सविस्तर माहिती सांगितली. कार्यक्रमाप्रसंगी विद्यार्थी, शिक्षक व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी

**सिडको : विशेष प्रतिनिधी**

भारताचे संविधान निर्माते, ज्यांच्या धारदार लेखणीतून अखंड भारताला संविधान देऊन भारताची पिढ्यान्‌पिढ्या समृद्ध केली असे कायदेतद्ज्ञ विश्वरत्न, महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३४ वी जयंती सातपूर शिवजन्मोत्सव समितीच्या वतीने अभिवादन करण्यात आले. सातपूर कॉलनीतील छत्रपती संभाजी महाराज उद्यान येथे या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. शिवजन्मोत्सव समितीचे अध्यक्ष जीवन रायते व कार्याध्यक्ष दीक्षाताई लोंढे यांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी शिवजन्मोत्सव समितीचे माजी अध्यक्ष नितीन निगळ, किशोर निकम, संजय राऊत, सचिन गांगुर्डे, सामाजिक कार्यकर्ते छावा क्रांतिवीर सेनेचे संस्थापक अध्यक्ष करण गायकर,राहुलजी आरोटे, सातपूर सोसायटी चेअरमन अनिलजी सोनवणे, किशोरशेठ मुंदडा, मुन्ना तुपे, देवा जाधव,गौरव जाधव, समाधान देवरे,दिलीप भांदुरे, शिल्पाताई झारेकर,भारत निगल, रवी जोशी,ज्ञानेश्वर निगळ,योगेश जाधव,दिनेश बोरसे आदी उपस्थित होते.

# जगात गाजावाजा, भीमराव एकच राजा

**नाशिक : प्रतिनिधी**

**शहर परिसरात भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. जयंतीनिमित्त शहरात तसेच सिडको, सातपूर भागात मिरवणूक काढण्यात आली. ठिकठिकाणी प्रतिमापूजनांसह बुद्धवंदना घेण्यात आली. मिरवणुकीत डीजेच्या तालावर भीमसैनिकांनी ठेका धरला होता.**

## सिडकोत मिरवणूक उत्साहात

**सिडको : विशेष प्रतिनिधी**

**भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समितीच्या वतीने भारतरत्न डॉ. आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंतीनिमित्त मिरवणूक काढण्यात आली.**

महाकाली चौक येथे अंबड पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राकेश हांडे, शिवसेना नेते सुनील बागूल मार्क्सवादी पक्षाचे राजू देसले, मदन जमदाडे विशाल डोके यांच्या प्रमुख उपस्थितीसह समितीचे अध्यक्ष विनोद भडांगे, उपाध्यक्ष संजय गांगुर्डे, संदीप अहिरे, स्वागतध्यक्ष संतोष सोनपसारे, समिती सचिव डॉ. अनिल आठवले, कुणाल जगताप, देवचंद केदारे संदीप वानखेडे, अजय साळवे, जीवन आहिरे, दीपक पवार कल्पना नेरकर, शोभा केदारे, बाळासाहेब शिंदे, बाळासाहेब जमदाडे, सुनील जगताप यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये मिरवणुकीला सुरुवात झाली असून, मिरवणुकीत भीमसैनिक व महिला सहभागी झाले होते.



## आ. फरांदे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण

**नाशिक : प्रतिनिधी**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त उपनगर येथील मातोश्रीनगर परिसरात एचडीएफसी बँकेसमोर उभारण्यात आलेल्या १२ फुटी भव्य पुतळ्यास आमदार प्रा. देवयानी सुहास फरांदे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी आयोजक अतुल चोपडे, सहसंयोजक सदविर सिंह, माजी नगरसेवक कुणाल वाघ,अनिल ताजनपुरे,सुनील देसाई, भास्कर घोडेराव,वर्षा सरदार, मंगेश मोरे, संतोष कांबळे, प्रवीण नवले पूजा नवले, किमया बागुल, शिव[illegible] पाटील, रूपाली मर्चेंडे, मनोज केदारे अर्चनाताई केदारे आदी मान्यव उपस्थित होते.

## वैश्विक शांततेसाठी डॉ. आंबेडकरांचे विचार आत्मसात करा : डॉ. कोल्हे

**नाशिक : प्रतिनिधी**



वैश्विक शांततेसाठी डॉ. आंबेडकरांचे विचार सर्वांनी आत्मसात करण्याची गरज आहे, असे प्रतिपादन मानवधन सामाजिक, शैक्षणिक विकास संस्थेचे संस्थापक डॉ. प्रकाश कोल्हे यांनी केले.

मानवधन संस्थेत भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना जयंतीनिमित्त अभिवादन करण्यात आले. संस्थेचे संस्थापक डॉ. प्रकाश सुकदेव कोल्हे व संस्था सचिव तथा मुख्याध्यापिका ज्योती कोल्हे, तसेच मानवधन संस्था संचलित सर्व शाळांमधील मुख्याध्यापक व विभागप्रमुख आदी मान्यवर उपस्थित होते. उपस्थितांच्या हस्ते भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. प्रोग्रेसिव्ह इंग्लिश मीडिअम स्कूल, पाथर्डी फाटा, नाशिकच्या मुख्याध्यापिका वैशाली पवार यांनी प्रास्ताविकात बाबासाहेबांचे पुरोगामी विचार मांडले. अध्यक्षीय भाषणात डॉ. प्रकाश कोल्हे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकत उपस्थितांना मार्गदर्शन करत सामाजिक, आर्थिक, राजनैतिक, शैक्षणिक, कृषीप्रधान विचारांचे महत्त्व विशद करून राष्ट्रहितार्थ त्यांच्या महान कार्याचा दाखला देऊन उपस्थितांना प्रेरित केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दलित, श्रमिक, विस्थापित, शोषित अशांच्या अंधकारमय जीवनाला प्रज्ञेचा संदेश दिला. ही ज्योत आता आपण तेवत ठेवायची आहे, समाजाला उत्कर्षाकडे नेण्यासाठी, असे प्रतिपादन ज्योती कोल्हे त्यांनी यावेळी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अपर्णा कुलकर्णी यांनी केले. यावेळी संस्थेतील सर्व शिक्षकवृंद उपस्थित होते.



## सातपूर कॉलनीत भीम जयंती उत्साहात साजरी

**सिडको : विशेष प्रतिनिधी**

सातपूर कॉलनी येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्ताने सातपूर कॉलनीत बाबासाहेब आंबेडकर मार्केट येथे धम्मसागर प्रबोधन संघ डॉ. बाबासाहेब आंबेडकर मार्केट युवक मित्र मंडळ यांच्यातर्फे भीम जन्मोत्सव उत्साहात साजरा करण्यात आला.

यावेळी मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. डॉ.कुणाल उघडे,डॉ.देवेंद्र कवठकर,डॉ.प्रवीण भामरे, डॉ.रणछोड पाटील, डॉ.चेतन लहारेयात इसीजी, हृदयाची स्पंदने, रक्तातील साखर तपासणी, मोतीबिंदू तपासणी,रक्तदाब आदी चाचण्या करण्यात आल्या. जवळपास १५० नागरिकांनी या शिबिराचा लाभ घेतला. शिबिराचे उद्‌घाटन रिपाइं उत्तर महाराष्ट्र प्रमुख प्रकाश लोंढे यांच्या हस्ते करण्यात आले. प्रमुख पाहुणे म्हणून आदिवासी विकास भवन पालघर येथील अधीक्षक पूनम साबळे पाटील, माजी नगरसेविका ॲड. दीक्षा लोंढे, भूषण लोंढे, धीरज शेळके, स्वप्नील पाटील गौरव बोडके, राजेश खताळे,लोकेश गवळी, बाळासाहेब पोरजे, मिलिं[illegible] कांबळे,भीम जन्मोत्सव अध्यक्ष सा[illegible] निकम आदी उपस्थित होते. अध्यक्ष अक्षय कांबळे यांनी स्वागत केले प्रास्ताविक चेतन साळवे यांनी केले सूत्रसंचालन मनोज अहिरे यांनी केले पंकज वाघ यांनी आभार मानले याप्रसंगी किरण साळवे अजय साळवे रवी जगताप,वसंत अहिरे,संदी[illegible] पवार,बबन शिंदे, शाहूरा[illegible] जगताप,अतुल कांबळे, सुरेश भवर कोंडाजी नेटवटे, प्रभाकर वाघ,आनं[illegible] साबळे, ज्ञानेश्वर जाधव,विजय जाधव उमेश अहिरे, गणपत जाधव, द[illegible] गांगुर्डे, मधुकर कर्डक, कुंदन पगारे सुनील गायकवाड, ज्ञानेश्वर जमदाडे साहिल पगारे आदी उपस्थित होते.

## काँग्रेसतर्फे महामानवास अभिवादन

**नाशिक : प्रतिनिधी**



काँग्रेसतर्फे डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त पेनाची प्रतिकृती हुबेहूब आठ फूट उंच अशी बनवण्यात आली. या प्रतिकृतीचे व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रतिमेचे पूजन खा. डॉ. शोभा बच्छाव, शहर काँग्रेसचे अध्यक्ष आकाश छाजेड, ज्येष्ठ नेते शाहू खैरे,उत्सव समितीचे अध्यक्ष डॉ. वसंत ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आले.

याप्रसंगी माजी नगरसेवक वत्सला खैरे, लक्ष्मण धोत्रे, महिला काँग्रेसच्या अध्यक्ष स्वातीताई जाधव, बाळासाहेब गामणे, बबलू खैरे, हनीफ बशीर, उद्धव पवार, विजय पाटील, अल्तमश शेख, संदीप शर्मा, प्रा. भालचंद्र पाटील, राजकुमार जेप, जगदीश वर्मा, रोहन कातकडे, जगदीश बोडके, जावेद इब्राहिम, ॲड. अरुण दोंदे, राजू अवतडे, राहुल पगार, धोंडीराम बोडके, माया काळे, कुसुम चव्हाण, उषा साळवे, हर्षल पवार, जावेद पठाण, गौरव सोनार, शहाबाज मिर्झा, प्रा. प्रकाश खळे, दिनेश उनवणे, सचिन भुजबळ, अनिल बहोत,फारुक मंसूरी, अनिल बॅग, देवेन मारू, प्रकाश माळी, रोहित वाघ, संतोष हिवाळे, स्वरूप पिसे, ॲड नंदकुमार सूर्यवंशी, सिद्धार्थ गांगुर्डे, संदीप वाघ, उमेश चव्हाण उपस्थित होते.



## मॉडर्न माध्यमिक विद्यालयात जयंती साजरी

**नाशिक : प्रतिनिधी**

मॉडर्न एज्युकेशन सोसायटी संचलित माध्यमिक विद्यालय अशोकनगर या शाळेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती साजरी करण्यात आली. मुख्याध्यापक डॉ. अनिल माळी, रंजय महाले, सुचिता कुलकर्णी, निपाणे, पालक-शिक्षक संघ सदस्य वसंत शिरसाठ, पालक प्रतिनिधी सुनील पगारे उपस्थित होते.

शाळेतील विद्यार्थी निखिल शेवाळे, श्रुती तिडके, वैष्णवी मोहिते, प्रतीक्षा शिंदे, वैभवी मोरे, नेहा पाटील यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याविषयी माहिती सांगितली. प्राथमिक विभागातील विद्यार्थी वंश आखाडे गीत सादर केले. उपशिक्षिका योगिता अहिरे यांनी आंबेडकरांचा विविध पैलू जीवनपट, सामाजिक कार्याबद्दल मार्गदर्शन केले. कार्यक्रमास अशोक बोरसे, भगवान चोरमले, तावडे यांचे सहकार्य लाभले. कार्यक्रमाची सांगता संविधान उद्देशिका वाचनाने करण्यात आली. शाळेतील विद्यार्थी श्रेया तेलंग, निवेदिता बागूल यांनी सूत्रसंचालन केले.

## चवदार तळ्याचे पाणी पूजन करून भीम जयंती साजरी

**नाशिक : प्रतिनिधी**



येथील मखमलाबाद परिसरातील स्वामी विवेकानंदनगर येथे ओम दुर्गा माता मित्र मंडळाच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३४ वी जयंती अनोख्या पद्धतीने साजरी करण्यात आली. यावेळी बाबासाहेबांचे निवासस्थान राजगृह व काळाराम मंदिराची माती व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सत्याग्रह केलेल्या चवदार तळ्याचे पाणी भीम अनुयांना दर्शनासाठी सामाजिक कार्यकर्ते ज्ञानेश्वर काकड यांनी उपलब्ध करून दिले.

यावेळी या कलशांचे भीम अनुयायांनी दर्शन घेऊन डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त त्यांना अभिवादन केले. यावेळी स्वामी विवेकानंदनगर परिसरातील मोठ्या संख्येने नागरिक या अभिवादन कार्यक्रमासाठी उपस्थित असल्याचे बघावयास मिळाले.

या कार्यक्रमाप्रसंगी नागरिकांना संबोधित करताना सामाजिक कार्यकर्ते तथा अमृतवन योग परिवाराचे संयोजक ज्ञानेश्वर काकड यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याला उजाळा देत त्याचबरोबर सर्व भीम अनुयायांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंतीनिमित्त शुभेच्छा देखील दिल्या.

यावेळी माजी नगरसेव[illegible] सुनीताताई पिंगळे, ज्ञानेश्वर पिंगळे सामाजिक कार्यकर्ते गणेश काकड समाधान बोडके, भूषण बच्छाव राहुल जाधव, सतीश दिघे, विकार यादव, अज्ञात पगारे, मयूर भिल सुनील दिघे, रवींद्र अहिरे, महेश दिघे अविनाश शिरसाठ, दत्ता काळे, मनो[illegible] अहिरे, संदीप धात्रक, तुषार गांगुर्डे विक्रम भालेराव आदी उपस्थित होते.

## संविधानाच्या नीतिमूल्यांतूनच नवभारताची निर्मिती : जिल्हाधिकारी

**नाशिक : प्रतिनिधी**

**भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीय संविधानात घालून दिलेल्या नीतिमूल्यांमुळेच आजचा नवभारत निर्माण झाला आहे व या नीतिमूल्यांच्या आधारावरच समाजात सामाजिक समता प्रस्थापित झाली, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी जलज शर्मा यांनी केले.**

समाजकल्याण विभागामार्फत डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक समता सप्ताह राबविण्यात आला. काल डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्ताने सप्ताहाचा समारोप जिल्हाधिकारी जलज शर्मा यांच्या प्रमुख उपस्थितीत झाला. त्याप्रसंगी ते बोलत होते.

भारतीय संविधानातील तरतुदींमुळेच समाजातील सर्व घटकांचा सामाजिक, आर्थिक, व शैक्षणिक विकास झाला असून, त्यातूनच नवभारत निर्माण झाला आहे. विद्यार्थ्यांनी देखील बाबासाहेबांच्या या नीतिमूल्यांचा विचार व कार्याचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून वाटचाल केल्यास निश्चितच विद्यार्थी सर्व क्षेत्रात यशस्वी झाल्याशिवाय राहणार नाही, असा विश्वास जिल्हाधिकारी यांनी व्यक्त केला.





यावेळी जिल्हाधिकारी यांच्या हस्ते सहायक आयुक्तांच्या वतीने कार्यालयात नव्याने स्थापन करण्यात आलेल्या ई-सुविधा कक्षाचे उद्‌घाटन करण्यात आले. तसेच कार्यक्रमाप्रसंगी समाजकल्याण विभागाच्या विविध योजनांचा लाभार्थ्यांचा, तसेच तृतीयपंथी यांनादेखील प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समितीच्या वतीने विद्यार्थ्यांना जात वैद्यता (पडताळणी) प्रमाणपत्राचे देखील वाटप करण्यात आले.

यावेळी समाजकल्याण विभागाचे प्रादेशिक उपायुक्त माधव वाघ, जिल्हा जात पडताळणी समितीचे उपायुक्त राकेश पाटील, सहाय्यक आयुक्त समाज कल्याण नाशिक देवीदास नांदगावकर, जात पडताळणी समितीचे संशोधन अधिकारी योगेश पाटील, तृतीयपंथी समुदायाच्या गुरु सलमा, लेखाधिकारी राजू पाटोळे, संजय सुसलादे आदी मान्यवर याप्रसंगी उपस्थित होते.

या कार्यक्रमाप्रसंगी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे शेत[illegible] विषयातील योगदान या विषयाव[illegible] एचपीटीचे अर्थशास्त्र विभा[illegible] प्रमुख प्रा. डॉ. विजयकुमा[illegible] वावळे यांचे व्याख्यान आयोजि[illegible] करण्यात आले होते. सामाजि[illegible] समता सप्ताहानिमित्त राबवण्या[illegible] आलेल्या विविध उपक्रमांच[illegible] यावेळी सहाय्यक आयुक्त देवीदा[illegible] नांदगावकर यांनी अहवाल साद[illegible] केला. प्रादेशिक उपायुक्त माध[illegible] वाघ यांनी सामाजिक समत[illegible] सप्ताहाची भूमिका यावेळी स्प[illegible] केली. यावेळी समाजकल्या[illegible] विभागाचे व विविध कार्यालयां[illegible] अधिकारी-कर्मचारी शासकी[illegible] वसतिगृहातील विद्यार्थिनी विद्यार्थी उपस्थित होते.

उत्तर महाराष्ट्रातील अग्रगण्य दैनिक
# गांवकरी
■ gavakari.in ■ gavkarinews.com
■ नाशिक, मंगळवार, दि. १५ एप्रिल २०२५



शिवसेना ठाकरेंच्या संवाद दौऱ्यासंदर्भात दिंडोरीत बैठक पान ६



कुटुंबातील महिला निरोगी तर कुटुंब निरोगी : डॉ. तुसे पान ६

## महत्त्वाचे

### सुरगाणा येथे राष्ट्रवादी काँग्रेसचे सभासद नोंदणी अभियान सुरू



**सुरगाणा : प्रतिनिधी**

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने सुरगाणा तालुक्यात सभासद नोंदणी अभियानास उत्साहात सुरुवात करण्यात आली. या अभियानाचा शुभारंभ आमदार नितीन अर्जुन पवार यांच्या मार्गदर्शनाखाली व जिल्हाध्यक्ष रवींद्र पगार यांच्या सूचनेनुसार करण्यात आला. या अभियानाचे नेतृत्व तालुकाध्यक्ष राजू (दादा) पवार यांनी केले. त्यांच्यासोबत कार्याध्यक्ष युवराज लोखंडे, युवक तालुकाध्यक्ष भास्कर अलबाड, तसेच विद्यार्थी तालुकाध्यक्ष दिनेश चौधरी यांच्या प्रमुख उपस्थितीत हा उपक्रम राबवण्यात येत आहे. या अभियानात गोपाळराव धूम, कार्याध्यक्ष युवराज लोखंडे, युवक अध्यक्ष भास्कर अलबाड, विद्यार्थी अध्यक्ष दिनेश चौधरी, गटप्रमुख तुकाराम देशमुख, तसेच माधव शेठ, दीपक मेघा, रामदास केंगा, प्रवीण पवार, पुंडलिक खाबाईत, योगेश ठाकरे, सुनील महाले, आत्माराम भोये, भास्कर पवार, दादाजी चव्हाण, प्रकाश धूम, जयकुमार माळी, गुलाब गावंडे, मोहन जाधव, मोहनदास भोये, पुंडलिक घांगळे, संतोष भोये, अशोक गवळी (सरपंच, बोरगाव ग्रामपंचायत), मनोज देशमुख, सुरेश वार्डे आणि रामदास देशमुख यांचा सक्रिय सहभाग लाभला. सभासद नोंदणीसाठी तालुक्यातील युवक, विद्यार्थी, महिला व सर्वसामान्य कार्यकर्त्यांमध्ये उत्साह असून, अनेकांनी सदस्यत्व स्वीकारले आहे. आगामी काही दिवसांमध्ये संपूर्ण तालुक्यात हे अभियान प्रभावीपणे राबवले जाणार आहे.

### विनामूल्य सहाय्यक उपकरणांसाठी नावनोंदणीला उत्स्फूर्त प्रतिसाद!




**नाशिक : प्रतिनिधी**

भगवान महावीर जन्मकल्याणक दिन व उत्तर भारतीय प्रवर्तक प. पू. आशिष मुनीजी म. सा. यांच्या ५२ व्या दीक्षा दिवसानिमित्त राष्ट्रीय वयोश्री योजनेंतर्गत ज्येष्ठ नागरिकांसाठी सहाय्यक उपकरणांसाठी विनामूल्य नावनोंदणी शिबिर आयोजित करण्यात आले. काल दि.१४ रोजी हे शिबिर झाले. यावेळी १०० पेक्षा जास्त ज्येष्ठ नागरिकांनी उत्स्फूर्तपणे प्रतिसाद दिला. महावीर धर्मार्थ हॉस्पिटल अध्यक्ष नंदलाल पारख यांनी स्वागत, प्रास्ताविक केले. प्रमुख पाहुण्या म्हणून आ. देवयानी फरांदे उपस्थित होत्या. मंत्री विनोद कांकरिया, सहमंत्री नीलेश भंडारी, सहकोषाध्यक्ष जितेंद्र लोढा व कार्यकारिणी सदस्य व्यासपीठावर उपस्थित होते. यावेळी ज्येष्ठ नागरिकांच्या चेहऱ्यावर हास्य फुलवण्याचे उद्दिष्ट सफल झाले. सामाजिक न्याय मंत्रालय व एलिम्को यांच्या समन्वयाने व भारतीय जैन संघटना, मारवाडी युवा मंच नाशिक शाखेच्या सहकार्याने सोमवारी सकाळी १०.३० वाजेपासून श्री महावीर धर्मार्थ दवाखाना संचालित आरएमडी हॉस्पिटल, शिवसमर्थनगर, आरटीओ ऑफिसजवळ, पेठ रोड, नाशिक येथे नावनोंदणीला प्रारंभ करण्यात आला.

# पांडवलेणीत युवकाचा खून; ३ आरोपी अटकेत

## विधिसंघर्षित बालकाचाही सहभाग; क्षुल्लक कारणावरून हत्या

**सिडको : विशेष प्रतिनिधी**




पांडवलेणी परिसरात कबुतरबाजीच्या वादातून झालेल्या हाणामारीत एका १९ वर्षीय तरुणावर धारधार सुऱ्याने वार करत खून करण्यात आला. या धक्कादायक घटनेनंतर केवळ सहा तासांत गुन्हे शाखा युनिट क्रमांक १ नाशिक शहरच्या पथकाने तत्काळ कारवाई करत तीन आरोपी आणि एका विधिसंघर्षित बालकाला अटक केली.

ही घटना १३ एप्रिल २०२५ रोजी रात्री ११.३० वाजेच्या सुमारास घडली. मयत रामदास नारायण बोराडे याला आरोपी शौकत शेख, नफीज सय्यद, विजय माळेकर, प्रिन्स पालवे, रोहित पालवे, राहुल कुंभार आणि त्यांच्या इतर साथीदारांनी धारदार शस्त्राने हल्ला करून ठार मारले. वादाचे कारण अत्यंत क्षुल्लक होते. नेत्रदीप याचे दोन कबुतर विजय माळेकर याने घेऊन ते शौकत शेखच्या कबुतरांच्या पेटीवर ठेवले, अशा क्षुल्लक कारणावरून वाद करून संशयित आरोपींनी रामा बोराडेंवर हल्ला केला.

या घटनेनंतर फिर्यादी साहिल राजन सिंग यांनी इंदिरानगर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. त्यानुसार भारतीय हत्यार कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला. पोलिस आयुक्त संदीप कर्णिक यांच्या सूचनेनुसार, उपायुक्त प्रशांत बच्छाव आणि सहायक आयुक्त संदीप मिटके यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष पथके तयार करण्यात आली.

गुन्हे शाखा युनिट १ चे अधिकारी व कर्मचारी घटनास्थळी दाखल होऊन तपास सुरू केला. पोहवा विशाल काठे व पोना विशाल देवरे यांना गुप्त बातमीदाराकडून माहिती मिळाली की, आरोपी समर्थनगर, पाथर्डी फाटा परिसरात लपून बसले आहेत. त्या माहितीवरून वरिष्ठ पोलीस निरीक्षक मधुकर कड यांच्या नेतृत्वाखाली पथकाने तत्काळ छापा टाकला. नफीज सय्यद (२२), शौकत शेख (१८), कार्तिक भडांगे (१८) आणि एक विधिसंघर्षित बालक यांना अटक करण्यात आली. चौकशीदरम्यान त्यांनी गुन्ह्याची कबुली दिली.

# अत्यल्प दरात मिळणार आता मेन्स्ट्रुअल कप

## जि.प. आरोग्य विभागाचा उपक्रम

**नाशिक : प्रतिनिधी**

जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागाने महिलांच्या मासिक पाळी स्वच्छता जनजागृती आणि आरोग्य संवर्धनासाठी विविध उपक्रम राबवले आहेत. त्याचाच एक भाग म्हणून मेन्स्ट्रुअल कप वापराबाबत जनजागृती, स्वच्छता आणि प्रशिक्षण देण्यात येणार आहे. तसेच ग्रामीण भागात आशा आणि आरोग्यसेविका यांना प्रशिक्षण दिले जाणार आहे. यावेळी लाभार्थी मुली महिलांना अत्यल्पदरात मेन्स्ट्रुअल कप उपलब्ध करून देण्यात येणार असल्याची माहिती जि.प. अतिरिक्त आरोग्य अधिकारी डॉ. राजेंद्र बागुल यांनी दिली आहे.



या योजनेचे उद्दिष्ट मासिक पाळीच्या स्वच्छतेबाबत जागरूकता वाढवणे आणि मेन्स्ट्रुअल कपच्या वापराबाबत स्वच्छता आणि पुनर्वापर करता येत असल्याने सॅनिटरी पॅडची विल्हेवाट लावण्यापासून मुक्ती मिळणार आहे. तसेच मेन्स्ट्रुअल कपचा पुनर्वापर करता येत असल्याने एकदा खरेदी केल्यानंतर अनेकदा योग्य पद्धतीने त्याचा वापर करता येणार असल्याने पैशांची बचत होणार आहे.

मासिक पाळीच्या स्वच्छतेबाबत जि.प. आरोग्य विभागामार्फत एक उपक्रम राबविण्यात येणार आहे. या उपक्रमांतर्गत प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये महिलांना मेन्स्ट्रुअल कप अत्यल्प दरात मिळणार असून, या उपक्रमासाठी आशासेविका आणि आरोग्यसेविका यांच्यासाठी प्रशिक्षण आयोजित करण्यात येणार आहे. मेन्स्ट्रुअल कपचे फायदे, स्वच्छता आणि पुनर्वापर दोन्ही गोष्टी साध्य होणार असल्याने मेन्स्ट्रुअल कपबद्दल जनजागृतीसाठी प्रयत्न करण्यात येणार आहे. आशासेविका आणि आरोग्यसेविकांमार्फत लाभार्थ्यांपर्यंत पोहचविण्याचा मानस आहे.

पुढील आठवड्यापासून या उपक्रमाची सुरुवात होणार आहे. कंपन्यांशी करार करून मेन्स्ट्रुअल कप उपलब्ध करण्यात येणार आहे.

### काय आहे मेन्स्ट्रुअल कप

मासिक पाळीचा कप हे मासिक पाळीच्या स्वच्छतेचे साधन आहे, जे मासिक पाळीच्या दरम्यान योनीमध्ये घातले जाते. मासिक पाळीतील द्रव (गर्भाशयाच्या आवरणातून इतर द्रवांसह मिसळलेले रक्त) गोळा करणे हा त्याचा उद्देश आहे. मासिक पाळीचे कप इलास्टोमर्स (सिलिकॉन रबर्स, लेटेक्स रबर्स किंवा थर्मोप्लास्टिक रबर्स) बनलेले असतात. योनीच्या आकाराचा कोन स्वरूपाचा कप आहे. जो मासिक पाळीच्या दिवसांत व्हजायनामध्ये फिट बसतो. यामध्ये मासिक पाळीतील रक्त जमा होते. हे वापरणे सोपे असून, पॅड आणि टॅम्पॉनपेक्षा याचा वापर अधिक चांगला करता येतो.

# शिवभोजन थाळीचा तीन कोटींचा निधी रखडला

## शासनाकडे निधी अडकल्याने केंद्रचालक आर्थिक संकटात

**नाशिक : प्रतिनिधी**

शिवभोजन केंद्रांचा फेब्रुवारी आणि मार्च महिन्याचे सुमारे ३ कोटी रुपये थकले आहेत. निधी अडकल्याने शिवभोजन केंद्रे अडचणीत आली आहेत. शासनाने लवकरात लवकर निधी उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी शिवभोजन केंद्रांकडून केली जात आहे.

शिवभोजन थाळी ही महाराष्ट्र शासनानी महत्त्वाकांक्षी योजना आहे. योजनेद्वारे गरीब व गरजू नागरिकांना स्वस्त दरात पौष्टिक व सकस जेवण उपलब्ध करून देण्यात येते.

सरकारने २६ जानेवारी २०२० रोजी शिवभोजन थाळी योजनेला सुरुवात केली. ही थाळी १० रुपयांत उपलब्ध करून देण्यात आली. थाळीमध्ये २ पोळ्या, १ भाजी, १ वाटी भात, १ वाटी आमटी वरण उपलब्ध करून देण्यात येते. आर्थिकदृष्ट्या दुर्बल व्यक्ती, श्रमिक, कामगारवर्ग, विद्यार्थी, वृद्ध नागरिक आदींना १० रुपयांत जेवण उपलब्ध करून देणे हाच या योजनेमागचा उद्देश आहे. स्थानिक संस्था, एनजीओ, बचतगटांना शिवभोजन केंद्रे सुरू करण्यास परवानगी दिली. शहरातील स्थलांतरित मजूर अनेक वेळा अन्नाशिवाय उपाशी राहतात, यामुळे शरीरात पोषणतत्त्वांची कमतरता तयार होते. ही कमतरता दूर करण्यासाठी शासनातर्फे शिवभोजन थाळी सुरू करण्यात आली आहे. जानेवारीचे शहरी भागाचे १ कोटी रुपये तर ग्रामीण भागातील शिवभोजन केंद्रांचे डिसेंबर-जानेवारीचे ७८ लाख रुपये अदा करण्यात आले आहे. शहरी व तालुका मिळून फेब्रुवारी व मार्चचे एकूण ३ कोटी रुपये थकले आहेत. हा निधी त्वरित मिळावा, अशी मागणी शिवभोजन केंद्रांकडून करण्यात येत आहे.

नाशिक जिल्ह्यातील शहरी भागात ७५ तर तालुकास्तरावर ५० शिवभोजन केंद्रे आहेत. यातून शहरी भागातील गरजूंना दररोज ९ हजार १७५ थाळ्या तर तालुकास्तरावर ५ हजार ८२५ थाळ्या पुरविल्या जातात. मागणीनुसार एका केंद्रावर दररोज ७५ ते २०० थाळ्या पुरविल्या जातात. सरकारी कार्यालये, रेल्वेस्टेशन, बसस्थानक परिसर, नगर परिषद, महापलिका हद्दीत शिवभोजन केंद्रे उघडण्यास सरकारने मंजुरी दिली.

### योजना बंद होणार असल्याच्या चर्चा



निधीअभावी ही योजना बंद करण्याचा विचार शासनस्तरावर सुरू असल्याच्या चर्चा सुरू होत्या. यामुळे गरीब आणि गरजू नागरिकांच्या पोषणावर परिणाम होण्याची शक्यता व्यक्त केली जात होती. यावर माजी मंत्री छगन भुजबळ यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र लिहून ही योजना पूर्ववत सुरू ठेवण्याची विनंती केली होती. त्यानंतर उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी विधानसभेत स्पष्ट करताना सांगितले की, शिवभोजन थाळी आणि आनंदाचा शिधा या योजना बंद केल्या जाणार नाहीत. संबंधित विक्रेत्यांची थकबाकी लवकरात लवकर निकाली काढण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत.

# दिल्लीवरून नाशिकसाठी उडान आता टर्मिनल एकवरून होणार

**नाशिक : प्रतिनिधी**

सध्या इंडिगो एअरलाइन्सद्वारे ही सेवा सुरू असून, १५ एप्रिलपासून दिल्ली आंतरराष्ट्रीय विमानतळावर टर्मिनल २ च्या देखभाल -दुरुस्तीसाठी आता इंडिगोची सर्व उड्डाणे टर्मिनल-२ वरून टर्मिलन-१ वर हलविण्यात आली असल्याचे इंडिगोने जाहीर केले आहे.




या पार्श्वभूमीवर दिल्लीतील इंदिरा गांधी आंतरराष्ट्रीय विमानतळावर टर्मिनल बदल करण्यात आला असून, १५ एप्रिलपासून इंडिगोची सर्व उड्डाणे टर्मिनल-२ वरून टर्मिनल-१ वर हलविण्यात येणार असल्याचे निवेदन जारी करण्यात आले आहे. दिल्ली विमानतळ प्रशासनाने यासंदर्भात स्पष्ट केले आहे की, टर्मिनल-२ वर मोठ्या प्रमाणावर देखभाल आणि सुधारणा कामे सुरू होणार असल्याने हा बदल आवश्यक आहे. परिणामी, टर्मिनल-२ येत्या दोन आठवड्यांसाठी बंद राहणार आहे. नाशिकहून दिल्लीसाठी दररोज सकाळी ९ वाजता इंडिगोची थेट विमानसेवा उपलब्ध आहे. यामुळे नाशिकहून दिल्लीला प्रवास करणाऱ्या प्रवाशांनी आपली तिकिटे तपासून नवीन टर्मिनलमधून उड्डाणाची नोंद घ्यावी, असे आवाहन इंडिगो एअरलाइन्सने केले आहे.

# टूर सर्किट सहलीचा १०५ जणांनी घेतला लाभ

## महामानवाच्या कार्याच्या प्रसारासाठी आयोजन

**नाशिक : प्रतिनिधी**



डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महान कार्याची समाजातील सर्वच स्तरातील नागरिकांपर्यंत पोहोचवण्यासाठी राज्य सरकारच्या पर्यटन विभाग व पर्यटन संचालनालयामार्फत देखो अपना देश या योजनेंतर्गत टूर सर्किटचे आयोजन करण्यात आले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंतीनिमित्त १४ व १५ एप्रिल रोजी या सहलीचे विनाशुल्क आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमाच्या पहिल्या दिवशी १०५ पर्यटकांनी लाभ घेतला.

बाबासाहेबांचे विचार, त्यांचे सामाजिक योगदान आणि भारतीय संविधान निर्मितीतील त्यांचे कर्तृत्व यांचा गौरव करणे हा या सर्किटचा उद्देश आहे. या सर्किटद्वारे पर्यटकांना बाबासाहेबांच्या जीवनाशी निगडित महत्त्वाच्या स्थळांचा अनुभव घेता येईल. ज्यामुळे त्यांचा इतिहास आणि तत्त्वज्ञान समजण्यास मदत होईल. सहलीदरम्यान पर्यटकांना महामानव आंबेडकरांवरील पुस्तिकेचे वाटप करण्यात आले.

> इ.स. पूर्व २०० च्या दरम्यान खोदलेल्या बौद्ध लेणी – त्रिरश्मी लेणीला पर्यटकांनी भेट देऊन त्याची माहिती घेतली. लेणीच्या पायथ्याशी बांधलेल्या बौद्ध स्मारक स्तूपाला भेट देऊन स्तूपाभोवती श्रीलंकेतील अनुराधापूर येथून आणलेल्या महाबोधी वृक्षाची शाखा – बोधिवृक्षाचे दर्शन तसेच स्तूपामध्ये पर्यटकांनी ध्यान आणि प्रार्थना केली. त्यानंतर महामानव आंबेडकरांनी अस्पृश्यता निवारणासाठी जे लढे दिले त्यातील महत्त्वाचे काळाराम मंदिर येथे पर्यटकांनी भेट दिली. त्यानंतर येवला येथील मुक्तिभूमी स्मारकास भेट देण्यात आली.
>
> **- मधुमती सरदेसाई,** उपसंचालक – पर्यटन संचालनालय, नाशिक विभाग

शासनाद्वारे सुरू करण्यात आलेला हा उपक्रम अतिशय उपयुक्त असल्याचे पर्यटकांनी सांगितले. या सहलीमध्ये सहभागी होण्याची संधी बालगोपाळांसह आबालवृद्धांनीही घेतली. ही सहल पर्वणी ठरली. पर्यटनासह अभ्यास दौरा देखील झाला आहे.

### शहरात उकाडा

नाशिक : शहरात गेल्या दोन दिवसांपासून तपमानाचा पारा काहीसा कमी झाला असला तरी दुपारच्या वेळी नागरिकांना उकाडा सहन करावा लागत आहे.

# पिंक ई-रिक्षासाठी ७०० लाडक्या बहिणी पात्र

**जिल्ह्यातील एक हजार महिलांना मिळणार योजनेचा लाभ**

**नाशिक : प्रतिनिधी**



राज्य सरकारच्या वतीने महिला व सबलीकरणासाठी विविध योजना राबवण्यात आल्या आहेत. महिला व बालविकास विभागाच्या ८ जुलै २०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये राज्यातील महिला व मुलींना रोजगार निर्मितीस चालना देणे, त्यांचे आर्थिक, सामाजिक पुनर्वसन करणे, स्वावलंबी व आत्मनिर्भर बनविणे यासह सुरक्षित प्रवासासाठी गरजू महिलांना पिंक (गुलाबी) ई-रिक्षा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. राज्यातील १७ शहरांतील १० हजार महिलांना या योजनेचा लाभ देण्यात येणार आहे.

नाशिक शहरातील १ हजार महिला लाभार्थ्यांना या योजनेचा लाभ देण्यात येणार आहे. या योजनेसाठी महिला व बालविकास विभागाकडून अर्ज स्वीकारण्यास सुरुवात झाली आहे. आतापर्यंत महिला बालविकास विभागाला महिलांचे ९९८ अर्ज प्राप्त झाले होते. त्या अर्जाची छाननी करून ७०० अर्ज महिला व बालविकास विभागाकडून पात्र ठरवण्यात आले आहे. तर २९८ अर्ज अपात्र ठरवण्यात आले आहेत. योजनेच्या पूर्ततेसाठी अजून ३०० अर्जांची आवश्यकता महिला व बालविकासला लागणार आहे. महिलांनी योजनेचा लाभ घेण्यासाठी अर्ज दाखल करावेत, असे आवाहन महिला व बालविकास विभागाकडून करण्यात आले आहे.

शहरात यापूर्वी देखील पिंक रिक्षाचा प्रयोग करण्याचे अनेक सेवाभावी संस्था तसेच महापालिकेने ठरविले होते. त्यासाठी महापालिकेच्या महिला व बालकल्याण विभागामार्फत प्रशिक्षणाचेही आयोजन करण्यात आले होते. या पिंक रिक्षासाठी बँकेमार्फत वित्त सहाय्य देखील करण्याचे ठरविण्यात आले होते. मात्र, महिलांचा फारसा प्रतिसाद मिळाला नव्हता. शहरात पिंक रिक्षाचे प्रमाण इतर शहराच्या तुलनेत अतिशय कमी आहे. बोटावर मोजण्याइतक्या पिंक रिक्षा पाहावयास मिळतात. त्यामुळे आता या योजनेचा किती महिला लाभ घेतात. याकडे लक्ष लागून आहे.

### ही कागदपत्रे आवश्यक

लाभार्थींना योजनेसाठी अर्ज, आधार कार्ड, पॅन कार्ड, अधिवास प्रमाणपत्र, कुटुंबप्रमुखाचा तीन लाखांपेक्षा कमी उत्पन्न असलेला वार्षिक उत्पन्नाचा दाखला, मतदान कार्ड, केशरी किंवा पिवळे रेशन कार्ड, बँक पासबुक, पासपोर्ट फोटो, मतदान ओळखपत्र, रेशनकार्ड, महिला स्वतः रिक्षा चालवण्याचे हमीपत्र, महिलेचे बँक कर्ज नसल्याचे हमीपत्र, अटी व शर्ती पालन करण्याचे हमीपत्र द्यावे लागणार आहे.

### येथे करावा लागेल अर्ज

जिल्हा महिला व बालविकास अधिकारी कार्यालय नाशिक तसेच www.nashik.gov.in या संकेतस्थळावर, महानगरपालिका, नाशिक मुख्य कार्यालय व जवळच्या अंगणवाडी केंद्रात उपलब्ध आहेत. इच्छुक महिलांनी आपले अर्ज आवश्यक कागदपत्रांसह जिल्हा महिला व बालविकास अधिकारी कार्यालय, नासर्डी पुलाजवळ, नाशिक क्लब समोर, नाशिक–पुणे रोड, नाशिक येथे सादर करावेत.

### ई-रिक्षा किमतीच्या ७० टक्के कर्ज

योजनेत ई–रिक्षाच्या किमतीमध्ये जीएसटी, रजिस्ट्रेशन, रोड टॅक्स आदी करांचा समावेश राहणार आहे. नागरी सहकारी बँका, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका,राष्ट्रीयीकृत बँका, अनुज्ञेय असलेल्या खासगी बँकांकडून ई–रिक्षा किमतीच्या ७० टक्के कर्ज उपलब्ध करून देण्यात येणार आहे. राज्य शासन २० टक्के आर्थिक भार उचलेल, योजनेची लाभार्थी महिला, मुली यांना १० टक्के स्वहिस्सा भरावा लागणार आहे. कर्जाची परतफेड करण्यासाठी पाच वर्षे मुदत राहणार आहे.

### असे आहेत योजनेचे निकष

१. अर्जदाराचे वय २० ते ५० वर्षे असावे.
२. लाभार्थीचे कुटुंब महाराष्ट्रातील रहिवासी असणे आवश्यक आहे.
३. योजनेचा लाभ घेण्यासाठी अर्ज करणाऱ्या लाभार्थ्यांचे बँक खाते असणे आवश्यक आहे.
४ लाभार्थी कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न ३ लाख रुपयांपेक्षा जास्त नसावे.
५ विधवा, कायद्याने घटस्फोटित, राज्यगृहामधील इच्छुक प्रवेशित, अनाथ प्रमाणपत्रप्राप्त युवती, अनुरक्षणगृह बालगृहातील आजी–माजी प्रवेशितांना प्राधान्य देण्यात येणार आहे.

॥ दशक्रिया विधी ॥



कै.सौ.अंजली शशी जाधव
यांचा दशाह कर्म विधी आणि तिलांजली
बुधवार, दि.१६/०४/२०२५ रोजी
सकाळी ९.०० वा. यशवंत महाराज मंदिरा समोरील पटांगणात रामतीर्थ गंगागोदावरी घाट दुतोंड्या मारुती समोर नाशिक येथे संपन्न होणार आहे.
प्रसादाचा कार्यक्रम सु-व्यवस्थे करिता सकाळी ११.०० वाजेपासून दुतोंड्या मारुती जवळील श्री लेऊवा पाटीदार समाज कार्यालय येथील तळमजल्यावरील हॉलमध्ये आयोजित केला आहे.
* शोकाकुल *
शशी रामचंद्र जाधव
सौ.कल्याणी राहुल गाडगीळ
समस्त जाधव परिवार



कॅमेरून-आयमात व्यापार वृद्धीबाबत करार पान ३

नाशिक आज

# गांवकरी



'तोडी मिल फँटसी'सारखं नाटक करण्याची अंकुश चौधरीची इच्छा पान ३

■ नाशिक, मंगळवार, दि. १५ एप्रिल २०२५

## महत्त्वाचे



### संतोष झगडे यांना समाजभूषण पुरस्कार

**नाशिक : प्रतिनिधी**

कोकण मराठी पत्रकार संस्था प्रथम वर्धापन दिनानिमित्त संतोष झगडे यांना समाजभूषण पुरस्कार प्रदान करण्यात आला. गणेश मंगल कार्यालय कालकाई मंदिराशेजारी, भरणे नाका, ता. खेड, जिल्हा रत्नागिरी येथे आयोजित शानदार समारंभात समाजासाठी भरीव योगदान देणाऱ्या कोकण रत्नांच्या सत्कार सोहळ्याला महाराष्ट्र राज्याचे उद्योग मंत्री, रत्नागिरी जिल्ह्याचे पालकमंत्री ना. उदय सामंत, त्याचप्रमाणे गृहराज्यमंत्री योगेशदादा कदम यांच्या प्रमुख उपस्थितीत संतोष विठोबा झगडे यांना सन्मानपूर्वक समाजभूषण पुरस्कार प्रदान करण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सुकृत खांडेकर होते. संजय भावे, शशिकांत सावंत, वसई विरार पत्रकार संघाचे अध्यक्ष अनिलराज रोकडे, अजय बिरवटकर, नरेश बिरवाडकर हे उपस्थित होते. कार्यक्रमाचे आयोजन कोकण मराठी पत्रकार संस्थेचे संस्थापक अध्यक्ष एकनाथ बिरवटकर यांनी केले होते.

### फलक रेखाटून अभिवादन




**नाशिक :**

देवळा एज्युकेशन सोसायटीच्या दर्शनी फलकावर कलाशिक्षक भारत पवार यांनी रंगीत खडूने क्रांतिसूर्य, बोधिसत्व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर व महात्मा जोतिबा फुले यांचे चित्र रेखाटून अभिवादन केले. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे भारतीय न्यायशास्त्रज्ञ, अर्थशास्त्रज्ञ, राजकारणी, तत्त्वज्ञ आणि समाजसुधारक होते. त्यांनी दलित बौद्ध चळवळीला प्रेरणा दिली आणि अस्पृश्य लोकांविरुद्ध होणारा सामाजिक भेदभाव नष्ट करण्यासाठी चळवळ उभारली. महिलांच्या आणि कामगारांच्या हक्कांचे समर्थन केले. ते स्वतंत्र भारताचे पहिले कायदेमंत्री, भारतीय संविधानाचे शिल्पकार, भारतीय बौद्ध धर्माचे पुनरुज्जीव होते. देशाच्या विविध क्षेत्रांत दिलेल्या योगदानामुळे त्यांना 'आधुनिक भारताचे शिल्पकार' किंवा 'आधुनिक भारताचे निर्माते' असेही म्हणतात.

### मोरया जॉगर्सतर्फे अभिवादन


**नाशिक : प्रतिनिधी**



भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त हुतात्मा अनंत कान्हेरे मैदान येथे मोरया जॉगर्स ग्रुपतर्फे संजय निकम यांनी प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. बाबासाहेब यांनी केलेल्या समाजकार्याची जाण ठेवत त्यांना आदरांजली वाहण्यासाठी मोरया ग्रुप व सर्व जॉगर्स ग्रुप यांच्या वतीने महामानव बाबासाहेबांच्या जयंतीचे आयोजन करून त्यांना अभिवादन करण्यात आले. मोरया ग्रुपच्या सर्व सदस्यांनी व जॉगर्सधारकांनी गुलाबपुष्प अर्पण केले.



डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव मिरवणुकीला प्रारंभ. (छाया : रविकांत ताम्हणकर)





मिरवणुकीत सहभागी चित्ररथ.

# 'जय भीम'च्या जयघोषात डॉ. आंबेडकर जयंतीचा उत्साह

## मिरवणुकीतील चित्ररथांनी वेधले लक्ष; पोलिसांचा चोख बंदोबस्त

**नाशिक : प्रतिनिधी**

**शहरात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची १३४ जयंती सोमवारी (दि.१४) मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी भीमसैनिकांकडून 'डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा विजय असो,' 'जय भीम...', 'एकच साहेब बाबासाहेब' आदींसह घोषणांनी मुख्य मिरवणूक मार्ग परिसर दुमदुमून टाकला. मोठा राजवाडा येथून मिरवणुकीला प्रारंभ झाला.**




आमदार देवयानी फरांदे व पोलीस उपायुक्त किरणकुमार चव्हाण यांच्या हस्ते मिरवणुकीला प्रारंभ झाला. यावेळी आनंद सोनवणे, यश शिंदे, अर्जुन पगारे, बाळासाहेब शिंदे, निखिल पवार, रामसिंग बावरी, दीपचंद दोंदे, बॉबी काळे आदी उपस्थित होते. सायंकाळी काढण्यात आलेल्या चित्ररथ मिरवणुकीत भीमसैनिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. यावेळी पोलिसांचा बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. आकर्षक विद्युत रोषणाईने सजविलेले चित्ररथ, आबालवृद्धांनी संपूर्ण मार्गावर केलेली गर्दी, एकच साहेब, बाबासाहेबचा जयघोष आणि ढोल-ताशांच्या तालावर रात्री उशिरापर्यंत भीमसैनिकांनी धरलेला ठेका, अशा उत्साहात घटनेचे शिल्पकार, बोधिसत्त्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेची मिरवणूक काढण्यात आली. शहर परिसरात उत्साहात जयंती साजरी करण्यात आली. यानिमित्त दिवसभर विविध कार्यक्रमांबरोबरच सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होत. मुख्य मिरवणूक मार्ग सायंकाळपासून आंबेडकर अनुयायांनी फुलून गेल्याचे चित्र पहावयास मिळाले.

**या मार्गे निघाली मिरवणूक**

चौकमंडई, वाकडी बारव, दूधबाजार, गाडगेबाबा पुतळा, रेडक्रॉस सिग्नल, नेहरू गार्डन, शिवाजीरोड येथील पुतळ्याला अभिवादन करून रात्री उशिरा मिरवणुकीचा समारोप करण्यात आला. डॉ. आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त परिसरात आकर्षक सजावट करण्यात आली होती. परिसरात ठिकठिकाणी शुभेच्छाफलक उभारण्यात आले होते.

**फटाक्यांची आतषबाजी**

आंबेडकर उत्सव समितीतर्फे फटाक्यांची नेत्रदीपक आतषबाजी करण्यात आली. फटाक्यांची आतषबाजी बघण्यासाठी व मोबाइलमध्ये कैद करण्यासाठी मोठी गर्दी झाली होती. जयंतीमुळे सोमवारी सायंकाळी वाहतूक अन्य मार्गाने वळविण्यात आली होती. मिरवणूक मार्गावर ठिकठिकाणी स्वागत करण्यात येत होते.

**हेलिकॉप्टरद्वारे पुष्पवृष्टी नाही**

शहरात तीन ठिकाणी हेलिकॉप्टरवरून पुष्पवृष्टी करण्यात येणार होती, परंतु परवानगी नाकारल्याने कोठेही पुष्पवृष्टी झाली नाही.

# शिंदे गावात बारदान गोडावूनला भीषण आग

## कारण गुलदस्त्यात; आठ ते दहा लाखांचे नुकसान

**नाशिकरोड : प्रतिनिधी**

नाशिकरोड शहरापासून अगदी हाकेच्या अंतरावरील शिंदे गावाजवळील औद्योगिक वसाहतीतील तिरुपती मंगल कार्यालयाशेजारील बारदान गोडावूनला पहाटे अचानक आग लागल्याने आठ ते दहा लाखांचे नुकसान झाले. नाशिकरोड येथील अग्निशमन बंबाद्वारे जवानांनी आग नियंत्रणात आणली. संपूर्ण आग विझविण्यास जवळपास दहा बंब लागल्याचे बोलले जात आहे.

नायगाव रोडवर मॉर्निंग वॉकला जाणाऱ्या नागरिकांनी अचानक गोडावूनला आग लागली असल्याचे पाहिले. त्यांनी गावात दूरध्वनीवरून इतरांना कळविले. आग लागल्याची बातमी कळताच नागरिकांनी धाव घेतली. घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन लगेचच काही नागरिकांनी अग्निशमन दलाला पाचारण केले.



**शिंदे : येथील औद्योगिक वसाहतीमध्ये बारदान गोडावूनला पहाटेच्या दरम्यान लागलेली आग. (छाया : सुनील पवार)**

अग्निशमन दलाच्या दोन वाहनांनी आग विझविण्यासाठी शर्तीचे प्रयत्न करून विझवली. आगीत जवळपास ८ ते १० लाखांचे मोठे नुकसान झाले. हे गोडावून नाशिकरोडचे दर्शन बिंद्रा यांच्या मालकीचे असल्याचे समजते, मात्र त्यांनी कैलास राजपूत रा. जळगाव यांना दोन महिन्यांपूर्वी बारदान ठेवण्यासाठी भाडेतत्त्वावर दिले होते.

आग विझविण्यासाठी गावातील पोलीसपाटील रवींद्र जाधव, सामाजिक कार्यकर्ते राजेंद्र सांबळे, दिलीप जाधव, रवींद्र साठे, संतोष जाधव, सागर जाधव, अर्जुन सिरसागर आदींसह नागरिकांनी आग विझविण्यासाठी अग्निशमन दलालांच्या जवानांना सहकार्य केले.

**वर्षात तीनदा आग...**

शिंदे गावालगत असणाऱ्या औद्योगिक वसाहतीतील व्यावसायिक प्लॉटवर अनेक छोट्या-मोठ्या कंपन्या थाटलेल्या आहेत. ही वसाहत खासगी असल्याचे बोलले जात आहे.

या ठिकाणी वर्षभरात जवळपास तीन कंपन्यांना आग लागून आजपर्यंत लाखोंचे नुकसान झाले. २०२४ मधे पाटालगत बारदान कंपनीलाच आग लागली. त्या पाठोपाठ फटाक्यांची कंपनी आणि आता पुन्हा बारदान गोडावूनला आग लागली.

# अग्निशमनच्या ताफ्यात येणार अत्याधुनिक शिडी

**नाशिक : प्रतिनिधी**

शहराचा झपाट्याने होणारा विस्तार आणि उंच इमारती, अपार्टमेंट्स, व्यावसायिक संकुलांची संख्या वाढत आहे. एकीकडे गगनचुंबी इमारती उभ्या होत असताना आगीच्या घटनांपासून सुरक्षा मिळावी यासाठी महापालिकेच्या अग्निशमनच्या ताफ्यात अत्याधुनिक शिडी असणे आवश्यक असल्याने थेट फिनलॅण्ड येथून ३२ मीटर अत्याधुनिक शिडी आणण्यात येणार आहे.

आगीच्या घटनांवर नियंत्रण ठेवताना ही शिडी मोठी भूमिका बजावणार आहे. फिनलॅण्डहून ३२ मीटर अत्याधुनिक हायड्रॉलिक शिडी असेल. अँटी-स्लिप पायऱ्या, सेफ्टी लॉक यंत्रणा, स्टॅबिलायझर सिस्टम या शिडीला राहणार आहे. नाशिक महापालिकेच्या अग्निशमन विभागासाठी फिनलॅण्डहून ३२ फूट लांबीची आधुनिक शिडी (हायड्रॉलिक लॅडर) मागवण्यात आली असून, लवकरच शहरात दाखल होणार आहे.

ही शिडी तयार करण्याच्या कामाला सुरुवात झाली असून, ८० टक्के काम झाल्यावर तेथून पत्र मनपाला येणार आहे. त्यानंतर मनपा अग्निशमन दलाचे अधिकारी फिनलॅण्डला जाऊन पाहणी



करतील. दरम्यान, वृक्षछाटणी व बॅनर हटवण्याचे काम, पूरस्थिती किंवा भूकंपाप्रसंगी मदतकार्य, शहरात झपाट्याने वाढणाऱ्या नागरीकरणाच्या पार्श्वभूमीवर, अग्निशमन दलाच्या ताफ्यात उच्च दर्जाची उपकरणे असणे ही काळाची गरज बनली आहे.

या पार्श्वभूमीवर फिनलॅण्डमधून मागवलेली ही शिडी महत्त्वपूर्ण ठरणार आहे. बहुमजली इमारतीला आग लागल्यास या शिडीच्या सहाय्याने आग विझवली जाईल.

पुढील वर्षीच्या फेब्रुवारी महिन्यात सदर अत्याधुनिक शिडी शहरात दाखल होण्याची शक्यता आहे. यापूर्वीच्या शिडीची मुदत संपुष्टात आल्याने नव्या ३२ शिडीची मोठी आवश्यकता असल्याने पालिकेच्या अग्निशमन विभागाने ही शिडी मागविली आहे. यामुळे गैरसोय दूर होण्यास मदत होईल.

# सवलत योजनेमुळे मनपा मालामाल

## एप्रिलच्या प्रारंभीच तिजोरीत १४ कोटींचा कर भरणा

**नाशिक : प्रतिनिधी**



महापालिकेने मागील आर्थिक वर्षात २५८ कोटींचा मालमत्ता कर वसूल करत रेकॉर्डब्रेक कामगिरी केली. त्यामध्ये सवलत व अभय योजना यांचे योगदान महत्त्वाचे होते. दरवर्षीप्रमाणे यंदाही मनपा प्रशासनाने नियमित करदात्यांसाठी एप्रिल ते जून अशी तीन महिन्यांसाठी सवलत योजना लागू केली आहे. त्यात एप्रिल महिन्यात मालमत्ता कर अदा केल्यामुळे देय रकमेवर आठ टक्के सूट दिली जाते. त्यानुसार एप्रिलच्या दहा ते बारा दिवसांत चौदा कोटींचा भरणा झाला आहे.

महापालिका करसंकलन विभागाला सवलत योजना पावली असून, अवघ्या अकरा दिवसांत तब्बल १२ कोटी ५७ लाख मालमत्ता कर तिजोरीत भरणा झाला आहे. गतवर्षीच्या तुलनेत यंदा ३४ लाख सरप्लस आहे. येत्या ३० एप्रिलपर्यंत एकूण देयक रकमेवर आठ टक्के व ऑनलाइन भरणा केल्यास दहा टक्के सूट मिळणार असून, करदात्यांनी त्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन नागरिकांना करण्यात आले आहे. नागरिकांनी ऑनलाइन भरणा केल्यास दहा टक्के सूट मिळते. मे महिन्यात सहा व जून महिन्यात तीन टक्के सूट मिळते. गतवेळी सवलत योजना मनपाला पावली होती. तीन महिन्यांत तब्बल १२० कोटींचा भरणा नागरिकांनी करत आर्थिक सूट पदरात पाडली. यंदाही सवलत योजनेचा प्रारंभ दणक्यात झाला असून, एप्रिलच्या दहा दिवसांत साडेबारा कोटी कर जमा झाला. नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद पाहता गतवर्षीचा रेकॉर्डब्रेक मालमत्ता कर वसूल होण्याची चिन्हे आहेत.

| विभागनिहाय करसंकलन | |
|---|---|
| पंचवटी | २ कोटी ३३ लाख |
| नवीन नाशिक | २ कोटी ५० लाख |
| नाशिकरोड | १ कोटी ७९ लाख |
| सातपूर | १ कोटी २३ लाख |
| ना.पश्चिम | २ कोटी ४७ लाख |
| ना.पूर्व | २ कोटी २२ लाख |

पहिल्या दहा दिवसांत चौदा कोटी कर जमा झाला असून, नागरिकांनी कर अदा करून योजनेचा लाभ घ्यावा. मनपा प्रशासनाने नियमित करदात्यांसाठी सवलत योजना राबवली आहे.

**–अजित निकत,** उपायुक्त, करसंकलन विभाग, मनपा

# ना.भुसे घेणार शिक्षण विभागाचा आढावा

**नाशिक : प्रतिनिधी**

राज्याचे शिक्षणमंत्री दादा भुसे जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शिक्षण विभागाचा उद्या आढावा घेणार आहेत. सकाळी दहा वाजता जिल्हा परिषद सभागृहात बैठक होणार आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जाहीर केलेल्या १०० दिवसांचा कृती आराखड्यानुसार कार्यालयीन सुधारणा, विशेष मोहीम, पीएमश्री शाळा, राजीव गांधी विद्यार्थी सानुग्रह अनुदान योजनांची शिष्यवृत्ती आधार पडताळणी, अपार आयडी, शिक्षक समायोजन, शिक्षकांची वैद्यकीय देयके प्रतिपूर्ती, शाळेच्या पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांचे स्वागत तयारी, आदर्श शाळा मोहीम, सुपर ५० उपक्रम, शिक्षक संस्था अधिकारी यांनी राबविलेले विविध उपक्रम याबाबत बैठकीत चर्चा होणार आहे. शिक्षणाधिकारी नितीन बच्छाव यांनी शनिवारी सर्व तालुका गट शिक्षणाधिकारी यांची बैठक घेत आढावा घेतला होता.

# खबरदार! इमर्जन्सी बटण दाबाल तर...

## सिटीलिंक व्यवस्थापनाचा दंडात्मक कारवाईचा इशारा

**नाशिक : प्रतिनिधी**

**गेल्या काही दिवसांमध्ये प्रवाशांकडून सिटीलिंकमधील इमर्जन्सी बटण विनाकारण दाबण्याचे प्रकार वाढले आहेत. मात्र, यापुढे असा प्रकार आढळून आल्यास संबंधितांवर दंडात्मक कारवाई करण्यात येईल, असा इशारा सिटीलिंक व्यवस्थापनाने दिला आहे.**

शहरात बससेवा पुरविण्यासाठी नाशिक महानगरपालिकेतर्फे नाशिक महानगर परिवहन महामंडळ लि. कंपनीची स्थापना केली आहे. सिटीलिंकमधून प्रवास करतेवेळी प्रवाशाला काही गंभीर अडचण भासल्यास त्यास लगेच मदत मिळावी, याकरिता बसेसमध्ये सिटी बस ॲप्लिकेशनमध्ये इमर्जन्सी बटण सुविधा उपलब्ध करून दिली आहे. काहीजण केवळ कुतूहलापोटी किंवा



अन्य कारणास्तव विनाकारण प्रवाशांकडून इमर्जन्सी बटण दाबल्यामुळे चालक, वाहक तसेच संबंधित कर्मचारी यांना नाहक त्रास सहन करावा लागतोय. यापुढे मात्र मदतीची खरोखरच आवश्यकता असलेले प्रवासी वंचित राहू नये यासाठी विनाकारण इमर्जन्सी बटण दाबणाऱ्या प्रवाशांवर दंडात्मक कारवाई करण्याचा निर्णय सिटीलिंक प्रशासनाने घेतला आहे. दंडात्मक कारवाई टाळण्यासाठी व गरजू प्रवाशांना वेळीच मदत मिळावी यासाठी बसमधील तसेच नाशिक सिटी बस ॲप्लिकेशनमधील इमर्जन्सी बटण विनाकारण दाबू नये, केवळ मदत आवश्यक असल्यावरच हे बटन दाबावे, असे आवाहन सिटीलिंक प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

अग्रलेख

# माकपचा नवा चेहरा

सन १९८९ पासून २००४ पर्यंत देशातील आघाड्यांच्या राजकारणात महत्वाची भूमिका बजावणार्‍या मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचा (माकप) जनाधार कमालीचा घटला आहे. या पक्षाने आपल्या संघटनेत काही महत्वपूर्ण बदल करुन ज्येष्ठ नेत्यांच्या जागी नवीन चेहर्‍यांना संधी दिली आहे. पक्षाने सरचिटणीसपदी केरळचे माजी मंत्री मरिअम अलेक्झांडर (एमए) बेबी यांची निवड केली आहे. गेल्या आठवड्यात तमिळनाडूतील मदुराईमध्ये झालेल्या पक्षाच्या २४ व्या काँग्रेसमध्ये (अधिवेशन) पक्षसंघटनेत व्यापक बदल करण्यात आले. यामध्ये बेबी यांची निवड करण्यात आली. मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या कार्यकारिणीला पॉलिट ब्युरो असे नाव असून, पक्षात सरचिटणीसपद सर्वोच्च आहे. याशिवाय पक्षाची एक जम्बो केंद्रीय समितीही आहे. गेल्या वर्षी सप्टेंबर महिन्यात सीताराम येचुरी यांचे सरचिटणीसपदी असताना निधन झाले. त्यानंतर पक्षाची हंगामी सूत्रे प्रकाश कारत यांच्याकडे देण्यात आली. ही सूत्रे आता रीतसरपणे बेबी यांच्याकडे आली आहेत. या पदासाठी महाराष्ट्र आणि केरळ शाखेने महाराष्ट्रातील नेते अशोक ढवळे यांच्या नावाची शिफारस केली होती. परंतु, पक्षाने सौम्य आणि मितभाषी असलेल्या बेबी यांच्या नावाला पसंती दिली. याशिवाय पॉलिट ब्युरो आणि केंद्रीय समितीत बदल करण्यात आले आहेत. ज्येष्ठ नेत्यांच्या जागी नवीन चेहर्यांना संधी देण्यात आली आहे. माजी सरचिटणीस प्रकाश कारत, वृन्दा कारत, सुराज्यकांता मिश्रा, सुभाषिनी अली, माणिक सरकार (त्रिपुराचे माजी मुख्यमंत्री), जी रामकृष्ण या ज्येष्ठ नेत्यांना वयाच्या पंच्याहत्तरीचा निकष लावून वगळण्यात आले आहे. यातून केरळचे मुख्यमंत्री पिनराई विजयन यांना सवलत देण्यात आली आहे. ते ७९ वर्षांचे असून, त्यांच्याकडे पक्षाच्या दैनंदिन कामकाजाचा आढावा घेण्याचा प्रभार आहे. त्रिपुरा विधानसभेतील विरोधी पक्षनेते जितेंद्र चौधरी, पक्षाचे तामिळनाडूतील माजी सचिव के. बालकृष्णन व कामगार नेते यू वासुकी, राजस्थानमधील सिकरचे खासदार आमरा राम, पश्चिम बंगालमधील नेते श्रीदीप भट्टाचार्य, अखिल भारतीय किसान सभेचे सरचिटणीस विजू कृष्णन, अखिल भारतीय डेमोक्रॅटिक वुमेन्स असोसिएशनच्या सरचिटणीस मरियम ढवळे आणि विद्यार्थी संघटनेचे माजी नेते आर. अरुण कुमार यांना पॉलिट ब्युरो सदस्य बनविण्यात आले आहे. याशिवाय पक्षाने ८४ सदस्यांची केंद्रीय समिती निवडताना ३० नव्या चेहर्यांना संधी दिली आहे. यासाठी निवडणूक होत असते. अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी एका नाट्यमय घटनेत नाशिकच्या डॉ. डी. एल. कराड यांनी केंद्रीय समिती सदस्यत्वासाठी अर्ज दाखल केला. कराड हे पक्षाच्या सिटू या कामगार संघटनेचे उपाध्यक्ष असून, महाराष्ट्र शाखेचे प्रदेशाध्यक्ष आहेत. गेल्या अनेक वर्षांपासून ते कामगारांच्या मागण्यांसाठी संघर्ष करत आले आहेत. त्यांनी पक्षात लोकशाही असल्याचे दाखवून देण्याचा प्रयत्न केलाही असेल. पण, शिस्तीचा म्हणून ओळख असलेल्या या पक्षात असे प्रकार होतही असतात. कराड यांना केवळ ३१ मते मिळाल्याने त्यांना केंद्रीय समितीत प्रवेश मिळाला नाही. एकेकाळी पश्चिम बंगाल, त्रिपुरा आणि केरळमध्ये चांगले बस्तान बसविणार्‍या माकपचा जनाधार कमालीचा घसरला आहे. डाव्या लोकशाही आघाडीच्या माध्यमातून केरळमध्ये पक्षाची सत्ता असून, केरळ शाखा बेबी यांच्या पाठीशी भक्कम उभी आहे. केरळ आणि पश्चिम बंगालमध्ये होणार्या विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर बेबी यांची निवड महत्वाची असली, तरी पक्षाला नवा आयाम देऊन चांगले यश मिळवून देण्याचे त्यांच्यासमोर मोठे आव्हान आहे. पक्षाचा सर्वांत मोठा बालेकिल्ला म्हणजे पश्चिम बंगाल ढासळला असून, तेथे भाजपाचा उदय झाल्याने ममता बॅनर्जी यांच्या तृणमूल काँग्रेसशी भाजपाचा खरा सामना होत असल्याचे गेल्या काही निवडणुकांत दिसून आले आहे. त्रिपुरा हे छोटेसे राज्यही भाजपाने माकपकडून हिसकावून घेतले आहे. केरळमध्ये सत्ता असूनही गेल्या लोकसभा निवडणुकीत माकपच्या नेतृत्वाखालील डाव्या लोकशाही आघाडीचा काँग्रेसच्या नेतृत्वाखालील संयुक्त लोकशाही आघाडीने धुव्वा उडविला. याचा विचार करता मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाची दयनीय अवस्था झाली आहे. गेल्या १५ वर्षांत पक्षाच्या अपयशाचा आलेख उंचावत गेला आहे. सन २००४ च्या लोकसभा निवडणुकीत पक्षाला ४३ जागा मिळाल्या होत्या. त्यावेळी काँग्रेसच्या नेतृत्वाखाली संयुक्त पुरोगामी आघाडी सरकार स्थापन करण्यात या पक्षाने महत्वाची भूमिका बजावली होती. (सन १९८९ साली जनता दलाचे विश्वनाथ प्रताप सिंह यांना पंतप्रधान करण्यात माकपच्या नेतृत्वाखालील डाव्या आघाडीने महत्वाची भूमिका बजावली होती.) नंतरच्या काळात पक्षाला म्हणावे तसे यश हाती लागले नाही. सन २००९ च्या लोकसभा निवडणुकीत १६, तर २०१४ साली ९ जागा मिळाल्या. सन २०१९ साली तीन जागा मिळाल्या. सन २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत चार जागा मिळाल्या. यामध्ये पश्चिम बंगाल आणि त्रिपुरात खातेही उघडता आले नाही. मजबूत स्थितीत असलेल्या केरळमध्ये अवघी एक जागा मिळाली. तामिळनाडूत द्रमुकच्या मदतीने दोन जागा मिळाल्या, तर राजस्थानमध्ये काँग्रेसच्या मदतीने एक जागा मिळाली. अशा परिस्थितीत बेबी यांच्यासमोर कडवी आव्हाने आहेत. पश्चिम बंगाल आणि त्रिपुरात पक्षाचे पुनरुज्जीवन करुन, उत्तरेकडील राज्यांत आणि इतरत्र पक्षाचे स्थान निर्माण करतानाच केरळमधील सत्ता राखण्याचे आव्हान बेबी यांच्यासमोर आहे. बेरोजगारी, महागाई, कामगार, शेतकरी, शेतमजूर यांसारखे विषय उपस्थित करुनही माकपला कामगार, गरीब यांचा पाठिंबा मिळू शकला नाही. पक्षाची भूमिका भाहपाविरोधी असली, तरी भाजपाशी दोन हात करण्याची पक्षाची मैदानी क्षमता नाही. इंडिया आघाडीचा घटक पक्ष असूनही माकपचे पश्चिम बंगाल, केरळ, त्रिपुरा या राज्यांत इंडिया आघाडीतील काँग्रेस, तृणमूल काँग्रेस यांच्याशी जागावाटप समझौता होऊ शकत नाही. नवे सरचिटणीस बेबी हे पॉलिट ब्युरोचे २०१२ पासून सदस्य आहेत. ते १९८६ ते १९९८ या कालावधीत राज्यसभा सदस्य होते. नंतर ते दोनवेळा आमदारही झाले. सन २००६ ते २०११ या कालावधीत ते केरळचे शिक्षणमंत्री होते. पक्षात व्यापक बदल करण्यात आले असले, तरी गेल्या १५ वर्षांत घटलेला जनाधार पुन्हा प्राप्त करण्याचे मोठे आव्हान आहे. पक्षाने जनतेचा विश्वास गमावलेला आहे, याचे आत्मपरीक्षण करण्याचे बेबी यांनी सूचित केले आहे. प्रकाश कारत आणि सीताराम येचुरी यांच्या कार्यकाळात पक्षाचा जनाधार घसरला. तो परत मिळविण्याचे मोठे आव्हान असल्याने पक्षाने संघटनेत मोठे फेरबदल केले आहेत.

# भारताने केलेले उपकार बांगलादेश विसरला



१९७१ पर्यंत बांगलादेश हा पाकिस्तानचा एक भाग होता. तेव्हा त्याला पूर्व पाकिस्तान असे म्हटले जायचे. पाकिस्तानच्या राजवटीत बांगलादेशातील नागरिकांवर अनन्वित अत्याचार होत होते. बांगलादेश हा पाकिस्तानचा घटक असूनही बांगलादेशी नागरिकांवर पाकिस्तान जुलूम करत होता. पाकिस्तानच्या जुलमी राजवटीला कंटाळून बांगलादेशचे तत्कालीन नेते शेख मुजिबिर रहेमान यांनी पाकिस्तानी सरकारविरुद्ध बंड पुकारले. त्यांच्या या बंडास बांगलादेशी नागरिकांनी प्रतिसाद दिला आणि लोक रस्त्यांवर उतरले, मात्र पाकिस्तानने दडपशाही मार्गाने हे आंदोलन चिरडून टाकण्याचा प्रयत्न केला. तेव्हा शेख मुजिबिर रेहमान यांनी भारताच्या तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्याकडे मदतीची याचना केली. इंदिरा गांधी यांनी तत्काळ बांगलादेशी नागरिकांना पाठिंबा दिला आणि भारतीय लष्कराने पाकिस्तानशी मुकाबला करून बांगलादेशला पाकिस्तानच्या गुलामीतून मुक्त केले. पाकिस्तानच्या निर्मितीत भारताचा मोठा वाटा आहे. नव्हे भारतामुळेच बांगलादेशची निर्मिती झाली आहे. पाकिस्तानच्या जुलमी राजवटीतून मुक्त झाल्यापासून बांगलादेश आणि भारताचे संबंध मैत्रीचेच राहिले आहेत. मोठ्या भावाच्या रूपात भारताने बांगलादेशला नेहमीच त्यांच्या संकटात मदत केली, मात्र आता परिस्थिती बदलली आहे. बांगलादेशमधील सध्याचे सरकार आणि बांगलादेशी नागरिक भारताच्या उपकाराला विसरली असून, भारतालाच शत्रू मानू लागली आहेत. बांगलादेशात सध्या भारताविरुद्ध मोठा जनक्षोभ पाहायला मिळत आहे. बांगलादेशच्या माजी पंतप्रधान शेख हसीना यांचे सरकार पाडून तेथील कट्टरपंथीयांनी सत्ता हस्तगत केली. कट्टरपंथीय, लष्कर आणि जनतेचा रोष पाहून शेख हसीना यांनी भारतात पलायन केले. शेख हसीना यांचे भारताशी सौहार्दाचे संबंध होते म्हणूनच भारताने त्यांना भारतात आश्रय दिला. कदाचित हेच तेथील नवनियुक्त सरकारला आणि कट्टरपंथीयांना रुचले नसावे म्हणूनच त्यांनी बांगलादेशातील हिंदू अल्पसंख्याक नागरिकांना लक्ष करण्यास सुरुवात केले. गेल्या काही महिन्यांत बांगलादेशातील हिंदू मंदिरांवर आणि हिंदू नागरिकांवर हल्ले होऊ लागले. मागील काही महिन्यांत बांगलादेशात हिंदूंवरील हल्ल्याच्या ३०० घटना घडल्या आहेत. यात काही नागरिकांना जीवदेखील गमवावा लागला आहे. हिंदूंच्या मंदिरांवर आणि घरांवर जाणीवपूर्वक हल्ले केले जात आहेत. हिंदूंनी बांगलादेश सोडून जावे, असे जाहीरपणे इशारे दिले जात आहेत. या कट्टरपंथीय हल्लेखोरांना रोखण्यात तेथील डॉ. मोहंमद युनूस यांचे सरकार अपयशी ठरत आहे. किंबहुना या हल्लेखोरांना तेच पाठीशी घालत आहेत. बांगलादेशातील अल्पसंख्याक हिंदूंचे संरक्षण करणे हे तेथील सरकारचे कर्तव्यच आहे, मात्र आपले कर्तव्य विसरून तेथील सरकार कट्टरपंथीयांना मोकळीक देत आहे. इतकेच नाही तर बांगलादेशात भारतविरोधी वातावरण निर्माण व्हावे यासाठी प्रयत्न करत आहे. डॉ. मोहंमद युनूस हे नोबेल

श्याम ठाणेदार
९९२२५४६२९५

पारितोषिक विजेते आहेत. त्यांची बांगलादेशचा हंगामी पंतप्रधानपदी निवड झाल्यावर भारताने त्याचे स्वागत केले होते. त्यांच्याकडून न्याय आणि समानतेची अपेक्षा होती, मात्र आता ती अपेक्षा फोल ठरली. त्यांच्या कारकीर्दीत भारत आणि बांगलादेश यांच्यात मैत्रीचे संबंध प्रस्थापित होतील असे वाटले होते, पण त्यांनी मात्र भारताशी पंगा घेण्याचेच ठरवले आहे. भारताने केलेले उपकार बांगलादेश आता विसरला आहे. म्हणूनच भारताच्या पंतप्रधानांना त्याची पुन्हा आठवण करून द्यावी लागली. २६ मार्च १९७१ रोजी बांगलादेशची निर्मिती झाली. या घटनेला यावर्षी ५५ वर्षे पूर्ण झाली. बांगलादेशात त्यांचा स्थापना दिवस मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. यावर्षी ही तो तसा साजरा करण्यात आला. दरवर्षी बांगलादेश स्थापना दिनी बांगलादेशचे पंतप्रधान देशवासीयांना स्थापना दिनाच्या शुभेच्छा देताना बांगलादेश निर्मितीत भारताने केलेल्या मदतीचे स्मरण करून भारताचे आभार मानतात, मात्र यावेळी प्रथमच बांगलादेशने भारताचे आभार मानले नाही. इतकेच नाही तर बांगलादेश निर्मितीत भारताने दिलेल्या योगदानाची साधी दखलही घेतली नाही. हे पहिल्यांदाच घडले आहे म्हणूनच भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी बांगलादेश सरकारचे हंगामी पंतप्रधान डॉ. मोहंमद युनूस यांना शुभेच्छापत्र पाठवून स्मरण करून दिले की, १९७१ च्या मुक्तिसंग्रामामुळे भारत आणि बांगलादेश दरम्यान नवीन संबंधांना सुरुवात झाली आहे. हा दिवस दोन्ही देशांच्या भागीदारी आणि त्याग यांची आठवण करून देतो. आम्ही दोन्ही देशांमधील हे संबंध आणखी दृढ करण्यासाठी वचनबद्ध आहोत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या पत्रातून बांगलादेशला शालजोडीतून मारतानाच भारताने बांगलादेश निर्मितीत केलेल्या मदतीची आठवण करून दिली आहे. अर्थात या पत्रातून बोध घेऊन तरी बांगलादेशने आपल्या वर्तणुकीत बदल करायला हवा. भारताशी मैत्रीचे संबंध प्रस्थापित होणे हे बांगलादेशच्याच हिताचे आहे. पाकिस्तान आणि बांगलादेशच्या नादी लागून भारताशी वैर पत्करणे म्हणजे स्वतःच स्वतःच्या पायावर कुऱ्हाड मारून घेणे हे बांगलादेशने लवकरात लवकर समजून घ्यायला हवे. कारण पाकिस्तान आणि चीन हे कधीही कोणाचे मित्र होऊ शकत नाही. जिथे फायदा तिथेच मैत्री असे या दोन्ही देशांचे धोरण आहे. आशिया खंडातील भारताचे वर्चस्व कमी करण्यासाठी हे दोन देश बांगलादेशचा वापर करून घेत आहेत. उद्या यांची गरज संपली की हे देश बांगलादेशला वाऱ्यावर सोडून देतील तेव्हा बांगलादेशची अवस्था ना घर का ना घाट का अशी होईल. त्यामुळे बांगलादेशने आताच सावध होऊन भारताशी पुन्हा मैत्रीचे संबंध प्रस्थापित करायला हवे.

# कर्जमाफी, मानधन योजना बनल्या अविश्वसनीय !

शेतकऱ्यांना कर्जमाफी, लाडक्या बहिणींना मानधन मिळणे यांसारख्या कोणत्याही मोफत अथवा मानधन स्वरूपाच्या योजना भविष्यात घातकच ठरतात असे सर्वसाधारण चित्र राज्यातील सर्वसामान्य, समजदार जनतेपुढे उभे राहिले आहेत. राजकीय नेते मग ते कोठल्याही बाजूचे असोत. निवडणूक पूर्वकाळात निव्वळ सत्ता घेण्यासाठी जनतेला आश्वासने, वचने देतात. आपल्या राज्याच्या आर्थिक परिस्थितीचा विचार न करता आश्वासने द्यायला काहीच हरकती नसतात. कारण प्रत्येक वचन किंवा आश्वासन हे जर-तर वर अवलंबून असते. लोकांवर प्रभाव पाडणाऱ्या विशेषतः आर्थिक मानधनाचे मुद्दे ज्यांचा नवा पायंडा घातला गेला आहे त्याने राज्याच्या सत्तास्थापनेचा प्रश्नसुद्धा सोडविला गेला आहे. सत्ताधारी पक्षाच्या नेत्यांनी निवडणुकीच्या काळात कर्जमाफीचा शब्द दिला होता. त्यानंतर पीककर्जाची रक्कम ३१ मार्चपूर्वी भरावी असे आवाहन केले. त्यात बदल करून राज्याच्या १३ कोटी जनतेचा विचार करावा लागतो. राज्यातील शेतकऱ्यांना यापूर्वीच विविध सवलती, मोफत वीज दिल्याचे स्मरण करून देत कर्जमाफी तूर्तास करता येणार नाही. कर्जाची परतफेड करावी असे शेतकऱ्यांच्या कानी घातले. सरकारातील प्रमुख नेत्यांनी उपमुख्यमंत्र्यांच्या विधानाची सारवासारव करताना कर्जमाफी देणे शक्यच नसल्याचे विधान उपमुख्यमंत्र्यांनी म्हटलेले नाही, तर दुसऱ्या उपमुख्यमंत्र्यांनी जाहीरनाम्यात दिलेली वचने निश्चितच पाळणार याची पुन्हा ग्वाही देत राज्याची आर्थिक परिस्थिती मजबूत करू आणि त्यानंतर लोकाभिमुख निर्णय घेऊ, असे पुनराश्वासित केले आहे. ज्या नेत्यांनी सत्तेत असताना राज्याच्या आर्थिक परिस्थितीचा नक्कीच अंदाज घेतला होता त्याच नेत्यांनी निवडणुकीच्या काळात शेतकऱ्यांच्या विवंचनांचा कधीही विचार केला नव्हता हे स्पष्ट झाले आहे. त्यामुळे त्यांच्यावर विश्वास कसा ठेवावा हे प्रश्न उपस्थित होतात.

स्नेहा राज
गोरेगाव

ज्या महाराष्ट्रात जानेवारी २०१५ ते मार्च २०१९ या काळात १२६१६ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या त्या अनेक ठिकाणी सिंचन सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या नाहीत. राज्यातील अनेक ठिकाणच्या भूगर्भातील पाण्याची पातळी



खालावल्यामुळे बोअरवेलला पाणी लागत नसल्याच्या शेतकऱ्यांच्या तक्रारींकडे दुर्लक्ष केले गेले आहे. अवकाळी पाऊस, बी बियाणांच्या आणि खतांच्या वाढत्या किमतींना कसे सामोरे जावे, या विवंचनेत व्यस्त असणाऱ्या शेतकऱ्यांना शेतमालाला पुरेसा भाव मिळत नसल्याने शेतीसाठी केलेला खर्चही मिळणाऱ्या उत्पन्नातून भरून काढता येत नाही. शेतीसाठी पाणीपुरवठ्याच्या योजना अपुऱ्या पडत आहेत. देशात बियाणे, खते, वीज आणि सिंचनासाठी जरी सबसिडी दिली जात असली तरी उत्पादित धान्याच्या किमतीतून त्यांवरचा खर्च निघत नाही. निसर्गाच्या अनिश्चिततेमुळे आणि शेतीतून मिळणाऱ्या उत्पन्नातून शेतकरी हताश आणि असहाय्य होतो तेव्हा शेतकऱ्यांसमोर आत्महत्येशिवाय पर्याय उरलेला नसतो. शेतकऱ्यांचे नेते उपोषणे, सत्याग्रह यांसारखे उपाय करून राजकीय नेत्यांचे लक्ष वेधून घेण्याचे प्रयत्न करून पाहतात. पण ते कुचकामी ठरतात. त्यांचे शेतकरी बंधू यांच्याशिवाय इतरांच्या डोळे ओलावत नाहीत किंवा त्यांना पाझर फुटत नाही. यावरून कोणी काय बोध घ्यावा हा गंभीर प्रश्न सर्वसामान्य नागरिकांसमोर उपस्थित होत आहे. प्रश्नांचे मूळ समजून घेतल्याशिवाय त्या प्रश्नांना उत्तरे सापडणार नाहीत असेच वाटते.

# कर्णाची धर्मनिष्ठा - एक प्रेरणादायी कथा

कर्ण कौरवांच्या सैन्यात होता, तरीही तो एक अत्यंत धर्मनिष्ठ आणि सत्यप्रिय योद्धा होता. त्याच्या शौर्याची कीर्ती इतकी मोठी होती, की भगवान श्रीकृष्णसुद्धा त्याची प्रशंसा करत असत.

महाभारताच्या युद्धात कर्णाने अर्जुनाला पराभूत करून ठार मारण्याची प्रतिज्ञा केली होती. ही प्रतिज्ञा पूर्ण व्हावी म्हणून खांडववनातील एक भयंकर सर्प - अश्वसेन पुढे आला. अर्जुनाशी त्याचे जुने वैर होते. खांडववनात अर्जुनाने एकदा आग लावली होती, ज्यात अश्वसेनाचे कुटुंबच भस्मसात झाले होते. तेव्हापासून तो सुडाच्या भावनेने जळत होता.

एक दिवस त्याला योग्य संधी मिळाली. तो स्वतः ला बाणाच्या रूपात रूपांतरित करून कर्णाच्या तुंब्यात शिरला. कर्णाने तो बाण सोडला, पण श्रीकृष्णांनी वेळेवर अर्जुनाचा रथ खाली टेकवला आणि तो बाण फक्त अर्जुनाच्या मुकुटाचा टोक घासत वर निघून गेला.

अपयशाने संतप्त झालेला अश्वसेन लगेच प्रकट झाला आणि कर्णाला म्हणाला, या वेळी थोडं जपून, अचूक निशाणा साधून बाण सोड.

कर्ण आश्चर्यचकित झाला. त्याने विचारले, तू कोण आहेस? अश्वसेन म्हणाला, मी खांडववनातील सर्प - अर्जुनाने माझं कुटुंब जाळून टाकलं. त्या सुडासाठी मी तुझ्या तुंब्यात शिरलो होतो.

कर्णाने त्याच्या भावनेची जाणीव ठेवूनही अत्यंत



शांतपणे उत्तर दिलं, भद्र, तुझ्या मदतीबद्दल मी आभारी आहे. पण मला माझं युद्ध स्वतःच्या सामर्थ्यावर आणि नीतीनिष्ठेवर लढू दे. अनीतीच्या सहाय्याने मिळवलेला विजय मला मान्य नाही. अशा विजयापेक्षा पराभव मला अधिक योग्य वाटतो. कर्णाची ही निःस्वार्थ आणि धर्माधिष्ठित वृत्ती पाहून अश्वसेन थक्क झाला. तो म्हणाला, कर्णा, तुझी ही धर्मनिष्ठा खरंच वंदनीय आहे. जिथे अनीती आणि सूडभावना चालत नाही, तिथेच खरा धर्म असतो.

ही कथा आपल्याला शिकवते की सत्य, नीतिमत्ता आणि स्वबळावरचा विश्वास यापेक्षा मोठं कोणतंच शस्त्र नाही. विजय हा तात्पुरता असतो, पण धर्माची किरणं कायमच प्रकाशमान असतात.

मच्छिंद्र ऐनापुरे
जत, जि. सांगली

# सत्संगतीच्या योगे मन पैक्यावर गुंतून राहत नाही




संतांमध्ये प्रचंड सामर्थ्य असते; ते बोलतील ते खरे होते. वाचासिद्धी म्हणतात ती हीच. या सिद्धीचा उपयोग आपणसुद्धा करून घेऊ शकतो; परंतु भगवत्सेवा करावी आणि त्याबद्दल पगार घ्यावा, तसे हे होते. कामधेनूवर ओझे टाकावे हे बरे वाटेना म्हणून वाटेने घोडा येत होता तो घेतला आणि कामधेनू देऊन टाकली, तशासारखे होते. जे सुख चिरकाल टिकणारे नाही ते घेऊन काय करायचे? हाडांची काडे करून स्वर्गसुख हाती आले, पण कालांतराने ते नाश पावणार; मग ते घेऊन काय करायचे?

पैक्यासारख्या निर्जीव वस्तूत आपले मन किती गुंतून राहते! पैसा हा भुतासारखा आहे; त्याच्याकडून काम करवून घेतले तर तो फार उपयोगी आहे. पण ते न केले तर तो उरावर बसतो! आपण प्रापंचिक माणसे; आपण पैसा साठविला तर गैर नाही, पण त्याचा आधार न वाटावा. पैशाचा आधार आहे असे वाटणे म्हणजे भगवंताचा आधार नाही असे वाटणे होय. आपल्याजवळचा पैसा आपण होऊन कुणाला द्यावा असे मी म्हणत नाही. पण चोराने तो चोरून नेला तर रडत बसू नये किंवा कुणी मागायला आला तर त्याला 'नाही' म्हणू नये. त्याला काहीतरी द्यावेच. पैसा प्रपंचाला पुरेसा असावा. म्हणजे किती? तर पेन्शन असेल त्यांना रोजच्या निर्वाहापुरता असला म्हणजे पुरेसा झाला आणि पेन्शन नसेल त्यांना साधारण मध्यम स्थितीत दहा-पंधरा वर्षे पुरेल इतका असला म्हणजे पुरेसा झाला. याला अमुक एक असा हिशेब सांगता येणार नाही. आपल्या प्रपंचाला जेवढा जरूर आहे तेवढा पैसा आपल्याला मिळाला, की बस्स झाले. श्रीमंतीला पुष्कळ पैसा लागतो असे थोडेच आहे? आपल्याला अडचण नाही पडली की आपली श्रीमंतीच आहे! पैशाच्या बाबतीत आपण प्रयत्न मात्र आग्रहाने करावा आणि नंतर होईल तसे होऊ द्यावे.

आपण आतून निष्काम, निर्लोभ आणि निरिच्छ असावे. दुसऱ्याचे द्रव्य मला यावे अशी बुद्धी कधीही ठेवू नये. ज्याच्याजवळ पैसा विपुल आहे त्याला श्रीमंत अगर सावकार म्हणता येईल; ज्याच्याजवळ विद्वता आहे त्याला विद्वान् म्हणता येईल; ज्याच्याजवळ शेत आहे त्याला शेतकरी म्हणता येईल; परंतु यांच्यापैकी कोणाला मोठा म्हणता येईलच असे नाही. सावकार कंजूष असेल, विद्वान् गर्विष्ठ असेल किंवा शेतकरी असाच दुर्गुणी असेल. ज्याच्याजवळ सर्व गुण एकसमयावच्छेदेकरून असतील तोच खरा मोठा होय. सर्व गुण एका भगवंताच्या ठिकाणीच असू शकतील. म्हणून त्याला ज्यांनी आपलासा केला तेच खरे मोठे बनतात. अशा लोकांना संत म्हणतात. आपण संतांचे होऊन राहावे, त्यात आपले कल्याण आहे. सत्संगतीपासून सद्विचार आणि सद्भावना प्राप्त होतात. ज्याचे विचार चांगले तो मनुष्य खरा चांगला होय आणि जिथे भगवंताचे अनुसंधान आहे तिथे राहणे हीच खरी सत्संगती होय.

## जनमनाचे प्रतिध्वनी

### मुलांना आनंद घेऊ द्या

परीक्षा संपल्या रे संपल्या, की पालक वर्ग शिबिरांचा शोध घेतात. बिचाऱ्या पाल्याची इच्छा बहुतेकवेळा विचारलीच जात नाही. अभ्यासाअंती पाल्यांचे दोन गट पडलेले दिसतात. एक म्हणजे स्वेच्छेने जाणारे व दुसरा नाइलाजाने जाणारे. कधी कधी वाटते काही पालक मुले सुटीत घरी वैताग आणतात म्हणूनच त्यांना अशा शिबिरांना पाठवितात. काही हौसी मुले नक्कीच उत्साहाने शिबिरास जातात. पण इतरांचे काय? बळजबरी पाठवणी केलेली मुले खरंच तिथे काही शिकत असतील का? अन् साधा हिशेब आहे की एका वेळेस एकाच छंद नीट जोपासता येतो. प्रत्येक बालकाची आवड वेगळी असते, त्यामुळे कोणाला हेवा म्हणून त्याला अमुक शिबिराला पाठवू नका. आजकाल धावपळीत घरातील लोक एकमेकांसोबत फार कमी वेळ असतात. तेव्हा सुटीचा उपयोग सोबत घ्या. सोबत जेवा, सोबत फिरायला जा, सिनेमा-नाटकाला जा. त्यायोग्ये एकमेकांचा सहवास लाभेल व जीवन अधिक समृद्ध होईल. काही गोष्टी पैशाने विकत घेता येत नसतात. परिवारीक स्नेहबंधन वाढविण्यासाठी सोबत वेळ घालवायला हवा. मोठ्यांनीही कधी लहान होऊन त्यांच्यात समरस व्हावे आणि आपले बालपण पुन्हा स्मरावे. मेहंदीकाम, बागकाम, किरकोळ शिवण, चित्रकला, हस्तकला, रांगोळीकाम या गोष्टींचा प्रत्यक्ष अनुभव घेऊन त्यांची सुटी सार्थकी लावता येते. शिबिरास पाठवायचेच असेल तर सर्वच बाबींची सखोल तपासणी करा.

**- प्रभाकर वारुळे, मालेगाव**

### हुंड्याचा छळ नको

मुंबईत गेल्या तीन महिन्यांत, हुंड्याच्या छळाच्या १२६ घटना गुन्हे म्हणून दाखल करण्यात आल्या आहेत. ही चिंताजनक बाब आहे. आता खेडेगावाप्रमाणे शहरी भागातही, हुंड्याचे लोण पसरलेले पाहून संताप येतो. हुंडा घेणे हा कायद्याने गुन्हा आहे. हे माहीत असूनदेखील तसे केल्यास भविष्यात होणाऱ्या परिणामांची पर्वा न बाळगता, बिनधास्त हुंडा मागितला जावा हे दुर्दैव.

मुलीकडच्या लोकांची आर्थिक परिस्थिती बेताची असतानादेखील त्यांच्याकडून सोने, चांदी, दुचाकी, चारचाकी वाहन अशी अवाच्या सवा मागणी केली जाते. इतकेच कशाला या मागण्यांची पूर्तता न झाल्याने मुलीचा छळ करून, शेवटी तिचा जीव घेतला जातो. हे माणुसकीला काळिमा फासणारे कृत्य आहे. अशा नराधमांना कठोरात कठोर शासन व्हायलाच हवे.

अजूनही शहरी भागात काही ठिकाणी मुलाकडचे लोक मुलीकडच्या लोकांना असे सांगतात की, आम्हाला तुमचे सोने नाणे, पैसा काही नको. केवळ नारळ व तुमची मुलगी द्या.

**- गुरुनाथ वसंत मराठे**

गांवकरी®
('गांवकरी प्रकाशन'चे व्यापारचिन्ह)
गांवकरी प्रकाशन
संस्थापक संपादक : स्व. द.शं. तथा दादासाहेब पोतनीस
संपादक, मुद्रक, प्रकाशक : वंदन अ. पोतनीस
मुख्य कार्यालय : 'गांवकरी भवन', टिळकपथ, नाशिक-४२२००१. फोन : २३०५०८०, २३०५०८१, २३०५०८२, २५९४५४६
विभागीय कार्यालये :
सिन्नर : हिरालाल टॉवर्स, बसस्टँडजवळ. ०२५५१-२२२५७८.
मालेगाव : पांजरापोळ शॉपिंग कॉम्प्लेक्स, शिवाजी पुतळा. २५५४-२३४२००
दिंडोरी : गाळा नं. २५, मार्केट कमिटीजवळ, निळवंडी रोड. ०२५५७-२२२५५५.
'गांवकरी प्रकाशन'साठी 'गांवकरी भवन', टिळकपथ, नाशिक येथे मुद्रित व प्रकाशित.
e-mail Id :-
1. gavmaha123@gmail.com
2. advtgvk@rediffmail.com
RNI REG. No.1934/57

## बाजार - कंपन्या - मनोरंजन

### अक्षय्य तृतीयेपूर्वीच सोन्याला झळाळी एकाच दिवसांत २०२० रुपयांची वाढ

**मुंबई :** दिवसेंदिवस सोन्याच्या दरात वाढ होत असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. वाढत्या दरामुळे ग्राहकांच्या खिशाला मोठी झळ बसत आहे. दरम्यान, अक्षय्य तृतीयेच्या सनापूर्वी सोन्याच्या दरात मोठी वाढ झाली आहे. वायदा बाजारासह देशांतर्गत बाजारातही सोन्याच्या किंमतीतही वाढ झाली आहे. एमसीएक्सवर सोने सुमारे १२०० रुपयांच्या वाढीसह व्यवहार करत आहे. दर दुसरीकडे देशांतर्गत बाजारात सोन्याच्या दरात २०२० रुपयांची वाढ झाली आहे. अक्षय्यतृतीयेपूर्वी सोन्याच्या बाजारात मोठी लगबग असते. सोन्याच्या दरात जोरदार झेप आहे. फ्युचर्स मार्केट एमसीएक्सवर, १० ग्रॅम सोन्याचा भाव १२,०० रुपयांच्या वाढीसह ९३२२४ वर व्यवहार करत आहे. ५ जून २०२५ रोजी संपणाऱ्या सोन्याच्या करारामध्ये १.२९ टक्क्यांचा बदल दिसून येत आहे. त्याच वेळी, देशांतर्गत बाजारात सोने ९५,४०० रुपये प्रति १० ग्रॅमवर व्यवहार करत आहे. देशांतर्गत बाजारात सोने खरेदी करण्यासाठी तुम्हाला किती पैसे द्यावे लागतील ते आम्ही तुम्हाला सांगतो. एकीकडे वायदे बाजारात सोन्याचे भाव वाढत आहेत. दुसरीकडे, देशांतर्गत बाजारात सोन्याने ९५,४०० रुपये प्रति १० ग्रॅमची विक्रमी पातळी गाठली आहे. सोन्याचा भाव २,०२० रुपयांनी वाढताना दिसत आहे. देशातील प्रमुख शहरांमध्ये आज सोन्याचे भाव काय आहेत याबाबतची माहिती पाहुयात.

**दिल्ली-मुंबईत सोन्याचे भाव**

आज दिल्लीत २४ कॅरेट १० ग्रॅम सोन्याची किंमत २,०२० रुपये प्रति १० ग्रॅम आहे. राजधानीत सोन्याचा भाव ९५,५५० रुपयांवर आहे. त्याचवेळी देशाची आर्थिक राजधानी मुंबईबद्दल बोलायचे झाले तर तिथेही सोन्याचे भाव वाढले आहेत. मुंबईत सोने महाग झाले आहे. २४ कॅरेटचे १० ग्रॅम सोने खरेदी करण्यासाठी तुम्हाला ९५,४०० रुपये मोजावे लागतील.

### घराच्या मेंटेनन्सवरही लागणार जीएसटी!

**मुंबई :** अपार्टमेंट, किंवा सोसायट्यांमध्ये राहणाऱ्यांसाठी सरकार एक धक्कादायक निर्णय घेणार आहे. मोठ्या फ्लॅट, अपार्टमेंट आणि सोसायट्यांमध्ये राहणाऱ्यांसाठी महत्त्वाची बातमी समोर आली आहे. तुम्ही गृहनिर्माण संस्थेच्या देखभालीसाठी म्हणजे मेंटेनन्ससाठी दरमहा ७५०० रुपयांपेक्षा जास्त पैसे देत असाल तर आता तुम्हाला त्यावर जास्त खर्च करावा लागेल. सोसायटीत राहणाऱ्या लोकांकडून सरकार देखभाल शुल्क म्हणून जास्त पैसे आकारण्याचा विचार करत आहे. यानंतर, सोसायटीमध्ये राहणाऱ्या लोकांमध्ये चर्चा सुरू आहे की हा जीएसटी त्यांच्या सोसायटी किंवा अपार्टमेंटवरही लागू होईल का कारण सरकार गृहनिर्माण संस्थांच्या देखभालीवर १८% जीएसटी लादण्याची शक्यता आहे. इंडियन एक्सप्रेसच्या वृत्तानुसार, सरकारने गृहनिर्माण नियमांमध्ये बदल केले आहेत, त्यानंतर अपार्टमेंटचा देखभाल खर्च दरमहा ७५,००० रुपयांपेक्षा जास्त असेल किंवा सोसायटीचा एकूण देखभाल खर्च २० लाख रुपयांपेक्षा जास्त असेल तर, त्यांच्यावर १८% जीएसटीचा नियम लागू होईल.

# कॅमेरून-आयमात व्यापार वृद्धीबाबत करार

**नाशिक : प्रतिनिधी**

कॅमेरूनमध्ये गुंतवणुकीच्या अनेक संधी आहेत. नाशिकच्या उद्योजकांनी त्याचा लाभ उचलून तेथे आपला उद्योग थाटावा व आर्थिक उन्नती साधावी, असे आवाहन कॅमेरून इन्व्हेस्टमेंट अँड प्रमोशनचे डायरेक्टर जनरल बोमा डोनटूस यांनी आयमाबरोबर झालेल्या परस्पर सामंजस्य करारावर स्वाक्षरी झाल्यानंतर केले. आयमातर्फे अध्यक्ष ललित बूब यांनी या करारावर स्वाक्षरी केली.




आयमाच्या पुढाकाराने देश-विदेशातील गुंतवणूकदारांना नाशकात गुंतवणूक करण्यास आकर्षित करण्यात येत असून त्याच्यात एक भाग म्हणून कॅमेरून गुंतवणूक व प्रोत्साहन एजन्सी सिपाच्या १७ जणांच्या प्रतिनिधी मंडळाने काल नाशिकचा दौरा केला होता. आयमातर्फे या शिष्टमंडळाचे स्वागत करण्यात आले. उभय देशातील गुंतवणूक आणि प्रोत्सानाबाबत या बैठकीत सविस्तर आणि मुद्देसुद चर्चा झाली. व्यासपीठावर भारतातील कॅमेरून उच्चायुक्तालयातील हर एक्सलन्सी श्रीमती साईलव्ही मिशेल, बोर्ड अध्यक्ष डॉ.डायन, गुंतवणूक प्रोत्साहन संचालक इमॅन्युअल, आयमाचे अध्यक्ष ललित बूब, निमाचे अध्यक्ष आशिष नहार, लघुउद्योग भारतीचे अध्यक्ष निखिल तापडिया, आयमाच्या निर्यात विषयक समितीचे को-चेअरमन जगदीश पाटील, सीआयआयचे उत्तर महाराष्ट्र अध्यक्ष रमेश शाळीग्राम, निमाचे उपाध्यक्ष किशोर राठी,मनीष रावल,सचिव राजेंद्र अहिरे, राजेंद्र वडनेरे,वेदांत राठी,आयमाचे सहसचिव हर्षद बेळे,राहुल गांगुर्डे, रवींद्र झोपे आदी होते.

कॅमेरूनमध्ये पायाभूत सुविधा,विमानतळ,बंदरे, कृषी प्रक्रिया उद्योग,सौरऊर्जा,शैक्षणिक आणि वैद्यकीय आदी अधिक क्षेत्रात गुंतवणुकीसाठी प्रचंड वाव आहे. तेथे गुंतवणूक करणाऱ्यांना १० वर्षांसाठी कर सवलत दिली जाते. अनेक सुविधाही तेथे उपलब्ध करून दिल्या जातात.कॅमेरून हे अत्यंत सुरक्षित राष्ट्र असून तेथे गुंतवणूक करणाऱ्यांना कोणताही धोका नाही. नाशिक आणि तेथील हवामानात प्रचंड साम्य असल्याचे बोमा यांनी निदर्शनास आणले.

प्रारंभी आयमाचे अध्यक्ष ललित बूब यांनी नाशकात गुंतवणुकीसाठी असलेल्या पोषक वातावरणाची माहिती दिली. कॅमेरूनने नाशकात गुंतवणूक केल्यास त्यांना शासन स्तरावरून विविध सवलती मिळवून देण्यासाठी आयमा निश्चितच आपले सर्व वजन वापरेल,असे बूब यांनी आपल्या प्रास्ताविकात नमूद केले. कॅमेरून आणि नाशिक दरम्यान व्यापाराचा नवीन अध्याय सुरू होत आहे ही बाब निश्चितच भूषणावह असल्याचे निमाचे अध्यक्ष आशिष नहार यांनी आपल्या भाषणात सांगितले.आईस्क्रीम आणि डेअरी उद्योगासाठी कॅमेरूनमध्ये सोयी सुविधा मिळाल्यास तेथे आम्हाला गुंतवणूक करण्यास निश्चितच आवडेल असेही ते पुढे म्हणाले. लघुउद्योग भारतीचे निखिल तापडिया, सीआयआय उत्तर महाराष्ट्राचे रमेश शाळीग्राम यांनीही यावेळी मनोगत व्यक्त केले. कॅमेरून आणि नाशिक यांच्यात व्यापार वृद्धी होत आहे हे निश्चितच भूषणावह असल्याचे वेदांत राठी यांनी सांगितले. जगदीश पाटील यांनी सूत्रसंचालन केले.

# डोनाल्ड ट्रम्प पुन्हा बदलले!

## इलेक्ट्रॉनिक वस्तूंवर टॅरिफ लावणारच

**नवी दिल्ली :**

आयात केलेल्या सेमीकंडक्टर चिप्सवर पुढील आठवड्यात शुल्क आकारले जाईल. असे अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी म्हटले आहे.

चीनमधून आयात होणाऱ्या टॅरिफमधून स्मार्टफोन आणि संगणकांना वगळणे अल्पकालीन असेल, असे देखील त्यांनी स्पष्ट केलंय. ट्रम्प म्हणाले की, त्या इलेक्ट्रॉनिक वस्तू वेगवेगळ्या टॅरिफ बकेटमध्ये जात आहेत.

आगामी राष्ट्रीय सुरक्षा शुल्क तपासणीमध्ये आम्ही सेमीकंडक्टर्स आणि संपूर्ण इलेक्ट्रॉनिक्स पुरवठा साखळीवर एक नजर टाकत आहोत, असं देखील अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी स्पष्ट केलंय. व्हाईट हाऊसने राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांच्या परस्पर करातून काही इलेक्ट्रॉनिक वस्तू वगळण्याची घोषणा केली होती. तेव्हापासून मोठ्या प्रमाणात चीनमधून आयात केल्या जाणाऱ्या वस्तूंवर शेअर बाजाराने हिरवा कल दाखवला. जपान, ऑस्ट्रेलिया, दक्षिण कोरिया या देशांच्या टेक स्टॉक्समध्ये वाढ झाल्याचे वृत्त आहे.

व्हाईट हाऊसने टॅरिफ सवलतीची घोषणा केल्यानंतर चीन आणि हाँगकाँगच्या शेअर बाजारासह तैवान टेक सप्लाय चेन स्टॉक्समध्ये तेजी आली, परंतु कदाचित ही तेजी अल्पकालीन असू शकते. अमेरिकेचे वाणिज्य सचिव हॉवर्ड लुटनिक यांनी रविवारी सांगितले की, चीनमधील महत्त्वाच्या तंत्रज्ञान उत्पादनांवर सेमीकंडक्टरसह स्वतंत्र नवीन शुल्क आकारले जाईल. ट्रम्पच्या १४५% च्या परस्पर शुल्काच्या प्रत्युत्तरात अमेरिकन आयातीवरील शुल्क १२५% पर्यंत वाढवल्यानंतर बीजिंगने अमेरिकेवर जोरदार हल्ला केला. चीनच्या वाणिज्य मंत्रालयाने एका निवेदनात म्हटले होते की, वाघाच्या गळ्यातील घंटा फक्त तोच व्यक्ती सोडवू शकते, ज्याने ती बांधली आहे. ट्रम्प प्रशासनाने काही इलेक्ट्रॉनिक वस्तूंवर लादलेल्या शुल्कातून तात्पुरती सूट दिली होती. यामुळे ॲपलसारख्या मोठ्या टेक कंपन्यांना दिलासा मिळाला, कारण या कंपन्या परदेशातून आयात केलेल्या सुटे भाग आणि तयार उत्पादनांवर मोठ्या प्रमाणात अवलंबून आहेत. यूएस कस्टम्स आणि बॉर्डर प्रोटेक्शनने काही वस्तूंना टॅरिफमधून सूट देण्याबाबत नोटीस जारी केली होती. याशिवाय, सेमीकंडक्टर बनवण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या मशीननाही सूट देण्यात आली. लुटनिक यांनी स्पष्ट केले की, ही सूट केवळ तात्पुरती आहे.

# जगभरात भारताची छाप!

## २ लाख कोटींची स्मार्टफोन निर्यात

**नवी दिल्ली :**

भारताच्या इलेक्ट्रॉनिक्स क्षेत्राने इतिहास रचला आहे. चालू आर्थिक वर्ष २०२४-२५ मध्ये भारताने आतापर्यंतची सर्वाधिक २ लाख कोटी रुपयांची स्मार्टफोन निर्यात केली आहे. सेल्युलर अँड इलेक्ट्रॉनिक्स असोसिएशन ने दिलेल्या माहितीनुसार, ही निर्यात ५५ टक्क्यांनी वाढली असून, यामुळे भारत जगभरात एक प्रमुख इलेक्ट्रॉनिक्स उत्पादन केंद्र म्हणून उदयास येत आहे.

गेल्या काही वर्षांत भारताच्या इलेक्ट्रॉनिक्स उत्पादनात मोठी वाढ झाली आहे. आर्थिक वर्ष २०२३-२४ मध्ये देशातील एकूण मोबाइल फोन उत्पादनाचे मूल्य ४.२२ लाख कोटी इतके होते, तर २०२४-२५ मध्ये हे मूल्य वाढून ५.२५ लाख कोटी इतके झाले आहे.ICE- चे अध्यक्ष पंकज मोहिंद्रू यांनी सांगितले की, ही आकडेवारी भारताच्या इलेक्ट्रॉनिक्स क्षेत्रातील वाढत्या क्षमतेचा स्पष्ट पुरावा आहे. केंद्र सरकारच्या उत्पादनाशी जोडलेल्या प्रोत्साहन योजनेमुळे हा बदल शक्य झाला आहे.

**व्यापारातील बदल भारतासाठी फायदेशीर**

अलीकडच्या काळात जागतिक व्यापारात मोठे बदल झाले आहेत. अमेरिकेचे माजी अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी घेतलेल्या परस्पर शुल्क धोरणांमुळे भारतासारख्या देशांना अमेरिकन बाजारपेठेत प्रवेश मिळण्याची संधी निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर खउए- अध्यक्ष मोहिंद्रू म्हणाले, आमचे उद्दिष्ट म्हणजे भारताला सर्व प्रमुख जागतिक बाजारपेठांसाठी एक विश्वासार्ह आणि प्रमुख उत्पादन भागीदार म्हणून उभे करणे. जगाने भारताकडे इलेक्ट्रॉनिक्स उत्पादनासाठी एक नैसर्गिक आणि धोरणात्मक पर्याय म्हणून पाहिले पाहिजे.

**भारताचा इलेक्ट्रॉनिक्समधील उदय, भविष्याची दिशा**

भारत आता स्मार्टफोन निर्यातीत चीन आणि व्हिएतनामसारख्या देशांना टक्कर देत आहे. देशांतर्गत पातळीवर मजबूत उत्पादन संरचना, कुशल मनुष्यबळ, आणि धोरणात्मक सरकारी हस्तक्षेपामुळे भारताला हे यश मिळाले आहे. जसजसा भारत अधिकाधिक जागतिक उत्पादन साखळीत समाविष्ट होत आहे, तसतशी देशाची स्पर्धात्मकताही वाढत आहे. हे चित्र केवळ स्मार्टफोन क्षेत्रापुरते मर्यादित नसून, संपूर्ण इलेक्ट्रॉनिक्स आणि सेमीकंडक्टर उद्योगासाठीही महत्त्वपूर्ण आहे.

२ लाख कोटी रुपयांची निर्यात हे केवळ एक आर्थिक यश नसून, भारताच्या उत्पादन क्षेत्राच्या सामर्थ्याचे प्रतीक आहे.

# उत्तर प्रदेशात फॉक्सकॉनची ३०० एकर जमीन खरेदी

**लखनौ :**

ॲपलसाठी आयफोन, आयपॅड आणि मॅकबुक सारखी उत्पादने असेंबल करणारी कंपनी फॉक्सकॉन उत्तर प्रदेशातील ग्रेटर नोएडा येथे ३०० एकर जमीन खरेदी करणार आहे.

यमुना एक्सप्रेसवेजवळील या जमिनीवर कंपनी एक उत्पादन प्रकल्प उभारणार आहे. हा फॉक्सकॉनचा उत्तर भारतातील पहिला प्लांट असेल आणि बेंगळुरूमध्ये बांधलेल्या उत्पादन सुविधेपेक्षा मोठा असेल. असा अंदाज आहे की हा जगातील दुसरा सर्वात मोठा प्लांट बनू शकेल.

हा अहवाल अशा वेळी आला आहे जेव्हा तैवानची कंपनी आणि ॲपल चीनवर लादलेल्या शुल्कापासून वाचण्यासाठी भारतात पुरवठा साखळी बांधण्याचा विचार करत आहेत.

अहवालानुसार, कंपनी याबाबत सरकारशी चर्चा करत आहे. या उत्पादन सुविधेत काय उत्पादित केले जाईल हे सध्या निश्चित झालेले नाही. ही जमीन एचसीएल-फॉक्सकॉनच्या ५० एकरच्या सेमीकंडक्टर उत्पादन प्रकल्पाला लागून आहे, जी एचसीएल-फॉक्सकॉनच्या ५० एकरच्या सेमीकंडक्टर असेंब्ली सुविधेच्या प्रकल्पाला लागून आहे. अमेरिकन कंपनी ॲपल आणि तैवानी कंपनी फॉक्सकॉन यांच्यात दीर्घकाळापासून भागीदारी आहे. २०००च्या दशकाच्या सुरुवातीपासून, तैवानी इलेक्ट्रॉनिक्स उत्पादक कंपनी फॉक्सकॉन ही ॲपलची प्राथमिक पुरवठादार आहे, जी आयफोन, आयपॅड आणि मॅकबुकसारखी उत्पादने असेंबल करते. या भागीदारीद्वारे, ॲपल सॉफ्टवेअर आणि डिझाइनवर लक्ष केंद्रित करण्यास सक्षम आहे. तर फॉक्सकॉन उच्च आकारमान आणि अचूक उत्पादन हाताळते.

आयफोनचा मोठा भाग फॉक्सकॉनच्या झेंगझोऊ प्लांटमध्ये तयार केला जातो, ज्याला आयफोन सिटी म्हणूनही ओळखले जाते. जास्तीत जास्त क्षमतेवर काम करताना कंपनी दररोज ५,००,००० आयफोन असेंबल करू शकते.

**ॲपल भारत सरकारच्या पीएलआय योजनेचा भाग**

ॲपलचे तिन्ही कंत्राटी उत्पादक भारत सरकारच्या ४१,००० कोटी रुपयांच्या उत्पादन-संबंधित प्रोत्साहन योजनेचा (पीएलआय) भाग आहेत. या योजनेनंतरच भारतात आयफोन उत्पादनाला वेग आला आहे. भारत सरकारने २०२० मध्ये पीएलआय योजना सुरू केली. ही योजना परदेशी कंपन्यांना स्थानिक उत्पादनाचा फायदा घेण्याची आणि त्यावर प्रोत्साहन मिळविण्याची संधी देते.

# मुंबईकरांचा प्रवास होणार गारेगार!

## मध्य रेल्वेच्या ८० वातानुकूलित लोकल फेऱ्या

**मुंबई :**

लाखो मुंबईकर दररोज लोकल ट्रेनने प्रवास करतात. उन्हाच्या झळा वाढत चालल्यात. रोज अनेक मुंबईकरांना दोन-दोन तास प्रवास करावा लागतो. परंतु, वाढत्या उष्णतेमुळे त्रस्त झालेल्या मुंबईकरांचा लोकल प्रवास आता अधिक गारेगार होणार आहे. मध्य रेल्वेने याबाबत महत्त्वाचा निर्णय घेतला आहे.



वाढत्या उकाड्याच्या पार्श्वभूमीवर मध्य रेल्वेवर बुधवारपासून ८० वातानुकूलित लोकल फेऱ्या चालवण्यात येणार आहे. त्याचा फायदा हजारो मुंबईकरांना होणार आहे. मध्य रेल्वेच्या मुख्य मार्गावर वाढीव १४ वातानुकूलित लोकल सुरू करण्यात येणार आहे. यामुळे १६ एप्रिलनंतर वातानुकूलित लोकल फेऱ्यांची संख्या ६६ वरून ८० होणार आहे. वाढत्या उष्ण वातावरणात प्रवाशांना अधिक आरामदायी प्रवासाचा अनुभव देण्यासाठी मध्य रेल्वेने ही सुविधा सुरू केली आहे. मध्य रेल्वेने एसी लोकल फेऱ्या वाढवल्या असल्या तरी पश्चिम रेल्वेने अद्याप याबाबत कोणताही निर्णय घेतला नाही. सध्या मध्य रेल्वेच्या मुख्य मार्ग, हार्बर मार्ग, ट्रान्स-हार्बर मार्ग आणि बेलापूर-उरण कॉरिडॉर, नेरूळ-उरण पोर्ट मार्गिकेवरून सुमारे दररोज १,८१० लोकल फेऱ्या धावतात. त्यात कोणतीही वाढ केली नाही. परंतु १४ सामान्य लोकलच्या वेळेत वातानुकूलित लोकल चालवण्यात येणार आहे. या वातानुकूलित लोकल फेऱ्या सोमवार ते शनिवारपर्यंत धावतील. रविवार आणि सुट्टीच्या दिवशी वातानुकूलितऐवजी सामान्य लोकल धावणार आहेत.

**या लोकल आता एसी**

सकाळी ७.३४ कल्याण-सीएसएमटी, सकाळी १०.४२ बदलापूर-सीएसएमटी, दुपारी १.२८ ठाणे-सीएसएमटी, दुपारी ३.३६ ठाणे-सीएसएमटी, सायंकाळी ५.४१ ठाणे-सीएसएमटी, रात्री ९.४९ ठाणे-सीएसएमटी, रात्री ११.०४ बदलापूर-ठाणे अशा अप मार्गावरील लोकल फेऱ्या आता एसी लोकल म्हणून धावणार आहेत. तसेच डाउन मार्गावरील पहाटे ६.२६ विद्याविहार ते कल्याण, सकाळी ९.०९ सीएसएमटी ते बदलापूर, दुपारी १२.२४ सीएसएमटी ते ठाणे, दुपारी २.२९ सीएसएमटी-ठाणे, दुपारी ४.३८ सीएसएमटी ते ठाणे, सायंकाळी ६.४५ सीएसएमटी ते ठाणे आणि रात्री ९.०८ सीएसएमटी ते बदलापूर या लोकलचे एसी लोकलमध्ये रुपांतर केले आहे.

# मुंबईत बेस्टच्या १०० बस जाणार भंगारात

**मुंबई :** मुंबईकरांची सेकंड लाइफलाइन असलेल्या बेस्टने खर्चात कपात करण्यासाठी स्वमालकीच्या बस खरेदी न करता भाडेतत्त्वावरील बस घेण्याचा निर्णय घेतला. परंतु नवीन बस बेस्टच्या ताफ्यात येण्याचे प्रमाण कमी आहे. बेस्टच्या ताफ्यातील स्वमालकीच्या १०० बस आयुर्मान संपल्याने एप्रिल महिन्यात भंगारात निघणार आहेत. तर दुसरीकडे, चालकांचे प्रशिक्षण पूर्ण न झाल्याने ताफ्यात येऊनही नवीन बस आगारातच उभ्या आहेत. त्यामुळे मे महिन्यात मुंबईकरांचा त्रास आणखी वाढणार आहे. बेस्टच्या ताफ्यात स्वमालकीच्या तसेच भाडेतत्त्वावरील बस आहेत. पाच कंत्राटदारांकडून मुंबईतील विविध मार्गावर भाडेतत्त्वावरील बस चालविण्यात येतात.

सध्या बेस्टच्या ताफ्यात स्वमालकीच्या ७४३, तर भाडेतत्त्वावरील दोन हजार ७४ बस आहेत. बेस्टच्या ताप्यातील स्वमालकीच्या बसची संख्या ११ डिसेंबर २०२४रोजीच्या ९९३ वरून, १ एप्रिल २०२५ रोजी ७५९वर आली आहे. त्यातच, एप्रिलमध्ये बेस्टच्या मालकीच्या १०० बसचे आयुर्मान संपत आल्याने त्या टप्प्याटप्प्याने भंगारात काढल्या जाणार आहेत. त्यामुळे बसची संख्या आणखी कमी होईल. त्याच वेळी, दुसरीकडे बेस्टच्या ताफ्यात दाखल झालेल्या नवीन बस अद्याप पोत विना वापर उभ्या आहेत.

बेस्ट उपक्रमाने गेल्या वर्षी २३ मे रोजी निविदा प्रक्रिया राबवून, दोन हजार १०० इलेक्ट्रक सिंगलडेकर एसी बस पुरवण्याचे कंत्राट ओलेक्ट्रा ग्रीनटेक लिमिटेड कंपनीला दिले होते. यातील ३२५ हून अधिक बस ताफ्यात आल्या आहेत. त्याशिवाय, आणखी ८४ बस दाखल झाल्या आहेत. मात्र कुर्ला येथील बेस्ट बस अपघातानंतर चालकांच्या प्रशिक्षणाचा कालावधी एक महिना करण्यात आल्याने, भरती प्रक्रिया व प्रशिक्षण कालावधीमुळे ८४ बस विविध मार्गावर चालविण्यात आलेल्या नाहीत. त्यामुळे या बस आगारातच उभ्या आहेत.

# ‘तोडी मिल फँटसी’ सारखं ब्रॉडवे नाटक करण्याची अंकुश चौधरीची इच्छा

## तोडी मिल फँटसीसाठी अंकुश चौधरी आणि जिगीषा अष्टविनायक संस्थेचा सहकार्याचा हात

**नाशिक : प्रतिनिधी**

वेगवेगळ्या माध्यमांमध्ये सक्रिय असूनही अनेक तरुण कलावंतांनी वाट धरली आहे ती रंगभूमीची. प्रयोगशीलतेबरोबरच काळ अवकाशाच्या अनेक शक्यता आपल्या नाट्यकृतीतून आजमावू पाहणारी सृजनशील युवा पिढी त्यांना पडणारे प्रश्न नाटकाच्या माध्यमातून प्रेक्षकांसमोर मांडतायेत. रंगभूमीवर सध्या येत असलेले विषय तरुण पिढीला भावताहेत. ज्यावर संवाद घडण्याची गरज असते असे विषय हाताळले जात आहेत. अशाच काही सृजनशील युवा कलाकारांनी आणलेल्या ‘तोडी मिल फँटसी’ या रॉक म्युझिकल नाटकासासाठी अभिनेता अंकुश चौधरी आणि जिगीषा अष्टविनायक संस्थेने सहकार्याचा हात पुढे केला आहे. याबाबत माहिती देण्यासाठी नुकतीच एक पत्रकार परिषद आयोजित करण्यात आली, त्यावेळी अभिनेता अंकुश चौधरी, दिग्दर्शक चंद्रकांत कुलकर्णी, लेखक प्रशांत दळवी आणि नाटकातील कलाकार मंडळी उपस्थित होती.

गिरण्यांच शहर म्हणून मुंबईची ओळख होती. गिरणगावातल्या भूमिपुत्रांची गोष्ट सांगणार सुजय जाधव लिखित आणि विनायक कोळवणकर दिग्दर्शित ‘तोडी मिल फॅन्टसी’ या नाटकाचे प्रयोग शुक्रवार १८ एप्रिल रात्रौ ८.३० वा. डॉ. काशिनाथ घाणेकर नाट्यगृह ठाणे, १९ एप्रिल रात्रौ ८.३० वा. कालिदास नाट्यगृह मुलुंड, २० एप्रिल रात्रौ ८.३० वा. यशवंत नाट्यमंदिर माटुंगा या ठिकणी रंगणार आहेत. ‘तोडी मिल फँटसी’ ही कथा आहे तीन मित्रांची - घंट्या, अम्या, शिऱ्या आणि त्यांच्या स्वप्नांची, ज्यांनी मुंबई ह्या स्वप्नांच्या नगरीमधे आपले जीवन व्यतीत केले आहे. ही कथा सुरू होते एका आलिशान रेस्टो-बारच्या वॉशरूममध्ये जेव्हा त्या रात्री, जेव्हा घंट्या, अम्या आणि शिऱ्या त्यांच्या स्लम टुरिझम व्यवसायाबद्दल एक महत्त्वाचा निर्णय घेणार असतात, तेव्हा ईशा सिंह नामक एक अत्यंत श्रीमंत मॉडेल, घंट्याच्या जीवनात अपघाताने प्रवेश करते आणि त्या सर्वांच्या जीवनात बदल घडतात. हे नाटक तुम्हाला एक संगीतमय प्रवास घडवते, तुम्हाला नाचवते, हसवते, रडवते आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे मुंबई शहरातील तुमच्या अस्तित्वाचा पुनर्विचार करायला लावते! या नाटकात शुभंकर एकबोटे, प्रमिती नरके, जयदीप मराठे, श्रीनाथ म्हात्रे, सुरज कोकरे हे कलाकार महत्त्वाच्या भूमिकेत आहेत. मुंबईच्या या भूमिपुत्रांच्या फँटसीची गोष्ट नाट्य स्वरूपात उभी करण्याची संपूर्ण प्रकिया पुण्यात झाली आहे. या नाटकात रॅप, रॉक, मेटल, रेगे, कवाली अशा संगीताच्या वेगवेगळ्या प्रकारांचा वापर केला आहे. या नाटकाला देसी रिफ, अगस्ती परब आणि कपिल रेडेकरचं संगीत लाभलं आहे. नेपथ्य केतन दुधवडकर तर नेपथ्य निर्मिती प्रकाश परब यांची आहे. प्रकाशयोजना राहुल जोगळेकर, सचिन दूनाखे यांनी केली आहे. वेशभूषा शुभांगी सूर्यवंशी, परीजा शिंदे तर रंगभूषा प्रदीप दरणे यांची आहे. नृत्य दिग्दर्शन अक्षय कुमार मांडे यांचे आहे.



## महत्त्वाचे

### नाशिक युवासेना

**नाशिक : प्रतिनिधी**



युवासेनेतर्फे महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन करण्यात आले. यावेळी युवासेना जिल्हाप्रमुख रूपेश शिवाजी पालकर, युवासेना समन्वयक दर्शन ठाकूर, युवासेना उपशहरप्रमुख मनीष गांगुर्डे, सरचिटणीस बबलू मुथडक, एसटी कामगार सेना राजाभाऊ पालखेडकर, बजरंग दल, श्रीकांत क्षत्रिय, विजय मेढे, गुड्डू निकम, ओंकार कर्पे, किशोर वडजे,युवासेना पूर्व विधानसभा प्रमुख आकाश कोकाटे आदी उपस्थित होते.

### राहुलजी प्राथमिक विद्यामंदिर



**नाशिक : प्रतिनिधी**

राहुलजी प्राथमिक विद्यामंदिरात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी अध्यक्ष दादासाहेब गायकवाड यांचे नातू राजेंद्र गायकवाड, संस्थेचे अध्यक्ष राहुल निरभवणे, सरचिटणीस तेजस निरभवणे, खजिनदार उज्ज्वला निरभवणे, संचालिका नेहा निरभवणे, मुख्याध्यापिका पाटील उपस्थित होते. याप्रसंगी विद्यार्थ्यांनी मनोगत आणि नृत्य सादर केले. तुषार गिरी गोसावी यांनी सूत्रसंचालन केले. कार्यक्रमासाठी मुख्याध्यापिका पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व शिक्षकांनी प्रयत्न केले.

### नाशिक जिल्हा परिषद

**नाशिक : प्रतिनिधी**



भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती जिल्हा परिषदेत उत्साहात साजरी करण्यात आली. यानिमित्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्याचबरोबर संविधानाच्या प्रास्ताविकेचे सामूहिक वाचन करण्यात आले. या कार्यक्रमास सामान्य प्रशासन विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी रवींद्र परदेशी, जिल्हा समाजकल्याण अधिकारी हर्षदा बडगुजर, प्रभारी जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. राजेंद्र बागुल, अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. हर्षल नेहते, स्वीय सहायक गौतम अग्निहोत्री, रत्नाकर अहिरे, कनिष्ठ प्रशासनाधिकारी राजेंद्र येवला, लेखाधिकारी विजयकुमार हळदे, भगवान बच्छाव, एकनाथ मोरे यांच्यासह अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

### रुंगटा विद्यालय

**नाशिक : प्रतिनिधी**



नाशिक शिक्षण प्रसारक मंडळ,नाशिक संचलित पुष्पावती रुंगटा कन्या विद्यालय आणि जु. स. रुंगटा हायस्कूल यांच्या संयुक्त विद्यमाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती जल्लोषात साजरी करण्यात आली. याप्रसंगी संस्थेचे सेक्रेटरी अश्विनीकुमार येवला, पुष्पावती रुंगटा कन्या विद्यालयाच्या मुख्याध्यापिका श्रीमती ज्योत्स्ना आव्हाड, प्रभारी मुख्याध्यापक संजय पाटील उपस्थित होते. सुरेश मोरे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या शैक्षणिक व सामाजिक कार्याविषयी सविस्तर माहिती आपल्या मनोगतातून व्यक्त केली. श्रीमती स्मिता साळवे यांनी सूत्रसंचालन केले. जयंती निमित्ताने सर्व पदाधिकारी व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी बाइक रॅली काढली.

### पुरुषोत्तम इंग्लिश स्कूल

**नाशिकरोड :** नाशिक शिक्षण प्रसारक मंडळाच्या नाशिकरोड



येथील पुरुषोत्तम इंग्लिश स्कूल व आरंभ महाविद्यालय यांच्यातर्फे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३४ वी जयंती साजरी करण्यात आली. अध्यक्षस्थानी प्राचार्य उमाकांत वाकलकर होते. यावेळी व्यासपीठावर उपप्राचार्या संगीता पवार, उपमुख्यध्यापक प्रकाश भामरे, शिक्षक प्रतिनिधी भरत भालेराव, राजेंद्र शेळके, वक्ते नीलेश खैरनार उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य उमाकांत वाकलकर यांनी केले. यावेळी वक्ते नीलेश खैरनार यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याची माहिती दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अपर्णा बोराळे यांनी केले. पाहुण्यांचा परिचय ऋषिकेश यांनी करून दिला. आभार राजेंद्र शेळके यांनी मानले.

### आरोग्य विद्यापीठ




**नाशिक :** महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठात डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. याप्रसंगी प्रति-कुलगुरू डॉ. मिलिंद निकुंभ यांच्या हस्ते प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी कुलसचिव डॉ. राजेंद्र बंगाळ, परीक्षा नियंत्रक डॉ. संदीप कडू, उपकुलसचिव डॉ. सुनील फुगारे यांनी प्रतिमेस अभिवादन केले. यावेळी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याची माहिती देण्यात आली. याप्रसंगी सचिन धेंडे, बाळासाहेब पेंढारकर, अविनाश सोनवणे, सतीश केदारे, अजित डेरे, ज्ञानेश्वर बांगर, शैलेंद्र जमदाडे, राजू दिवे, संतोष शार्दुल, बंडु गरुड, विष्णू वाघेरे, नाना परभणे, किशोर जोपळे, संतोष गरुड, कृष्णा भवर, आबाजी शिंदे, पुष्कर तऱ्हाळ आदी उपस्थित होते.



# देव म्हणावं की भीमराव!

## महामानवाला जयंतीनिमित्त जिल्हाभर अभिवादन

**नाशिक : प्रतिनिधी**

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३४ वी जयंती अपूर्व उत्साहात शहरासह जिल्हाभरात साजरी करण्यात आली.

सर्वत्र निळे झेंडे, ठिकठिकाणी चौकाचौकात उभारण्यात आलेले देखावे आणि प्रतिमा व पुतळा पूजनाबरोबरच दिवसभर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनावरील विविध ध्वनिफिती वाजविण्यात येत होत्या.

सायंकाळी जल्लोषात मिरवणूकही काढण्यात आली. भीमसैनिकांमध्ये काल दिवसभर अपूर्व उत्साह पाहावयास मिळाला.

## डॉ.आंबेडकर यांचे कार्य दिशादर्शक : गायधनी

### पळसे विद्यालयात आंबेडकर जयंती साजरी

**नाशिकरोड : प्रतिनिधी**

गौतम बुद्ध, शिवराय, संत तुकाराम, महात्मा फुले, राजर्षी शाहू आणि डॉ. आंबेडकर यांनी स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि सामाजिक न्याय यांची शिकवण आपल्याला दिली. एकतेची शिकवण समाजात रुजवणाऱ्या डॉ. आंबेडकर यांचे कार्य दिशादर्शक आहे, असे प्रतिपादन संतोष गायधनी यांनी केले.

पळसे येथील नासाका माध्यमिक विद्यालय आणि आदर्श प्राथमिक विद्यामंदिर यांच्या संयुक्त विद्यमाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त आयोजित व्याख्यानात प्रमुख वक्ते म्हणून ते बोलत होते. मंचावर वडगाव पिंगळाचे



पोलीसपाटील सागर मुठाळ, सागर गायधनी, मुख्याध्यापक अरुण पगार, चंद्रकांत खानकरी, सांस्कृतिक विभागप्रमुख कैलास लहांगे यांच्यासह शिक्षक आणि कर्मचारी उपस्थित होते. उपस्थितांच्या हस्ते डॉ. आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. पोलीस पाटील संघटनेच्या सिन्नर तालुकाध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल विद्यालयाचे माजी विद्यार्थी सागर मुठाळ यांचा सन्मानचिन्ह आणि ग्रंथभेट देऊन सत्कार करण्यात आला. ईशान सानप, ईश्वरी गिते, सृष्टी सरोदे या विद्यार्थ्यांनी डॉ. आंबेडकर यांच्या जीवनप्रवासावर विचार मांडले. दीपाली राठोडसह धन्वंतरी गायधनी आणि सहकारी विद्यार्थिनींनी गाणी सादर केली. मुख्याध्यापक अरुण पगार यांनीही मार्गदर्शन केले. शिक्षक रवींद्र मालुंजकर यांनी सूत्रसंचालन केले.

## भाजपा महानगर




**नाशिक : प्रतिनिधी**

भाजपा कार्यालय वसंतस्मृती येथे महानगर अध्यक्ष प्रशांत जाधव यांच्या अध्यक्षतेखाली आणि प्रदेश प्रवक्ते लक्ष्मण सावजी, अनुसूचित जाती मोर्चाचे महानगर अध्यक्ष राकेश दोंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत जयंती साजरी झाली.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी संपूर्ण जगाला एकता, समता आणि बंधुतेचा संदेश दिला आहे. समाजातील उपेक्षित घटकांसाठी त्यांनी आपले उभे आयुष्य खर्ची घातले. त्यांच्या विचारांची कास धरल्यास सर्व समाजाची आणि पर्यायाने देशाची प्रगती होईल, असे प्रतिपादन प्रशांत जाधव यांनी केले. लक्ष्मण सावजी यांनीही महामानवाच्या जीवनाचे विविध पैलू उलगडून दाखविले तसेच राकेश दोंदे, श्याम बडोदे, प्रा. शरद मोरे यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

यावेळी महानगर सरचिटणीस सुनील केदार, गणेश कांबळे, गिरीश पालवे, प्रा. कुणाल वाघ, मध्य मंडल अध्यक्ष वसंत उशीर, अनिता भामरे, हेमंत शुक्ल, कुंदन खरे, गजानन रणबावळे, माजी नगरसेवक भगवान दोंदे, पूनम सोनवणे, लक्ष्मण पगारे, सुजाता करजगीकर, संगीता जाधव, वैशाली त्र्यंबके, सोनल दगडे, रुपाली मर्चंडे, रोहिणी रकटे, राजेंद्र महाले, महेश भामरे, नंदकुमार देसाई, ऋषीकेश डापसे, नवाब जहांगिरदार, दयाराम पाटील, सुरेश पाटील, तेजस निरभवणे, अनिल मोरे, मदन निकम, दशरथ गांगुर्डे, पराग शिंत्रे, रोहन जगताप, मंदार पिंगळे, प्रदिप पाटील, सुनील लोणारी, गणेश आहेर, हर्षल पवार, आकाश बागूल, ज्ञानेश्वर काकड, प्रभाकर येवले, महेंद्र गर्गे, डॉ. वैशाली काळे आदींसह कार्यकर्ते उपस्थित होते.

## खडकओझर जिल्हा परिषद शाळा



**खडक ओझर (ता. चांदवड) येथील जिल्हा परिषद आदर्श प्राथमिक शाळेत आंबेडकर जयंतीनिमित्त आयोजित निबंध स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळविल्याबद्दल ईश्वरी गवळी हिचे पुष्पगुच्छ देऊन सत्कार करताना मान्यवर. (छायाचित्र : धनंजय वावधाने, सोग्रस)**

**सोग्रस : वार्ताहर**

चांदवड तालुक्यातील खडक ओझर येथील जिल्हा परिषद आदर्श प्राथमिक शाळेत भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी करण्यात आली. याप्रसंगी बहुजन प्रतिष्ठान खडक ओझर, ता. चांदवड यांच्यातर्फे निबंध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते.

या स्पर्धेमध्ये प्रथम ईश्वरी गवळी, द्वितीय राधिका पगार, तृतीय श्याम केदारे आदींनी क्रमांक पटकावले. गौरी केदारे,अक्षदा पगार,पूजा राम यांना उत्तेजनार्थ बक्षिसे देण्यात आली. बहुजन प्रतिष्ठान खडक ओझर संस्थेचे अध्यक्ष अनिल केदारे व शिक्षणप्रेमी नागरिकांनी या कार्यक्रमाचे आयोजन केले होते.

सोमनाथ पवार यांनी सूत्रसंचालन केले. कार्यक्रमासाठी मुख्याध्यापक राजू आहेर, संदीप हिरे,दत्तात्रय निफाडे,किशोर गवळी,संगीता कुयटे, वैशाली धनाईत यांनी परिश्रम घेतले.



## नाशिकरोड मनसे

**नाशिक : प्रतिनिधी**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ वी जयंतीनिमित्त मनसेतर्फे नाशिकरोड येथे अभिवादन करण्यात आले. यावेळी नाशिक शहर उपाध्यक्ष ॲड. नितीन पंडित, विभाग अध्यक्ष बंटी कोरडे,जिल्हा उपाध्यक्ष संतोष सहाणे, मनविसेचे शशी चौधरी व नितीन धानापुणे,विजय बोराडे,आदित्य कुलकर्णी,मीरा आवारे,संदीप आहेर,योगेश शिरसाट,गोरख शिंदे,विजय सूर्यवंशी उपस्थित होते. नाशिकरोड येथे पूर्णाकृती पुतळा येथे भीम जन्मभूमी (महू) मध्य प्रदेश हा देखावा सादर करण्यात आला. यावेळी भीमसैनिकांमध्ये मोठा उत्साह होता.

## नाशिकरोड मालधक्का



**नाशिक : प्रतिनिधी**

रिपब्लिकन एम्पलॉइज फेडरेशन कामगार युनियन रेल्वे मालधक्का नाशिकरोड यांच्या वतीने विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त त्यांना अभिवादन करण्यात आले. तसेच सर्व कामगार बांधवांना मिठाई वाटप करण्यात आली.

याप्रसंगी कामगार नेते राम बाबा पठारे, भारत निकम, गुल्लू शेठ आनंद, शिवनारायण शेठ सोमानी, राजाभाऊ मोकळ, दिपक वाघ, सुभाष अहिरे, प्रभाकर रोकडे, सुनील चंद्रमोरे, रवी जगताप ,सागर शार्दुल, किशोर गांगुर्डे, अशोक सोनकांबळे, मधु मकळ, सम्राट गायकवाड, लखन गवळी, कैलास भालेराव, जयराम जाधव, नाना चंद्रमोरे आदींसह कामगार उपस्थित होते.



## नाशिकरोड उत्सव समिती

**नाशिकरोड : प्रतिनिधी**

विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त डॉ. आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समितीच्या वतीने बसस्थानकाजवळ असलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास उत्सव समितीचे संयोजक सुनील संपत कांबळे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

तसेच छत्रपती शिवाजी महाराज चौकात सार्वजनिक कार्यक्रमास प्रारंभ करण्यात आला. यावेळी समितीचे अध्यक्ष मुकेश वीर, अतुल भावसार, अक्षय बर्वे, संजय पगारे, अप्पा भालेराव उपस्थित होते. समितीच्या वतीने १३४ तोफांची सलामी व फटाक्यांची आतषबाजी, मिरवणुकीच्या चित्ररथाचे स्वागत करण्यात आले.

## सिडको संभाजी ब्रिगेड

**सिडको : विशेष प्रतिनिधी**

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी महिलांसाठी आणलेले हिंदू कोड बिल आणि प्रॉब्लेम ऑफ रुपीस याबद्दल संभाजी ब्रिगेडचे जिल्हाध्यक्ष प्रफुल्ल वाघ यांनी मार्गदर्शन केले. संभाजी ब्रिगेडच्या शाखा असलेल्या सातपूर द्वारका, लेखानगर या तिन्ही शाखांच्या ठिकाणी अभिवादन करण्यात आले.

या कार्यक्रमाचे नियोजन संभाजी ब्रिगेडचे शिलेदार मंदार धिवरे, अक्षय आठवले, अमोल जाधव व निखिल साळुंखे यांनी केले. संभाजी ब्रिगेड महिला आघाडीच्या प्रज्ञा टुपके-जेऊघाले, संभाजी ब्रिगेडचे सचिव अनिल आहेर, विकी गायधनी, नितीन काळे, मंदार धिवरे, नीलेश गायकवाड, अनिल नन्नावरे, अमोल जाधव, निखिल साळुंखे, अक्षय आठवले, प्रेम भालेराव, लकी बावस्कर, प्रतीक जाधव, आकाश इस्ते, सनी मारसाळे, गोपाल पाटील, विलास गांगुर्डे, लखन अहिरे व दिनेश उजागरे उपस्थित होते.





## महावितरण कंपनी

**नाशिक : प्रतिनिधी**

महावितरणच्या नाशिक परिमंडल कार्यालयात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी मुख्य अभियंता सुंदर लटपटे यांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन व माल्यार्पण करून अभिवादन करण्यात आले.

याप्रसंगी कार्यकारी अभियंते योगेश निकम, चेतन वाडे, उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी प्रमोद राजेभोसले, अतिरिक्त कार्यकारी अभियंता प्रमोद झाल्टे, जनसंपर्क अधिकारी विकास आढे, सहाय्यक विधी अधिकारी रणजीत बोम्मी, व्यवस्थापक मंगेश गाडेंसह अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## सार्वजनिक वाचनालय, चांदवड

**मंगरूळ : वार्ताहर**

चांदवड येथील सार्वजनिक वाचनालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती साजरी करण्यात आली. त्यावेळी वाचनालयातील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना डॉ. राजेंद्र मलोसे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर व त्यांचा वाचन व्यासंग यावर बोलताना ज्यांच्या हाती पुस्तके ते जगात सर्वांत श्रीमंत असे प्रतिपादन केले. कवी रवींद्र देवरे यांनी अनुभव कथन करत मार्गदर्शन केले.

यावेळी अभ्यासिकेतील विद्यार्थी कु. उत्कर्षा चौधरी, अमोल शिंदे यांच्या हस्ते प्रतिमापूजन करण्यात आले. यावेळी वाचनालयाचे अध्यक्ष अशोक कापडिया, कादंबरीकार डॉ. राजेंद्र मलोसे, उपाध्यक्ष रवींद्र देवरे, ज्येष्ठ संचालक दत्तात्रय शेळके, बाळासाहेब शेळके, संजय पाडवी, ग्रंथपाल नितीन शिंदे व ग्रंथालय सहायक मेघा निसाद, सेक्रेटरी प्रदीप खैरे व असंख्य विद्यार्थी आदी उपस्थित होते.



# जिल्ह्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना जयंतीनिमित्त अभिवादन

## महत्त्वाचे



### ओझरला फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त सर्वरोगनिदान शिबिर

**ओझर :** विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर व महात्मा जोतिराव फुले यांच्या संयुक्त जयंतीनिमित्त सर्वरोगनिदान शिबिर नागरी आरोग्यवर्धिनी केंद्र मिलिंदनगर राजवाडा, ओझर येथे झाले. कार्यक्रमासाठी ओझर गावचे राजू शिंदे, प्रदीप अहिरे, प्रकाश महाले, जिल्हा परिषद सदस्य समस्त जाधव बौद्ध पंच मंडळाचे कार्याध्यक्ष बाळासाहेब सायजी जाधव, दिक्षी सरपंच डॉ. योगेश चौधरी, भारत पगार, कैलास शिंदे, युवराज शेळके, श्रीकांत अक्कर, प्रशांत पगार, प्रशांत अक्कर, कांचन जाधव, निफाड तालुका वंचित बहुजन आघाडी अध्यक्ष रमेश गवळी, समस्त जाधव पंच मंडळ सदस्य मधुकर जाधव, लक्ष्मण जाधव, भीमराव जाधव, हाजी शब्बीर खाटीक, शरिब खाटीक, असलम शेख, दिलीप कदम, नंदू कदम, परशुराम शेलार, धनंजय पगार, नीलेश येवले, अनिल राठी, रामटेके, पाटील, डॉ. सुर्वे, प्राथमिक आरोग्य केंद्र, साई श्री हॉस्पिटल व दुर्गा आय हॉस्पिटल येथील संपूर्ण स्टाफ, विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव मंडळ मिलिंद मित्रमंडळ राजवाडा, मिलिंदनगर येथील सर्व रहिवासी तसेच राजमुद्रा युथ फाउंडेशन ओझर शहर, सर्व नागरिक उपस्थित होते. माजी ग्रामपंचायत सदस्य नितीन जाधव यांनी आभार मानले.



### कृषी कार्यालयात डॉ. आंबेडकर जयंती

**दिंडोरी :** महाराष्ट्र शासन कृषी विभाग तालुका कृषी अधिकारी कार्यालय दिंडोरी येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंती दिनानिमित्ताने अभिवादन करण्यात आले. तालुका कृषी अधिकारी नानाजी भोये यांच्या हस्ते प्रतिमापूजन करण्यात आले. यावेळी कर्मचाऱ्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनाबद्दल तसेच शैक्षणिक, राजकीय, कृषी क्षेत्राबद्दल दिलेल्या योगदानाची माहिती दिली. यावेळी तालुका कृषी अधिकारी नानाजी भोये, मंडळ कृषी अधिकारी प्रमोद गोल्हाईत, कृषी पर्यवेक्षक श्यामकांत पाटील, कृषी सहाय्यक नितीन वसावे, संदीपकुमार बोरवे, सूरज चव्हाण, चेतन पवार, यशवंत गायकवाड, सहाय्यक अधीक्षक सचिन बदादे, मनोज वाटाणे, धोंडू गरुड आदींसह कर्मचारी उपस्थित होते.

### जानोरी विद्यालयात डॉ. आंबेडकर जयंती

**दिंडोरी :** रयत शिक्षण संस्थेच्या महात्मा फुले विद्यालय जानोरी येथे भारतीय संविधानाचे शिल्पकार, महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे मुख्याध्यापक नंदलाल निकम होते. व्यासपीठावर पर्यवेक्षक वसंत बागुल, तसेच विद्यालयातील ज्येष्ठ शिक्षक, शिक्षिका उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात प्रतिमापूजनाने करण्यात आली. विद्यालयातील विद्यार्थिनी खुशी चारोस्कर, प्रेरणा पगारे यांनी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनकार्याविषयी मनोगत व्यक्त केले. उपशिक्षक अश्रोबा सिरसाट यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याचा परिचय करून दिला. अध्यक्षीय भाषणात मुख्याध्यापक नंदलाल निकम म्हणाले, शिक्षण हे समाज परिवर्तनाचे प्रभावी साधन आहे हे बाबासाहेबांना अभिप्रेत होते. भारतीय समाजात जातीपातीच्या भेदभावामुळे पसरलेल्या दुराचाराला संपवण्यात त्यांनी मोलाची भूमिका बजावली. डॉ. आंबेडकर यांना उच्च शिक्षण घेण्यासाठी प्रचंड संघर्ष करावा लागला. कठीण परिस्थितीवर मात करून उच्च शिक्षण त्यांनी प्राप्त केले. देशाला सामाजिक, आर्थिक, राजनैतिक, शैक्षणिक, संविधानिक आदी वेगवेगळ्या क्षेत्रात अनेक कामं करून राष्ट्राच्या निर्माणात अमूल्य योगदान दिले. कार्यक्रमाप्रसंगी बापू दिवे, जयसिंग कोकणी, लक्ष्मण मौळे, नीलेश सोनार, मकरंद कापडणीस, रघुनाथ गांगुर्डे, सुभाष आवारे, ममता वळवी, रूपाली चौधरी, प्रणिता खैरनार उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शांताराम खैरनार यांनी केले. आभार अमृता धोंडगे यांनी मानले.

### स्वाभिमानी समितीतर्फे मिठाई वाटप



**येवला :** भारतीय घटनेचे शिल्पकार महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंतीनिमित्त येवला शहरात स्वाभिमानी रिपब्लिकन पक्षाचे महेंद्र पगारे यांच्या मार्गदर्शनानुसार आयोजित स्वाभिमानी जयंती उत्सव समितीच्या वतीने काल शहरातील विंचूर चौफुलीवरील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी सामूहिक त्रिशरण पंचशील व भीमस्तुती घेऊन मिठाईचे वाटप करण्यात आले. यावेळी ज्येष्ठ नेते माणिकराव शिंदे, महेंद्र पगारे, बाळासाहेब आहिरे यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी महेंद्र पगारे, विजय घोडेराव, विनोद त्रिभुवन, सुरेश खळे, सोनवणे बाळासाहेब, समाधान गुंजाळ, ॲड. अनिल झाल्टे, गणेश झाल्टे, युवराज पगारे, सुरेश सोनवणे, आशाताई आहेर, वनिताताई वाघ, नयनाताई सोनवणे, अनमोल आहेर, सुजाता पगारे आदींसह असंख्य भीमसैनिक उपस्थित होते.

### न्यू ब्लॉसम्स्‌मध्ये डॉ. आंबेडकर जयंती



**विंचूर :** येथील न्यू ब्लॉसम्स्‌ इंग्लिश मीडियम स्कूल व समर्थ प्राथमिक विद्यालयात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३४ वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. प्रारंभी विद्यालयाच्या प्राचार्या ज्योती माठा, पूजा निकम, समन्वयक माधवी सहाय यांच्या हस्ते प्रतिमापूजन करून महामानवास अभिवादन करण्यात आले. विद्यालयाच्या शिक्षिका जयश्री नेवगे, खापरे मॅडम यांनी आपल्या मनोगतातून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे शिक्षण, संविधान निर्मितीमधील योगदान आणि सामाजिक समतेसाठी केलेल्या कार्यावर प्रकाश टाकला. तर विद्यार्थ्यांनी आपल्या भाषणे व गीतांद्वारे बाबासाहेबांचे जीवनचरित्र सादर केले. याप्रसंगी शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मोनाली कामडे यांनी केले. नेहा पुंड यांनी आभार प्रदर्शन केले.



## आदिवासी सेना

**इगतपुरी : प्रतिनिधी**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या १३४ व्या जयंतीनिमित्त अखिल भारतीय आदिवासी सेनेच्या संपर्क कार्यालयात महामानवाला अभिवादन करण्यासाठी विविध सामाजिक कार्यक्रम राबवित जयंती उत्सव साजरा करण्यात आला.

स्मृतिस्थळावर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा पूर्णाकृती पुतळा व्हावा, या मागणीकरिता अनेक वर्षे संघर्ष केला होता. अखेर त्या संघर्षाला यश आले व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा पूर्णाकृती पुतळा उभारण्यात आला.

या यशात शहर व तालुक्यातील तमाम आंबेडकरी विचारांची शक्ती पणाला लागली होती.म्हणून आजचा दिवस ऐतिहासिक असल्याचे मत अखिल भारतीय आदिवासी सेनेचे संस्थापक अध्यक्ष दि. ना. उघाडे यांनी व्यक्त केले. शहरात डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव मोठ्या उत्साहात साजरी होत असताना, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांची प्रेरणा समाजाला एक दिशा देणारे पर्व म्हणून साजरी व्हावी, याकरिता बहुजन समाजाला सोबत घेत विविध सामाजिक कार्यक्रम साजरे करून अखिल भारतीय आदिवासी सेनेच्या वतीने महामानवाला अभिवादन करण्यात आले. यावेळी दि. ना. उघाडे यांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर, छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून बुद्धवंदना घेत जयंती साजरी केली. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अखिल भारतीय आदिवासी सेनेचे संस्थापक अध्यक्ष दि. ना. उघाडे, माजी नगराध्यक्ष संजय इंदुलकर, मनसेचे जिल्हा संघटक भगीरथ मराडे, अभिजित कुलकर्णी, असलम शेख, राजू दोंदे, पंडित गांगुर्डे, ॲड. दामोदर पागेरे, राजाराम ठाकरे, पांडुरंग कातोरे, गोपाळराव ठोंबरे, सपना करंजकर, शशी उबाळे, प्रदेश उपाध्यक्ष राजेंद्र गुप्ता, अभिजित कुलकर्णी, सोमनाथ कातोरे, देवीदास आडोळे, पिंकी ठाकरे, पायल ठाकरे, बंडू पगारे, दशरथ वडपे, कारभारी गिरी, अनुसया आगविले उपस्थित होते.

## लासलगावी भीमजयंती



**लासलगाव : वार्ताहर**

लासलगाव येथे विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंतीनिमित्ताने अभिवादन सभेचे आयोजन करण्यात आले होते.

लासलगावच्या प्रथम नागरिक सरपंच योगिता पाटील व जयंती अध्यक्ष आदेश शेजवळ यांच्या हस्ते डॉ. बाबासाहेबांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी यशोधरा व रमाई महिला मंडळ यांनी सामुदायिक त्रिशरण पंचशील पठण केले.

यावेळी मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक जयदत्त होळकर, लासलगाव बाजार समितीचे सभापती डी. के. जगताप, बाजार समितीच्या संचालिका सुवर्णा जगताप, कृषितज्ज्ञ सचिन होळकर, माजी पं. स. सभापती शिवा सुरासे, डॉ. विकास चांदर, उपसरपंच रामनाथ शेजवळ, डॉ. अमोल शेजवळ, राजाभाऊ चाफेकर यांनी मनोगत व्यक्त करून उपस्थित समाजबांधवांना आंबेडकर जयंतीच्या शुभेच्छा दिल्या.

यावेळी शंतनू पाटील, रवि होळकर, बाळासाहेब होळकर, बबनराव शिंदे, योगेश पाटील, कैलास केदारे, मधुकर गावडे, महेश मोरे, राजू कराड, संदीप उगले, प्रमोद पाटील, विकास खंडीझोड, मनोज शेजवळ, बाळासाहेब सोनवणे, बद्री शेजवळ, गोरख अढांगळे, साहेबराव केदारे, भास्कर शेजवळ, रमेश कर्डक, सागर आहिरे, राजेंद्र बच्छाव, संतोष पानगव्हाणे, मंगेश आहीरे, मनोहर आहिरे, प्रा. जालिंदर बगाडे, सोनू शेजवळ, अनिल शेजवळ, नाना सूर्यवंशी, राहुल पवार, आशिष शेजवळ, उमेश शेजवळ, गोटू शेजवळ, आदिल शेख, प्रज्ञा शेजवळ, तुळसाताई शेजवळ, निर्मला शेजवळ, भारती शेजवळ, प्रीती शेजवळ, शेजवळ, मनीषा शेजवळ, शैला आहिरे, सुशीला शेजवळ, रमन शेजवळ, माया केदारे, ज्योती शंभरकर, रेखा गायकवाड, आरती भालेराव होते.

## थोरात विद्यालय



**पिंपळगाव ब. : प्रतिनिधी**

मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेच्या कर्मवीर रावसाहेब थोरात विद्यालय मोहाडी येथे भारतीय संविधानाचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३४ वी जयंती साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाच्या प्राचार्य शरयू भामरे होत्या. याप्रसंगी व्यासपीठावर पर्यवेक्षक रवींद्र निकम, ज्येष्ठ शिक्षक पंढरीनाथ संगमनेरे, सोनाली देशमुख, स्मिता देशमुख,भारती खेलुकर, प्रदीप जाधव, पोपटराव जाधव, रवींद्र बच्छाव इत्यादी मान्यवर उपस्थित होते. सर्वप्रथम उपस्थित मान्यवरांच्या हस्ते भारतीय संविधानाचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

विद्यालयाचा गीतमंच व संगीत शिक्षक दिलीप पागेरे व विशाल खुळे यांनी बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनावर आधारित गीते सादर केली. तसेच विद्यार्थ्यांमध्ये तनुजा शार्दुल, देवयानी गायकवाड, अर्चित निकम, ऋषीराज मोहिते यांनी आपले मनोगत व्यक्त केले. पर्यवेक्षक रवींद्र निकम यांनी आपल्या मनोगतात डॉ. आंबेडकर हे थोर कायदेपंडित, तत्त्वज्ञ, समाजसुधारक होते तसेच त्यांनी महिला व कामगार हक्क यांच्यासह विविध क्षेत्रामध्ये महत्त्वपूर्ण योगदान दिले.ज्ञान हीच शक्ती व शिक्षण हेच शस्त्र आहे अशी शिकवण देणारे डॉ. आंबेडकर यांनी संपूर्ण समाजाला माणुसकीची व्याख्या शिकवली, असे प्रतिपादन त्यांनी केले. कार्यक्रमाच्या अध्यक्ष प्राचार्य शरयू भामरे यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणातून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी समाजामध्ये निर्माण झालेला जातीभेद दूर करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केले. तसेच संविधान निर्मितीमध्ये त्यांचे मोलाचे योगदान याबद्दलची महत्त्वपूर्ण माहिती सांगितली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कार्तिकी गायकवाड हिने केले व वैष्णवी इचाळ हिने आभार मानले. या कार्यक्रमाचे सुंदर असे नियोजन सांस्कृतिक समितीप्रमुख कांचनमाला हुजरे यांनी केले.



## जनता विद्यालय, कोऱ्हाटे

**कोऱ्हाटे : प्रतिनिधी**

जनता विद्यालय कोऱ्हाटे व अभिनव बालविकास मंदिर कोऱ्हाटे येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येऊन डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना विनम्र अभिवादन करण्यात आले.

सदरील कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाच्या मुख्याध्यापिका रंजना घंगाळे होत्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन इयत्ता सातवीच्या विद्यार्थिनी कुमारी असता पाचोरकर व उज्ज्वला बदादे यांनी केले. संयोजन विद्या कदम यांनी केले. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन विद्यालयाच्या सन्माननीय मुख्याध्यापिका घंगाळे मॅडम, वरिष्ठ शिक्षक आबासाहेब शिंदे, नरेंद्र साळुंके यांनी केले.

प्रास्ताविक वरिष्ठ शिक्षक आबासाहेब शिंदे यांनी केले. विद्यालयाचे विद्यार्थी प्रणव मालसाने, आदित्य मालसाने, सेजल मोरे, आस्था पाचोरकर, तेजल बदादे यांनी आपल्या मनोगतात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनचरित्राची ओळख करून दिली. विद्यालयाच्या शिक्षिका आदिती पांडव यांनी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सामाजिक व राजकीय कार्याची माहिती सांगून सर्वांना प्रेरित केले.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर बंधू-भगिनी या सर्वांचे मोलाचे सहकार्य लाभले.

## येवल्यात भुजबळांतर्फे अभिवादन



**येवला : प्रतिनिधी**

भारतीय घटनेचे शिल्पकार महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंतीनिमित्त येवला शहरात माजी मंत्री छगन भुजबळ यांनी विविध ठिकाणी भेट देऊन डॉ. आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन केले. येवला शहरातील संपर्क कार्यालयात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करत विनम्र अभिवादन केले.

याचप्रमाणे शहरातील मुक्तिभूमी येथे महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर व भगवान गौतम बुद्ध यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करत भुजबळ यांनी अभिवादन केले. तसेच शहरातील डॉ. विंचूर रोड चौफुली येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला माजी मंत्री छगन भुजबळ यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

यावेळी त्यांच्यासमवेत आमदार पंकज भुजबळ, माजी खासदार समीर भुजबळ, माजी जिल्हा परिषद अध्यक्ष राधाकिसन सोनवणे, प्रांताधिकारी बाबासाहेब गाढवे, तहसीलदार आबा महाजन, गटविकास अधिकारी संदीप वायाळ, मुख्याधिकारी तुषार आहेर, बाळासाहेब लोखंडे, ज्येष्ठ नेते भागीनाथ पगारे, वसंत पवार, मोहन शेलार, माजी नगरसेवक दत्ता निकम, प्रमोद सस्कर, बाजार समितीचे माजी सभापती देवीदास निकम, शेतकरी नेत्या संध्या पगारे, युवा नेते मकरंद सोनवणे, युवा नेते भूषण लाघवे, संजय पगारे, समाधान पगारे, दीपक लोणारी, समाधान जेजुरकर, सुनील पैठणकर, भाऊसाहेब धनवटे, सुभाष गांगुर्डे, गोटू मांजरे, विशाल परदेशी, सचिन सोनवणे, सौरभ जगताप, संतोष राऊळ आदींसह असंख्य पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## गुंजाळ विद्यालय

**चांदवड : वार्ताहर**

येथील मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेच्या श्रीमती जे. आर. गुंजाळ विद्यालयामध्ये भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य लोहकरे एस. एन. होते. व्यासपीठावर पर्यवेक्षक महाले सर, ज्येष्ठ शिक्षक गरुड के. के., गायकवाड के. एन., श्रीमती निकम, ठाकरे मॅडम उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात प्रतिमापूजनाने करण्यात आली. व्यासपीठावरील उपस्थित सर्व मान्यवरांच्या हस्ते महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. विद्यालयातील सहावीची विद्यार्थिनी साधना सूर्यवंशी, पाचवीचा विद्यार्थी आदित्यराज वाघ यांनी बाबासाहेब आंबेडकरांविषयी आपले विचार व्यक्त केले. महाविद्यालयाचे प्रा. केदारे सर यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनाचा परिचय करून दिला. त्यांनी आपल्या मनोगतात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे निष्णात कायदेतज्ज्ञ, घटनेचे शिल्पकार, अर्थशास्त्रज्ञ आणि समाजसुधारक होते. त्यांनी सामाजिक क्रांतीच्या चळवळीला प्रेरणा दिली. दलित व अस्पृश्य वर्गाच्या हक्कांसाठी लढा दिला, असे प्रतिपादन केले.

## दिंडोरी जनता इंग्लिश स्कूल



**दिंडोरी : प्रतिनिधी**

जनता इंग्लिश स्कूल उच्च माध्यमिक विद्यालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना १३४ व्या जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन करण्यात आले.

यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे प्राचार्य शरद शेजवळ होते. यावेळी व्यासपीठावर प्राचार्य शरद शेजवळ, उपप्राचार्य उत्तम भरसठ, पर्यवेक्षक रावसाहेब उशीर, यशवंत दाणी, पी. के. पगारे, कॉलेज विभागप्रमुख श्रीमती संध्या सूर्यवंशी, शैलेश माने, कार्यालय प्रमुख बाळासाहेब कदम आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात राष्ट्रगीत व उपस्थित मान्यवरांच्या हस्ते प्रतिमापूजन व बौद्ध धम्म प्रार्थनेने करण्यात आली. बौद्ध धम्म प्रार्थना विद्यालयाच्या उपशिक्षिका साधना पेलमहाले यांनी केली व सौ. देशपांडे यांनी त्यास संगीतसाथ दिली. प्रास्ताविक संतोष कथार यांनी केले.

प्रा. शिवाजी कदम, प्रा. मेघा जगताप, शिक्षिका सुमन विरकर यांनीदेखील डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या कार्याची माहिती सांगितली. पर्यवेक्षक यशवंत दाणी यांनीदेखील डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जीवनामध्ये आलेल्या अनेक अडथळ्यांची माहिती सांगत ते ज्ञानपिपासू कसे बनले, वाचाल तर वाचाल हे खरे सत्यात उतरवले.

डॉ. बाबासाहेब हे भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार झाले. थोर नेत्यांच्या जयंती, पुण्यतिथी नुसत्या साजरा करायच्या नाही तर त्यातील तत्त्वे अंगीकारायची असतात, असे मत प्रा. शेजवळ यांनी व्यक्त केले. सूत्रसंचालन कांचन निफाडे यांनी केले. आभार पर्यवेक्षक रावसाहेब उशीर यांनी मानले.



लासलगाव : येथे सलग १२ तास अध्ययन करून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करताना विद्यार्थी. (छाया : समीर पठाण)

## लासलगावी १२ तास अभ्यास

**लासलगाव : वार्ताहर**

आनंद करिअर अकॅडमी, लासलगाव येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती यंदा आगळ्या-वेगळ्या उपक्रमाच्या माध्यमातून साजरी करण्यात आली. डॉ. आंबेडकरांच्या स्मृतीप्रित्यर्थ विद्यार्थ्यांनी सलग १२ तास अध्ययन करून त्यांना कृतीतून अभिवादन केले. या उपक्रमाची संकल्पना अकॅडमीचे संचालक दत्तात्रय पाटील यांनी मांडली होती.

कार्यक्रमाचे उद्घाटन लासलगाव पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक अप्पासाहेब हंडाळ यांच्या हस्ते झाले.यावेळी प्रमुख वक्ते म्हणून डॉ. अमोल शेजवळ उपस्थित होते. तसेच नेत्ररोगतज्ज्ञ डॉ. प्रवीण लोहकरे आणि ॲड. तुकाराम जाधव हे विशेष अतिथी म्हणून उपस्थित होते. पोऊनि हंडाळ यांनी विद्यार्थ्यांना उद्देशून बोलताना सांगितले की ''आपली उंची आणि व्यक्तिमत्व वाढवणारी वर्दी परिधान करण्याचे स्वप्न अभ्यासानेच पूर्ण होते. गर्दीतून वर्दीत यायचे असेल तर ज्ञानाचे दर्दी बना असे मार्गदर्शन केले.

डॉ. अमोल शेजवळ यांनी आपल्या भाषणात डॉ. आंबेडकरांच्या संघर्षमय जीवनाचा आढावा घेत प्रेरणादायी विचार मांडले. ''प्रतिकूल परिस्थिती हीच संधी समजून ज्ञानाच्या बळावर मोठी स्वप्नं पूर्ण करा,'' असा संदेश त्यांनी दिला. ॲड. तुकाराम जाधव यांनी भारतीय संविधानाचे महत्त्व विशद करताना सांगितले, की ''नागरिकांच्या हक्कांपासून ते जबाबदाऱ्यांपर्यंत संविधानाने दिलेली दिशा विद्यार्थ्यांनी समजून घेतली पाहिजे.

डॉ. प्रवीण लोहकरे यांनी ''आत्मविश्वासासारखी दुसरी दैवी शक्ती नाही,'' या डॉ. आंबेडकरांच्या विचाराचा आधार घेत आत्मविश्वासाच्या बळावर यश कसे प्राप्त करता येते, यावर विद्यार्थ्यांशी संवाद साधला. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन दत्तात्रय पाटील यांनी तर आभार प्रदर्शन मेजर वाल्मीक चव्हाण यांनी केले. कार्यक्रमानंतर ८० हून अधिक विद्यार्थ्यांनी सलग १२ तास अध्ययन करत डॉ. आंबेडकरांना अभिवादन केले.

## ओझर बोरस्ते विद्यालय

**ओझर : वार्ताहर**

येथील मविप्र संचलित माधवराव बोरस्ते विद्यालयात महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त मुख्याध्यापक सोपान वाटपाडे, उपमुख्याध्यापक धैर्यशील पाटील, पर्यवेक्षक दशरथ शिंदे यांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन होऊन विनम्र अभिवादन करण्यात आले. प्रास्ताविक शिक्षिका शीतल हांडारे यांनी केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक सोपान वाटपाडे होते. यावेळी विद्यार्थ्यांनी डॉ. आंबेडकरांच्या जीवनावर भाषणे केली. शिक्षक मनोगत विशाल पगारे यांनी व्यक्त केले. अध्यक्षीय भाषणात मुख्याध्यापक सोपान वाटपाडे यांनी, डॉ. आंबेडकर त्यांचे लेखनकार्य व कुशाग्र बुद्धिमत्तेच्या जोरावर भारतीय संविधानाचे शिल्पकार झाले. स्वातंत्र्य, समता बंधुत्व न्यायासाठी लढा उभारला. शिका, संघटित व्हा, संघर्ष करा, असा मंत्र त्यांनी देऊन देशातील कोट्यवधी जनतेच्या मनात आपल्या कर्तृत्वाच्या जोरावर आदराचे स्थान मिळवल्याचे सांगितले.





## एचएएल इंग्रजी माध्यम

**ओझर : वार्ताहर**

येथील गोखले एज्युकेशन सोसायटीच्या एच.ए.एल. हायस्कूल इंग्रजी माध्यम आणि कनिष्ठ महाविद्यालयात भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती व तसेच क्रांतिसूर्य महात्मा जोतिराव फुले यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.

शाळेच्या मुख्य प्रार्थना सभागृहामध्ये झालेल्या कार्यक्रमात शाळेचे प्राचार्य आर. एम. चौधरी, शाळेचे पर्यवेक्षक शरद जोशी व सतीश पाटील यांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर व महात्मा फुले या दोन्ही महान विभूतींच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

विद्यार्थ्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर व महात्मा फुले यांच्याविषयी भाषणे केली. कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य सुरेंद्र पगारे यांनी विद्यार्थ्यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर व महात्मा जोतिराव फुले यांच्या जीवनकार्यांची माहिती सांगितली. याप्रसंगी शाळेचे प्राचार्य आर. एम. चौधरी, पर्यवेक्षक शरद जोशी व सतीश पाटील यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

## महत्त्वाचे

### जलसंपदा व्यवस्थापन कृती पंधरवडा आज कार्यक्रम

**वावी :** महायुती शासनाच्या जलसंपदा विभागाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या व जलसंवर्धनाच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल असणाऱ्या जलसंपदा विभागाच्या 'जलसंपदा व्यवस्थापन कृती पंधरवडा' कार्यक्रमाचा शुभारंभ मंगळवार दि.१५ रोजी माजी आमदार अशोकराव काळे यांच्या अध्यक्षतेखाली व आ. आशुतोष काळे यांच्या हस्ते होणार असल्याची माहिती आ. आशुतोष काळे यांच्या जनसंपर्क कार्यालयाकडून देण्यात आली आहे. जल व्यवस्थापनाच्या शाश्वत योजना राबवून नागरीकांमध्ये जल साक्षरतेचे महत्व पटवून देण्यासाठी व जल संपदा विभागाच्या विविध सेवा योजनांचा लाभ कशा प्रकारे घेता येतो याबाबत सखोल मार्गदर्शन करण्यासाठी महायुती शासनाच्या जलसंपदा विभागाच्या वतीने दि.१५ ते दि.३० एप्रिल या कालावधीत 'जल व्यवस्थापन कृती पंधरवाडा'कार्यक्रम हाती घेण्यात आला आहे. या कार्यक्रमाचा शुभारंभ तहसील कार्यालय कोपरगाव येथे सकाळी ११ वाजता आ.आशुतोष काळे यांच्या हस्ते करण्यात येणार आहे.



### कोपरगावात बाबासाहेबांना अभिवादन

**वावी :** कोपरगाव मतदारसंघात भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंतीनिमित्त कोपरगाव येथे आमदार आशुतोष काळे यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या वतीने अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी कोपरगाव शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी, माजी नगरसेवक, कार्यकर्ते व समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.




### डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती साजरी

**सिन्नर :** येथील महात्मा फुले शैक्षणिक संकुलात महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सगर विद्या प्रसारक शिक्षण संस्थेचे सेक्रेटरी नामदेव लोणारे होते. व्यासपीठावर प्राचार्य देशमुख, प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका राजगुरू मॅडम, उच्च माध्यमिक विभागप्रमुख माळी, महिला महाविद्यालयाचे प्राचार्य महाले आदी उपस्थित होते. डॉ. आंबेडकर यांनी वंचित घटकासाठी केलेले कार्य, संविधान निर्मितीत आंबेडकरांचे योगदान याबाबत लोणारे यांनी सखोल मार्गदर्शन केले. प्रास्ताविक संकुलाचे प्राचार्य देशमुख यांनी केले. किमान कौशल्य विभागप्रमुख भालेराव यांनी डॉ. आंबेडकर यांचा जीवनपट उलगडून सांगितला. शरद जाधव यांनीही मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन सांस्कृतिक विभागप्रमुख काटे मॅडम यांनी केले तर आभार ज्येष्ठ क्रीडाशिक्षक मिठे मानले. कार्यक्रमास सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.



### सिन्नर वाचनालयात प्रतिमा पूजन

**सिन्नर :** येथील सिन्नर सार्वजनिक वाचनालयात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी वाचनालयाचे कार्यवाह हेमंतनाना वाजे होते. उपाध्यक्ष नरेंद्र वैद्य यांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे प्रतिमेचे पूजन करून प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. कार्यक्रमास संचालक मनीष गुजराती, संचालिका निर्मल खिंवसरा, बाळासाहेब कमानकर, बाळासाहेब भोळे, प्रकाश घेगडमल, राजेंद्र दिवे, डॉ. श्यामसुंदर झळके, अंबादास भालेराव, दौलत भालेराव, वसंत पगार, राजेश खूस्तुले आदींसह वाचक उपस्थित होते.



### बारागावपिंप्री शाळेत अनोखा उपक्रम

**सिन्नर :** तालुक्यातील बारागावपिंप्री येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त 'माझे हक्क माझ्या शब्दात' उपक्रम राबवला गेला. या उपक्रमाद्वारे विद्यार्थ्यांनी समता, बंधुता आणि न्याय यासारख्या संविधानिक मूल्यांचा दैनंदिन जीवनात कसा वापर करावा यावर आधारित हस्तलिखित, रंगभरण आणि भाषणांचे सुंदर संयोजन केले. शाळेतील शिक्षक गोरक्ष सोनवणे यांच्या कल्पकतेतून माझे हक्क माझ्या शब्दात हा उपक्रम ४ थीच्या विद्यार्थ्यांनी यशस्वी केला. मुख्याध्यापक नवनाथ हांडगे यांच्या नेतृत्वात, शिक्षक राजेंद्र पाटील, रोहिणी पगार, मनीषा शेळके, गोरक्ष काकड, अनिता बडदे यांनी विद्यार्थ्यांना प्रेरित केले. विद्यार्थ्यांनी संविधानातील हक्कांची महत्त्वाची माहिती रंगभरणाच्या माध्यमातून, तसेच ओघवत्या भाषणातून प्रस्तुत केली. आलोक जाधव याने डॉ. बाबासाहेबांची वेशभूषा केली. गटविकासाधिकारी अशोक भवारी, गटशिक्षणाधिकारी राजेश डामसे, विस्तार अधिकारी मंजुषा साळुंके, कैलास सांगळे, विजय बागुल, केंद्रप्रमुख इरफान पटेल, सरपंच संध्या कटके, उपसरपंच योगेश गोराडे, सुंदर डेंगळे आणि पालक-शिक्षक संघ यांनीही विद्यार्थ्यांच्या उपक्रमाचे कौतुक केले.

# घोटेवाडीत सहा ट्रॉली कडब्यासह ५५ टन मुरघास आगीत भस्मसात

## दोन लाखांचे नुकसान; ऐन उन्हाळ्यात जनावरांच्या तोंडचा घास हिरावला

**सिन्नर : प्रतिनिधी**

**तालुक्यातील घोटेवाडी येथील शेतकरी विलास गंगाधर घोटेकर यांचा घराशेजारील खळ्यावर असलेला कडबा व मुरघास आगीच्या भक्ष्यस्थानी पडून जळून खाक झाल्याची घटना सोमवारी (दि.१४) दुपारी १.३० ते १.४५ वाजेच्या सुमारास घडली.**

घोटेवाडी येथे विलास गंगाधर घोटेकर हे कुटुंबीयांसह वास्तव्यास असून, शेतीसह दुग्धव्यवसाय करतात. दुध व्यवसायासाठी पाळलेल्या जनावरांसाठी घोटेकर यांनी घराशेजारी खळ्यावर ५० ते ५५ टन मुरघास बॅगा भरून ठेवलेला होता तसेचसहा ट्रॉली ज्वारीचा कडबा रचून ठेवला होता. सोमवारी घोटेकर कुटुंबीय विवाहासाठी बाहेर गेले होते तर घरात लहान मुलेच होती. दुपारी १.३० ते १.४५ वाजेच्या सुमारास घराशेजारील खळ्यातील चाऱ्याला आग लागल्याचे पाहताच मुलांनी आरडाओरड करून आजूबाजूच्या शेतकऱ्यांना बोलावले.

शेजारी शेतात वस्ती करून राहणाऱ्या पूनम जितेंद्र घोटेकर, आप्पासाहेब घोटेकर, दादाभाऊ घोटेकर यांच्यासह परिसरातील





शेतकऱ्यांनी घटनास्थळी धाव घेऊन आग विझविण्यासाठी प्रयत्न सुरू केले. विलास घोटेकर यांचा पुतण्या गणेश घोटेकर याने त्यांचे ट्रॅक्टर-टँकरच्या तीन ते चार खेपा करून आग आटोक्यात आणली. या आगीत घोटेकर यांनी जनावरांसाठी साठविलेला सहा ट्रॉली ज्वारीचा कडबा व बॅगा भरून ठेवलेला ५० ते ५५ टन मुरघास भस्मसात झाल्याने घोटेकर यांना सुमारे पावणेदोन ते दोन लाखांचा आर्थिक फटका बसला आहे. ऐन उन्हाळ्यात जनावरांसाठी साठविलेला चारा आगीत खाक झाल्याने जनावरांच्या तोंडचा घास हिरावला गेला.

## श्री संत बाबा भागवत महाराज यात्रोत्सवास देवपूरला प्रारंभ

**सिन्नर : प्रतिनिधी**

तालुक्यातील देवपूर येथे वारकरी संप्रदायाचे श्रद्धास्थान असलेले संत श्री सद्गुरू बाबा भागवत महाराज यात्रोत्सवास कालपासून (दि.१४) उत्साहात प्रारंभ झाला.



तीन दिवसीय यात्रोत्सावत विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. तीन दिवशी कीर्तन महोत्सव संपन्न होत असून, काल (दि.१४) रात्री ८ ते ११ या वेळेत हभप राहुल महाराज डुंबरे यांचा कीर्तनाचा कार्यक्रम संपन्न झाला. कीर्तनानंतर लगेचच श्री संत सद्गुरु बाबा भागवत महाराजांच्या मुखवट्याच्या दिंडी पालखी सोहळा संपन्न झाला. आज (दि.१५) सकाळी १० ते १२ हभप नरसिंग महाराज कदम यांचे कीर्तन होणार असून, सकाळी गंगाजलाच्या कावडीची गावातून सवाद्य मिरवणूक संपन्न होऊन गंगाजलाने बाबा भागवत महाराजांना स्नान घालण्यात येईल. तसेच रात्री हभप माधव महाराज घोटेकर यांचे कीर्तन होईल.

उद्या (दि.१६) सायंकाळी ४ ते ६ हभप डॉ. कल्पेश महाराज भागवत यांच्या काल्याच्या कीर्तनाने यात्रोत्सवाची सांगता होईल. यात्रोत्सवानिमित जय्यत तयारी झाली असून, विद्युत रोषणाई व पताकांनी मंदिर परिसर सजवण्यात आला आहे. विविध खेळण्याची व मिठाईची दुकाने फुलून गेली आहे. परिसरातील भाविक भक्तांनी यात्रोत्सवाचा लाभ घेण्याचे आवाहन आयोजकांनी केले आहे.

## सिल्व्हर लोटस स्कूलमध्ये डॉ. आंबेडकरांच्या जीवनावर नाटक

**सिन्नर : प्रतिनिधी**

येथील सिल्व्हर लोटस स्कूलमध्ये भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना जयंतीनिमित्त अभिवादन करण्यात आले.

याप्रसंगी व्यासपीठावर संस्थापक दिलीप बिन्नर, प्राचार्या मनीषा गुरुळे, उपमुख्याध्यापिका स्वाती गंगावणे, मुख्याधिकारी कविता डावखर, क्रीडाशिक्षक अशोक गायकवाड, योग शिक्षक राजेंद्र नन्नवरे, संगीत शिक्षक भरत मांडे आदींसह मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला व छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून पूजन करण्यात आले.

स्नेहल घुले यांनी प्रास्ताविक केले. संगीत शिक्षक भरत मांडे व शाळेतील गीतमंचाने डॉ. आंबेडकर यांच्यावर सुंदर गीत



सादर केले. इयत्ता ७ वी ते ९ वीतील विद्यार्थी अथर्व शिरसाट, संस्कार गोसावी, स्वयम ढोली, गोपाल शिंदे, हसनेन शेख, नचिकेत मोहिते, शिवम शहा, स्पर्श सिंग, यतीन गोरे व सम्यक पठारे या विद्यार्थ्यांनी डॉ. आंबेडकर यांच्या शालेय जीवनापासून ते सामाजिक कार्यापर्यंतचा प्रवास नाटकातून दाखवला.

शनाया भालेराव, दीप्ती राणा यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी शिक्षणासाठी घेतलेले कष्ट याविषयी माहिती सांगितली. शिक्षिका योगिता ठाकरे यांनी डॉ. आंबेडकर यांची कौटुंबिक परिस्थिती, शिक्षणासाठी घेतलेली मेहनत आणि मिळविलेल्या ३२ पदव्या तसेच ९ भाषांवर असलेले प्रभुत्व, विविध ठिकाणी सत्याग्रह करून दलितांना मिळवून दिलेला मंदिर प्रवेश, सार्वजनिक स्थळावर पाणी भरण्याचा व माणूस म्हणून जीवन जगण्यासाठी आवश्यक असलेला मूलभूत अधिकार याविषयी सखोल माहिती विद्यार्थ्यांना दिली.

शिक्षिका प्रतिभा गोराडे यांनी सूत्रसंचालन केले तर पूनम बोडके यांनी आभार मानले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांचे बहुमोल सहकार्य लाभले.



## सिन्नरला डॉक्टरांना इमर्जन्सी औषधांचे किट वाटप

**सिन्नर : प्रतिनिधी**

सिन्नर तालुका होमिओपॅथिक डॉक्टर्स असोसिएशनच्या वतीने दि. १० एप्रिल रोजी जागतिक होमिओपॅथी दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. उपस्थित मान्यवर डॉक्टरांचा इमर्जन्सी औषधांचे किट व पुष्पगुच्छ देऊन ज्येष्ठ होमिओपॅथी डॉ. सुरेश बिडवई यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

होमिओपॅथी शास्त्राचे जनक डॉ. सॅम्युएल हॅनेमन यांचा जन्मदिवस जगभरात जागतिक होमिओपॅथी दिन म्हणून साजरा केला जातो. असाध्य व गुंतागुंतीच्या आजारांसाठी प्रभावी समजल्या जाणाऱ्या होमिओपॅथी या शास्त्राचा शोध जर्मनी स्थित डॉ. सॅम्युएल हॅनेमन यांनी १७९६ साली लावला. जगभरातील सुमारे १६ देशांतील साधारण ५५% जनतेने आपल्या आयुष्यात कधीना कधी होमिओपॅथी औषधांचा वापर केला आहे असे जागतिक आकडेवारी सांगते. या शास्त्राचे महत्त्व अधोरेखित करण्यासाठी दरवर्षी दि. १० एप्रिल रोजी सिन्नर येथे जागतिक होमिओपॅथी दिन साजरा केला जातो. सिन्नरच्या लायन्स क्लब हॉल येथे डॉ. सॅम्युएल हॅनेमन यांच्या प्रतिमेचे पूजन करून व होमिओपॅथी शास्त्रात होणारी प्रगती व आव्हाने या विषयी चर्चा करण्यात आली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सचिव डॉ. सुधीर कुशारे यांनी केले. मॉडर्न मेडीसीन वापराच्या बाबतीत घ्यावयाची काळजी, तसेच होमिओपॅथी डॉक्टरांसाठी शासनाचा सी.सी.एम.पी. कोर्सचे महत्व यावेळी संस्थेचे अध्यक्ष डॉ. प्रशांत गाढे यांनी पटवून दिले. पो खजिनदार डॉ. राहुल लोंढे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

याप्रसंगी तालुका होमिओपॅथिक संघटनेचे डॉ. विशाल गाडे, डॉ. शरद केदार, डॉ. विवेक सोनवणे, डॉ. राजेंद्र कमानकर, डॉ. सोपान दिघे, डॉ. सचिन पठारे आदी उपस्थित होते.

## तरुण पिढीने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार आत्मसात करावे : अशोकराव काळे

**वावी : वार्ताहर**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे केवळ भारताच्या संविधानाचे शिल्पकारच नव्हते, तर त्यांच्या विचारांचा पाया हा समानता, बंधुता व स्वातंत्र्य या तत्त्वावर आधारित होता. ते महान विचारवंत होते. त्यांच्या दूरदृष्टीमुळे आज आपल्याला लोकशाही, स्वतंत्र विचार आणि मूलभूत हक्कांची जाणीव आहे. आजच्या तरुण पिढीने त्यांचे विचार आत्मसात करून समतेचं आणि सामाजिक बंधुत्वाचे स्वप्न साकार करावे, हीच त्यांना खरी आदरांजली ठरणार आहे, असे प्रतिपादन माजी आमदार अशोकराव काळे यांनी केले.

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३४ वी जयंती कर्मवीर शंकरराव काळे कारखाना कार्यस्थळावर मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.



यावेळी कारखाना व उद्योग समूहाचे मार्गदर्शक माजी आमदार अशोकराव काळे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

त्याप्रसंगी ते बोलत होते. ते म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केवळ दलित समाजासाठीच नव्हे तर संपूर्ण भारतासाठी समता, बंधुता आणि न्यायाचे तत्त्वज्ञान दिले. भारताच्या राज्यघटनेचे मुख्य शिल्पकार म्हणून त्यांचे योगदान अत्यंत मोलाचे आहे. सामाजिक, राजकीय आणि आर्थिक परिस्थितीत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची विचारधारा व त्यांनी शिक्षणाच्या जोरावर माणूस स्वत:ची ओळख तयार करू शकतो व अन्याया विरुद्ध लढू शकतो त्यांचे हे बहुमुल्य विचार आजही नव्या पिढीसाठी प्रेरणादायी असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी कारखान्याचे प्रभारी कार्यकारी संचालक सुनील कोल्हे, सेक्रेटरी बी.बी. सय्यद, डेप्यु. सेक्रेटरी संदीप शिरसाठ, फायनान्स मॅनेजर सोमनाथ बोरनारे, चीफ इंजिनिअर निवृत्ती गांगुर्डे, चीफ केमिस्ट सुर्यकांत ताकवणे, शेतकी अधिकारी निळकंठ शिंदे, तसेच सर्व विभागप्रमुख व कर्मचारी यांनी देखील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

# शेतकरी ओळखपत्र आजपासून अनिवार्य

## ८ लाख ७५ हजार ९१२ शेतकऱ्यांची फार्मर आयडीकडे पाठ

**सिन्नर : भरत घोटेकर**

कृषी विभागाच्या योजनांसाठी १५ एप्रिलपासून शेतकरी ओळख क्रमांक अनिवार्य असणार आहे. शेतकऱ्यांना या ओळख क्रमांकाशिवाय कोणत्याही योजनेचा लाभ मिळणार नाही, असे असताना जिल्हाभरातून आतापर्यंत १३ लाख ७८ हजार २३० शेतकऱ्यांपैकी अवघ्या ५ लाख २ हजार ३१८ शेतकऱ्यांनीच ओळखपत्र काढले आहे. म्हणजेच ॲग्री स्टॅगच्या माध्यमातून फार्मर आयडी काढण्याचे अवघे ३६ टक्के काम पूर्ण झाले आहे. अजूनही ८ लाख ७५ हजार ९१२ शेतकऱ्यांनी ओळखपत्र काढले नसल्याचे कृषी विभागाच्या आकडेवारीवरून समोर आले आहे. एकूणच शेतकरी ओळखपत्रा बाबत फारशी जागृती झाली नसल्याचेच दिसून येत आहे.

शासकीय योजनांचा लाभ घेण्यासाठी शेतकऱ्यांनी तातडीने ॲग्रीस्टॅक पोर्टलवर नोंदणी करावी, असं आवाहन कृषी विभागाने केले आहे. कृषि क्षेत्रात डिजिटल सेवांचा वापर करून सरकारच्या




**एकूण शेतकरी संख्या - १३,७८,२३०**
**फार्मर आयडी काढलेले शेतकरी - ५,०२,३१८**
**आयडी बाकी असलेले शेतकरी - ८,७५,९१२**

विविध योजनांचा लाभ जलदगतीने व परिणामकारकरित्या शेतकऱ्यांना देण्यासाठी राज्यात ॲग्रिस्टॅक योजना राबविण्यात येत आहे.

या योजनेंतर्गत शेतकऱ्यांच्या आणि त्यांच्या शेतांचा आधार संलग्न माहिती संच, हंगामी पिकांचा माहिती संच, शेतांचे भू-संदर्भिकृत माहिती संच अशी माहिती एकत्रितरीत्या तयार करण्यात येत आहे.

शेतकऱ्यांचा आधार क्रमांक त्या माहितीशी जोडून प्रत्येक शेतकऱ्याला शेतकरी ओळख क्रमांक देण्यात येत आहे. दरम्यान,

### सीएससी चालकांकडून शेतकऱ्यांची लूट

शेतकरी जवळच्या सीएससीवर जाऊन ॲग्रीस्टॅक पोर्टलवर नोंदणी करू शकतात. त्यासाठी कोणत्याही प्रकारचे शुल्क आकरले जात नाही. सीएससीचालकांना एका अर्जासाठी १५ रुपये सरकारमार्फत दिले जातात. त्यामुळे शेतकऱ्यांनी सीएससी चालकांना शुल्क देऊ नये, असं कृषी विभागाने सांगितलं आहे. मात्र, जिल्ह्यात अनेक ठिकाणी सीएससीचालक शेतकऱ्यांकडून १०० ते १५० रुपये नोंदणीसाठी घेत आहेत. याबद्दल शेतकऱ्यांनी तक्रार केली आहे. परंतु अद्यापही या सीएससीचालकांवर कारवाई करण्यात आलेली नाही. त्यामुळे शेतकऱ्यांची लूट होत असल्याचं शेतकरी सांगत आहेत. कृषी विभाग मात्र नोंदणीसाठी शुल्क देऊ नये, असं आवाहन करत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये संभ्रम निर्माण झाला आहे.

### केवळ वडिलांनाच ओळखपत्र

सातबारा उताऱ्यावर ज्यांची नावे आहेत, त्या शेतकऱ्यांना हे ओळखपत्र काढावे लागणार आहे. घरात सदस्य चार अन् सातबारा वडिलांच्या नावावर असेल तर केवळ वडिलांनाच ओळखपत्र काढता येणार आहे. पण, या वडिलांसोबत या चारही सदस्यांची नावे सातबारा उताऱ्यावर असतील, त्या साऱ्यांनाच ओळखपत्र काढता येईल.

शासनाच्या सक्तीमुळे फार्मर आयडी कार्ड काढण्यासाठी शेतकऱ्यांना आता धावपळ करावी लागणार आहे.

शेतकरी ओळखपत्राच्या आधारे पिक विमा, विविध अनुदान खात्यात जमा करणे अधिक सुलभ होणार आहे. हे ओळखपत्र थेट महाडिबीटीला जोडले जाणार आहे.



## नांदूरशिंगोटेत संयुक्त जयंती सोहळ्यात महापुरुषांना अभिवादन

**सिन्नर : प्रतिनिधी**

तालुक्यातील नांदूरशिंगोटे येथे चास नाका परिसरात सोमवारी डॉ. बाबासाहेब आंबेडकर संयुक्त जयंती सोहळा आयोजित करण्यात आला होता. छत्रपती शिवाजी महाराज, क्रांतिसूर्य महात्मा फुले व महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन वावी पोलीस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक प्रमोद सरोवर यांच्या हस्ते करण्यात आले.

उपस्थित मान्यवरांच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला.

यावेळी उपस्थित मान्यवरांनी डॉ. आंबेडकर यांच्या कार्याबाबत माहिती दिली. याप्रसंगी आनंदराव शेळके, विनायक शेळके, दीपक बर्के, लक्ष्मण शेळके, गोपाळ शेळके यांच्या हस्ते प्रतिमा पूजन करण्यात आले. यावेळी मंडळाचे विशाल पठारे, नयन पठारे, संदीप पठारे, नीलेश कर्डक, संतोष कुचेकर, भाऊसाहेब लांडगे, भीमराव जळगाव, अनिल पठारे, सूर्यकांत पठारे, प्रकाश पठारे, मनोज निकम, नागेश शेळके, संदीप शेळके, योगेश शेळके, विनायक आगीवले, गणेश सय्यद, सोमनाथ नवले, सुरेश कुचेकर, विश्वनाथ कुचेकर आदी उपस्थित होते.